सहकार भारतीचे मुखपत्र

बिना संस्कार नहीं सहकार, बिना सहकार नहीं उद्धार

ISBN
978-81-940842-0-4

# सहकार सुगंध

• संपादक : भालचंद्र कुलकर्णी

• पुणे • वर्ष : २० • अंक ०७ व ०८ • ऑक्टो–नोव्हें. २०२४ (जोडअंक) • पृष्ठे ८० • किंमत : रु. ६०/-

## भारताच्या विकासासाठी, सहकाराचा दीप उजळवू या...



सहकार महर्षी ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन...




महाराष्ट्र प्रदेश अधिवेशन शिर्डी येथे संपन्न...

राष्ट्रीय सहकार धोरण लवकरच जाहिर...

सहकारातील निवडणुका पुन्हा लांबणीवर...

सहकार भारती राष्ट्रीय अधिवेशन पंजाबमध्ये...


स्नेहाचा सुगंध दरवळला, आनंदाचा सण आला.
विनंती आमची परमेश्वराला, सौख्य, समृद्धी लाभो तुम्हाला.
शुभ दिपावली
सर्व आर्थिक समाधानासाठी एकच संस्था
तुमच्या सेवेत सदैव तत्पर
LOCKERS सुविधा
SMS अलर्ट
DEPOSIT सुविधा
NEFT, RTGS सुविधा उपलब्ध
MOBILE बँकिंग
₹ 2200 कोटींच्या वर व्यवसाय
GOLD LOAN उपलब्ध
CORE बँकिंग
LIC पॉलिसी काढण्याची व प्रीमियम भरण्याची सुविधा
MSEDCL विज बिल भरणा केंद्र
LOAN सेवा सुविधा
GIC पॉलिसी काढण्याची व नुतनीकरणाची सुविधा
शुभेच्छुक
सौ. निलिमा बावणे
अध्यक्ष
सौ. सारिका पेंडसे
उपाध्यक्ष
संस्थेच्या सर्व संचालक मंडळ, पदाधिकारी व कर्मचारी वृंद
24x7 मोबाईल बँकिंग
आता
NEFT
RTGS
IMPS
UPI
आपल्या मोबाईल द्वारे कुठेही, कधीही
बँकिंग व्यवहार तुमच्या मोबाईल वर
डिजिटल बँकिंग सुविधा
Cash Less बँकिंग व्यवहार
BANKING P.O
90 DAYS TRAINING
BANKING POINT PROGRAMME P.O.
A Bridge of Banking Career
Join The Dharampeth Mahila Society
Probationary Officer Programme P.O.
Enroll Now & Grab The Opportunity
7888002023
100% Placement Guarantee*
दि धरमपेठ महिला
मल्टी स्टेट को-ऑप. सोसायटी लि., नागपूर. (महाराष्ट्र, छत्तिसगढ व मध्यप्रदेश)
आपला परिवार, आपली संस्था!
30 वर्ष विश्वासाचे
मुख्य कार्यालय : प्लॉट नं 42-अ सीताराम भवन, हनुमान मंदीर समोर, रामनगर चौक, शिवाजीनगर, नागपूर-440010.
फोन : 0712-2220716, 2524337, 2520303



सर्व सभासद, ग्राहक व हितचिंतक यांना
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!
रा.ल. उपाख्य भाऊसाहेब शेळके
संस्थापक अध्यक्ष, राजर्षी शाहू परिवार
कॅश काढणे व जमा करतांना विड्रॉल किंवा
जमा स्लीप न भरता सुविधा देणारी संस्था...!
तुमच्या धाडसाला आमची अर्थपूर्ण साथ
Shahu Pay
Payments App
करा नविन सुरवात
इंटरनेट बँकिंग
डोअर स्टेप बँकिंग
मोबाईल बँकिंग
शाहू पे
RTGS
NEFT
संदीप शेळके
अध्यक्ष राजर्षी शाहू परिवार
संस्थेची वैशिष्ट्ये
१. एकुण ६९ शाखांचा विस्तार
२. ८०० कोटींचा व्यवसाय
३. १००००० सभासद संख्या
MAHAVITARAN
MSEB
वीज बिल भरणा केंद्र
Shahu Pay
खातेदारांना पेपरलेस् विड्रॉल देणारी
राजर्षी शाहू एकमेव पतसंस्था
Missed Call
Balance check सुविधा
WhatsApp Banking
ISO ९००१:२०१५ मान्यता प्राप्त संस्था
पुरस्कार प्राप्त संस्था
सतत दोन वर्षापासून FCBA पुरस्कार प्राप्त संस्था
राजर्षी शाहू
र.नं. ८९१
राजर्षी शाहू
मल्टीस्टेट को ऑप क्रेडीट सोसायटी म.बुलडाणा
सौ. मालती शेळके
अध्यक्षा, राजर्षी शाहू मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसा. बुलडाणा
www.rajarshishahumultistate.com +९१ - ९५२८४९०४९०

# प्रशिक
## ग्रामीण सहकारी पतसंस्था
पुंजानी कॉम्प्लेक्स, कारंजा (लाड) जि. वाशिम. र. नं. 760

**सर्वांना दीपावलीच्या**
**हार्दिक शुभेच्छा!**

प्रशिक फार्मर प्रोड्युसर कंपनी तर्फे

सर्व शेतकरी होतील माल माल आणि खुशहाल!

बीज उत्पादन केंद्र तथा
सोयाबीन बियाणे विक्री केंद्र

**दर्जेदार बियाणे**

**KDS 726/ KDS 753**

सर्व शेतकरी बांधवांना
अल्प दरात उपलब्ध
विक्री वेळ- सकाळी १० ते सायं. ६

संपर्क -
व्यवस्थापक - ९५८८६ ६१८८२

* स्थळ : मुर्तिजापूर रोड,
रिद्धी सिद्धी मंगल कार्यालय
नायरा पेट्रोल पंपासमोर,
कारंजा (लाड)





वेगवान अर्थव्यवस्थेला विश्वासाचा आवाज!
INDIA'S MOST TRUSTED BRAND
शुभ दीपावली
ADVITA CREDIT
SCAN WITH BHIM UPI
QR PAYMENT SOLUTION WITH SOUND BOX
Powerful Speaker Clear Audio
Long-lasting 10 day Battery
4G Network Connectivity
विविध अर्थसंस्थेसाठी विशेष ऑनलाईन / आधुनिक तंत्रज्ञानाची प्रणाली
पतसंस्था
को-ऑप. सोसायटी
निधी कंपनी
को-ऑप. बँक
मल्टीस्टेट
क्रेडिट को-ऑप. सोसायटी
अधिक महितीसाठी संपर्क करा
श्री. अतुल वाकोडे 9552823088
श्री. प्रविण भंडारकर 7972680755
श्री. विशाल पद्यावर 9604026006
हेल्पलाईन 9552823088
मुख्य कार्यालय : ए-३०३, स्वागत इन्क्लेव्ह हाऊसिंग सोसायटी, जांभुळवाडी रोड, आंबेगाव खुर्द, हवेली, पुणे. (महाराष्ट्र) ४११०४६
ऑनलाईन डेमोसाठी 96 0402 6006 | Email : info@advitacredit.in | www.advitacredit.in
कार्यक्षेत्र : • महाराष्ट्र • गोवा • मध्यप्रदेश • गुजरात • छत्तीसगड • राजस्थान • उत्तरप्रदेश • हरियाणा • कर्नाटक • तेलंगना


नेटविन परिवारातर्फे आपणा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
netwin
Ideas to Life
एकमेव उद्देश... ग्रामीण बँकिंगला भारताच्या अर्थव्यवस्थेत समाविष्ट करणे.
₹ १६.६७ कोटी
प्रति महिना IMPS व्यवहार
₹ २५० कोटी
प्रति महिना उलाढाल
३ लाख
व्यापारी डिजिटल व्यवहाराचे भागीदार
९,०७,१६८
सरासरी मासिक UPI व्यवहार
NetPay-UPI QR Code
Certification's
CMMI
TIER3 DATA CENTER
CISA
अधिक माहिती साठी संपर्क करा
०२५३ ६६५ १५००
sales@netwinindia.in
www.netwin.in



तेजस्वी मुहूर्तावर नवचैतन्याचे नवकिरण यावे
सुखसमृद्धी अन् आरोग्याने प्रत्येक घर उजळावे!
जनता सहकारी बँक लि., पुणे
दीपावली म्हणजे सुख, समृद्धी आणि आनंदाचा उत्सव. या उत्सवात प्रत्येकाच्या अंगणात प्रगती, समृद्धी आणि स्वप्नपूर्तीचे आकाशदीप उजळावे यासाठी 'जनता बँक' सदैव आपल्या सेवेत तत्पर असते. वैयक्तिक गरज असो की व्यावसायिक कारण, घराचे स्वप्न असो की शिक्षणाचे ध्येय... तुमच्या प्रत्येक गरजेला आम्ही तुमच्यासोबत आहोत. विश्वासाचे नाते अधिक मजबूत करत, आधुनिकतेची कास धरत ग्राहकाभिमुख सेवा देत तुमच्या आशा-आकांक्षाना पूर्णत्वाकडे नेण्यासाठी 'अर्थपूर्ण' सोबती बनून तुमच्या सोबत आहोत.
चला, समृद्धीचा दीप लावूया.. दीपावलीला अर्थपूर्ण बनवूया.
दीपावलीचा आनंद द्विगुणित करणाऱ्या बँकेच्या विविध कर्ज योजना
बँकेचे सर्व सभासद, खातेदार व हितचिंतकांना दीपावलीच्या मंगलमय शुभेच्छा!!
जनता वाहनकर्ज कर्ज योजना
जनता गृहकर्ज कर्ज योजना
लोन अगेन्स्ट प्रॉपर्टी
जनता ई-बाईक कर्ज योजना
जनता सहकारी बँक लि., पुणे
(मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक)
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258
www.janatabankpune.com


50+ YEARS OF MOMENTUM
अर्थ सहकारेण कल्याणम्
दि कल्याण जनता सहकारी बँक लि.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
या दिवाळीत चला तुमची स्वप्नं उजळवूया!
गृह कर्ज
सोने तारण कर्ज
व्यवसाय कर्ज
SPECIAL FESTIVE OFFER
वाहन कर्ज
शैक्षणिक कर्ज
वैयक्तिक कर्ज
TOLL FREE: 1800 233 1919 kalyanjanata.in KJSBank


जनता
नागरी सहकारी पतसंस्था यवतमाळ
रजि.नं. २२१ मुख्यालय : शिवाजीनगर, यवतमाळ
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!!
* विविध कर्ज योजना *
सोने तारण कर्ज
वैयक्तिक कर्ज
गृह तारण कर्ज
वाहन कर्ज
* विविध ठेव योजना *
• मुदत ठेव (F.D.)
• दाम दुप्पट
• एम.आय.एस. (MIS)
• रिकरींग (R.D.)
* संस्थेची वैशिष्ट्ये *
• स्वमालकीची मुख्यालय इमारत
• सर्व शाखा पूर्णतः संगणकीकृत
• ग्राहकांना तत्पर सेवा
• लॉकर सेवा उपलब्ध
• आरटीजीएस/एनईएफटी सेवा उपलब्ध
• नागरिकांकरिता वीज बील स्वीकृती केंद्र सुविधा
अनिल ना. दंडे
अध्यक्ष
रामदास भा. नाईक
उपाध्यक्ष
अजय अ. दंडे
मुख्य कार्यकारी अधिकारी
व सर्व
संचालक मंडळ
मुख्य शाखा, आर्णी रोड शाखा, दारव्हा रोड शाखा, यवतमाळ

VISUAL
INFOSYSTEMS PRIVATE LIMITED

3000+ SATISFIED CLIENTS

# व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.

A Core Banking Software Solutions

## छत्रपती संभाजीनगर



संपूर्ण महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेर अग्रेसर असलेले
सर्वाधिक पसंतीचे कोअर बँकिंग सॉफ्टवेअर



## दीपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा..!

* ऑडीटसाठी लागणारे सर्व रिपोर्ट उपलब्ध
* डोअर स्टेप बँकिंग मोबाईल ॲप
* क्रेडिट स्कोअर रिपोर्ट * क्यू. आर. कोड कलेक्शन
* आधार/पॅन पडताळणी * इंटरनेट बँकींग
* ऑनलाईन मोबाईल बँकींग
* मॅनेजमेंट मोबाईल ॲप
* मोबाईल ॲप फॉर बँक स्टाफ
* कस्टमर ॲप
* रिकव्हरी ॲप

**CERTIFICATIONS:**
VAPT & CERT In Certification for Web and Android App Certified by TUV-SUD ISO 9001:2015 ISO/IEC 27001:2013

आजच आपल्या बँक, पतसंस्था, मल्टीस्टेट, कर्मचारी सोसायटी, एन बी एफ सी (NBFC) मध्ये कोअर बँकिंग सॉफ्टवेअर सुरु करा.

**Contact Us**

कॉर्पोरेट ऑफिस :
व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.
अ-२४-५, चिखलठाणा औद्योगिक क्षेत्र,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००६

हेड ऑफिस :
व्हिज्युअल इन्फोसिस्टीम्स प्रा.लि.
थर्ड फ्लोर, मालन प्लाझा.
दुर्गा माता मंदिरा जवळ, आकाशवाणी रोड,
छत्रपती संभाजीनगर - ४३१००५

+91 9423000202 +91 9209000096
+91 9763878000 +91 8080342437
+91 8080762775 +91 9763873000
+91 9545002127 +91 9730070680

Email : info@visualinfosystems.in website : www.visualinfosystems.com

|| बिना संस्कार नहीं सहकार । बिना सहकार नहीं उद्धार ||

# अनुक्रम


* 'सहकार क्षेत्र शुद्ध, सद्हेतूने पुढे जाण्यासाठी सहकार भारतीने दबदबा निर्माण करावा' – राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची अपेक्षा....१३
* आरबीआय संचालक सतीश मराठे – विशेष मुलाखत....१७
* पतसंस्थांचे नागरी सहकारी बँकेमध्ये रूपांतर होणे अपरिहार्य....१८
* सहकार विषयावरील जागतिक स्तरावरील परिषद नवी दिल्लीत होणार....१९
* देशातील आर्थिक परिसंस्था सक्षम करण्यावर आरबीआयचा भर : सतीश मराठे....२०
* बँकांप्रमाणे पतसंस्थांना ठेवींवर विमा संरक्षण मिळाले पाहिजे : डॉ. उदय जोशी....२१
* राजकारण विरहित सहकार चळवळच ठरणार आहे सक्षम....२२
* सहकाराचा प्रचार आणि प्रसार करणारे पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील अध्यासन....२३
* पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने....२४
* देशातील साखर उद्योगाला नवी दिशा देणारा आराखडा तयार....२६
* विशेष मुलाखत – सुरेश पाटील....२७
* बुलडाणा अर्बन अन्न सुरक्षेसाठी गोदाम श्रृंखलेवर भर देणार....२८
* 'राज्यातील सहकार समृद्धीकडे जावला हवा' – सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ....२९
* विविध कार्यकारी संस्थांनी नवनवीन व्यवसाय देखील करावेत : – सहकार मंत्री वळसे पाटील....३०
* विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करणार : सहकार आयुक्त तावरे....५१
* कॅश क्रेडिट, बँकांसाठी उत्तम कर्ज व्यवहार....५२
* नागरी सहकारी बँका – परिस्थितीनुरूप बदलाची अपेक्षा....५३
* आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आधारित आधुनिक बँकिंग सेवा – भविष्यातील वेध....५४
* डिजिटल भारत....५६
* जनता सहकारी बँकेने राखले एनपीएचे प्रमाण शून्य टक्के....५७
* चुकीच्या बाबींना महिला संचालकानी विरोध करावा – विद्याधर अनास्कर....५८
* जळगाव जनता सहकारी बँकेला बँक्स असोसिएशनचा पुरस्कार....५९
* श्री गोवर्धनसिंहजी रघुवंशी सहकारी बँकेला सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार प्रदान....६०
* गोदावरी अर्बन 'सहकार भूषण' पुरस्काराने सन्मानित....६१
* मनी म्यूल अकौंट....६२
* सहकार क्षेत्रामुळेच समाजाचा सर्वांगीण विकास शक्य – सुरेश प्रभू....६३
* एन के जी एस बी सहकारी बँकेला विशेष पुरस्कार प्रदान....६४
* गृहरचना संस्था : शंका समाधान....६५
* साधना सहकारी बँकेस पुरस्कार प्रदान....६८


## जानेवारी २०२५ पासून 'मॅगझीन पोस्ट' द्वारा वितरण

सहकार सुगंधचा अंक न मिळण्याच्या तक्रारी असल्याने पोस्ट खात्याच्या नवीन मॅगझीन पोस्ट यंत्रणेद्वारे वर्गणीदारांना १००% अंक मिळण्याची खात्री यापुढे राहणार आहे. या मॅगझीन पोस्टचा खर्च अधिक असल्यामुळे नाईलाजाने वर्गणीचे दर वाढवावे लागत आहेत. तरी कृपया वर्गणीदार, वाचक, जाहिरातदार यांनी आवश्यक सहकार्य करून नवीन दराप्रमाणे नोंदणी करावी, ही विनंती. – संपादक


'सहकार सुगंध' हे मासिक मालक, सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि. यांचेसाठी मुद्रक व प्रकाशक भालचंद्र कुलकर्णी यांनी एन. आर. एंटरप्राजेस, स.नं. ३९, माणिकबाग इंडस्ट्रियल इस्टेट, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे छापून ए-१२, निखिल पार्क सी सोसायटी, माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे – ४११ ०५१ येथे प्रसिद्ध केले.

**संपादक** – भालचंद्र कुलकर्णी

'Sahakar Sugandha' monthly is owned by 'Sahakar Printing & Publications Pvt. Ltd., printed & published by Bhalchandra Kulkarni, Printed at N. R. Enterprises, S.No. 39, Manikbaug Industrial Estate, Sinhgad Road, Pune - 411051 & published at A-12, Nikhil Park, 'C' Society, Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051.
Editor : Bhalchandra Kulkarni



# सहकार सुगंध

ISBN : 978-81-940842-0-4

**ऑक्टो-नोव्हें. २०२४ (जोडअंक) (वर्ष २०, अंक ०७-०८)**



**संपादक :**
भालचंद्र कुलकर्णी (मोबाईल : ९८२२८८२५०१)

**सहसंपादक :**
विनायक कुलकर्णी (मोबाईल : ९४२२३२१६२६)

**सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.**
**संचालक मंडळ :**
डॉ. उदय जोशी (संचालक, राष्ट्रीय महामंत्री)
सीए सतीश मेढी (संचालक, राष्ट्रीय कोषाध्यक्ष)
श्री. विनय खटावकर (संचालक)
श्री. भालचंद्र कुलकर्णी (व्यवस्थापकीय संचालक)

**मार्गदर्शक : सहकार भारती पदाधिकारी**
श्री. दीनानाथ ठाकूर (राष्ट्रीय अध्यक्ष)
श्री. रमेश वैद्य (संरक्षक)
श्री. संजयजी पाचपोर (राष्ट्रीय संघटनमंत्री)
डॉ. शशिताई अहिरे (महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष)
श्री. विवेक जुगादे (महाराष्ट्र प्रदेश महामंत्री)
श्री. संजय परमणे (महाराष्ट्र प्रदेश संघटनमंत्री)
डॉ. मुकुंद तापकीर (डॉ. विखे पाटील सहकार अध्यासन प्रमुख)
श्री. सतीशजी मराठे, श्री. ज्योतिंद्रभाई मेहता,
श्री. विष्णूजी बोबडे

**जाहिरात व वर्गणीदार विभाग समन्वयक :**
सौ. अंजली लागू, श्रीमती पौर्णिमा राईलकर

**मुखपृष्ठ मांडणी, अक्षरजुळणी व डिझाइन :**
सौ. अर्चना गाढवे


**दि. १ जानेवारी २०२५ पासून वर्गणीचे नवीन दर**
**वार्षिक वर्गणी :** रु. ७००/- फक्त
**त्रैवार्षिक वर्गणी :** रु. १८००/- फक्त
खालील QR कोड स्कॅन करून ऑनलाइन पेमेंट करावे.

कृपया चेक / डीडी 'सहकार प्रिंटिंग अँड पब्लिकेशन्स प्रा. लि.' या नावाने पाठवावा. (पुणे येथे देय असलेला)


**सहकार सुगंध कार्यालय :**
ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट, ५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे – ४११०३०. मो. : ८८०५९८१६७३
ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

# सर्वसमावेशक सहकार धोरणाची गरज!

अंधकारातून प्रकाशाकडे, तिमिराकडून तेजाकडे जाणाऱ्या दीपोत्सवाच्या सर्वप्रथम आपणा सर्वांना मंगलमयी शुभेच्छा!

सहकार चळवळीसाठी पथदर्शी राहील, असे नवीन राष्ट्रीय सहकार धोरण लवकरच जाहीर केले जाईल, असे सुतोवाच या समितीचे अध्यक्ष सुरेश प्रभू यांनी नुकतेच केले. तब्बल ४८ सदस्यांनी गेले ३ वर्ष या नवीन सहकार धोरणासाठी अनेक सभा घेतल्या, चर्चासत्रे घेतली, अनेकांची मते जाणून घेतली. त्यातून एक सर्वसमावेशक धोरण या क्षेत्रासमोर येईल असे दिसते. सहकाराच्या माध्यमातून विकसित भारत करण्याचा मुख्य उद्देश या धोरणाचा आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाची सहकार क्षेत्राला जोड देण्याची मध्यवर्ती कल्पना या धोरणात असेल असेही प्रभू यांनी स्पष्ट केले आहे.

सर्व समाजाची क्षमता एकजुटीने वापरली गेली तर भारताचा विकास मोठ्या गतीने पुढे जाईल. यासाठीच स्थानिक पातळीवरील सहकार चळवळ ही महत्वपूर्ण आहे. शेतीप्रधान असलेल्या आपल्या देशातील शेतकरी श्रीमंत झाला तरच देश श्रीमंत होईल आणि त्यासाठी सहकारी संस्थांची मोठी मदत होऊ शकेल. जी बऱ्याच प्रमाणात होताना दिसते देखील आहे. आपले दरडोई उत्पन्न जगाच्या तुलनेत १३६ व्या क्रमांकावर आहे. देश मोठा होईल, व्यक्ती कधी मोठी होणार? हे साध्य करण्यासाठी सहकार चळवळीच्या निकोप वाढीची आवश्यकता आहे. त्यासाठी सहकारातील कार्यकर्ते प्रशिक्षित आणि तंत्रज्ञानाची कास धरणारे हवेत. सभासदांचे हीत जपणाऱ्या, तंत्रज्ञानावर आधारित कामकाज करणाऱ्या संस्थाच यापुढे टिकतील, त्यादृष्टीने नव्या सहकार धोरणात स्पष्टता असेल असे वाटते.

ग्रामीण भागाचा विकास करण्याची गुरुकिल्ली सहकारात आहे. देशभरातील सुमारे १ लाखांच्या आसपास असणाऱ्या विविध कार्यकारी सोसायट्या म्हणजेच पॅक्स यांना संगणकीकरणातून जोडले जात आहे, आता प्रत्येक गावात किमान एक विकास सोसायटी स्थापन करण्याची योजना केंद्रातील सहकार मंत्रालय आखत आहे. शेतीबरोबरच दुध, मत्स्य, कुक्कुटपालन, शेळीपालन, सुतगिरण्या आणि कृषीमाल प्रक्रिया उद्योग हा ग्रामीण भागाशी आणि शेतकरी वर्गाशी जोडला जाईल. त्याचबरोबर दूध डेअरी आणि मत्स्य व्यवसायाला चालना देणाऱ्या योजना देखील केंद्र स्तरावरुन केल्या जात आहेत. शेती व शेतीपूरक व्यवसायासाठीची सर्व आर्थिक ताकद सहकारी संस्थांमधूनच मिळेल, ज्यावर स्थानिक सभासदांचे पूर्ण नियंत्रण असेल, असाच नवीन प्रवाह सध्या केंद्राच्या सहकार मंत्रालयाने दिला आहे. राज्य सरकारच्या मदतीने या नव्या धोरणाची अंमलबजावणी केली जाईल, अशीच या धोरणाची रचना केलेली आहे, असेही प्रभू यांनी स्पष्ट केले.

सहकाराच्या त्रिस्तरीय रचनेमधून सर्वात तळाशी असलेल्या विकास सोसायट्यांच्या (पॅक्स) माध्यमातून शेतकरी वर्गाला आर्थिक सहाय्य केले जाते. राज्य सहकारी बँकेकडून जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे आणि पुढे विकास सोसायट्यांमार्फत कर्जवाटप प्रामुख्याने शेतकरी आणि मजूर वर्गाला केले जाते. ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारणेसाठी पॅक्सना बळकटी देण्याची मोठी गरज आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी सहकार हेच प्रमुख माध्यम आहे, याचा अधिकाधिक विस्तार करण्याची योजना केंद्र सरकारकडून होईलच, मात्र सहकारातील कार्यकर्त्यांनी नवनवीन सहकारी संस्था स्थापन करणे, अधिकाधिक व्यवसाय सहकारातून उभे करणे यातूनच सहकाराला खरी बळकटी प्राप्त होणार आहे. या प्राथमिक सहकारी संस्थांना अनेक व्यवसाय सुरु करण्यासाठी देखील परवानगी दिली जाणार आहे व त्याचा समावेश सहकार धोरणात केला गेला आहे, हे महत्त्वाचे पाऊल म्हणावे लागेल. त्यासाठी नवीन विकास सोसायट्या स्थापण्यासाठी सोपी व सुटसुटीत व्यवस्था मात्र निर्माण व्हायला हवी.

सहकार भारतीच्या देशभरातील कार्याची दखल यानिमित्ताने घ्यावीशी वाटते. देशभरातील सर्वच राज्यांमध्ये सहकार भारतीचे कार्यकर्ते काम करीत आहेत. सुमारे ७५० जिल्ह्यांपैकी ६०० पेक्षा अधिक जिल्ह्यांमध्ये सहकार भारती कार्यरत आहे. सहकारातील कार्यकर्त्यांनी सहकारात काम करतानाच विविध संस्था, महासंघ, असोसिएशन अशा सर्वच स्तरावर सक्रिय झाले पाहिजे आणि सहकार क्षेत्रात चांगले बदल घडवण्यासाठी अग्रेसर राहिले पाहिजे. सहकार भारतीचे यंदाचे राष्ट्रीय अधिवेशन ६ ते ८ डिसेंबर रोजी अमृतसर (पंजाब) येथे होत आहे. या अधिवेशनाच्या दृष्टीने सहकार भारतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी अधिक कार्यविस्तार करण्याची गरज आहे. सहकाराचा दीप अधिक तेजस्वी व्हावा, सहकाराचे क्षेत्र उजळून निघावे हीच मनोमन इच्छा सहकारातील आपण सगळे कार्यकर्ते तळमळीने व्यक्त करीत सहकार क्षेत्रात काम करीत आहोत.

नुकतेच सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाचे अधिवेशन शिर्डी येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले. विविध विषयांवरील चर्चा आणि विषय मंथन झाल्याने सहकारातील कार्यकर्त्यांना नवी दिशा मिळाल्याचे पाहायला मिळाले. सन २०२१ मध्ये झालेल्या आळंदी येथील अधिवेशनानंतरच हे अधिवेशन झाले. आळंदी येथील अधिवेशनात सहकार महर्षी या ग्रंथाचे प्रकाशन झाले होते. आता दुसऱ्या सुधारित आवृत्तीचे प्रकाशन शिर्डी येथे करण्यात आले. सहकार क्षेत्रासाठी अव्याहतपणे कार्यरत असणाऱ्या असंख्य कार्यकर्त्यांनी आपले आयुष्य वेचले अशा सर्वांप्रती कृतज्ञता, आदरांजली वाहण्याबरोबरच या महनीय व्यक्तींचे चरित्र एकत्रितपणे सहकार महर्षी ग्रंथातून प्रसिद्ध झाले आहे. शिर्डी येथील कार्यक्रमात राजस्थानचे महामहिम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी ग्रंथाबद्दल गौरवोद्गार काढताना म्हटले की, सहकाराच्या सकारात्मक बाजूचे चित्रण सर्वांसमोर यायला हवे. सकारात्मकपणे सहकार चळवळीची वाटचाल अखंडपणे सुरू आहे, ज्यामध्ये अशा महनीय व्यक्तींचे अतुलनीय योगदान आहे. त्याचबरोबर सहकार हा सामाजिक आशय असलेला विषय असला तरी त्याची जबाबदारी आहे आणि सभासदांना आपण उत्तरदायित्व आहोत, याचे भान सहकारातील कार्यकर्त्यांनी राखण्याची गरज आहे.



संपादकीय...

सहकारातून समृद्धीकडे जाताना सहकाराचा एक एक दीप लावत चळवळीचे द्योतक असलेली ही दीपमाळ प्रकाशमान करण्याचा आपला सर्वांचा प्रयत्न सातत्याने कार्यरत राहावा हीच प्रार्थना या दिपोत्सवाच्या निमित्ताने करु या! सहकार सुगंधचे सर्व वाचक, जाहिरातदार, हितचिंतक, सर्वच सहकारी संस्थांचे व असोसिएशन्स, फेडरेशन्सचे पदाधिकारी, सहकार भारतीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते या सर्वांना दीपावलीच्या मनापासून शुभेच्छा! यंदाची दीपावली आपणा सर्वांना भरभराटीची व आनंदाची जावो. जय सहकार!!!



# ‘सहकार क्षेत्र शुद्ध, सद्हेतूने पुढे जाण्यासाठी सहकार भारतीने दबदबा निर्माण करावा’

## - राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांची अपेक्षा

* पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील नगरी-

शिर्डी - सहकार क्षेत्रातील अपप्रवृत्तींना आळा घालण्याची गरज असून सहकार क्षेत्राची सकारात्मक बाजू समाजासमोर येण्यासाठी सहकार भारतीने लक्ष घालावे. तसेच कार्यांच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात दबदबा निर्माण करावा असे राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी येथे सांगितले. प्रदेश सहकार भारतीचे १४ वे त्रैवार्षिक अधिवेशन नुकतेच झाले. स्व. अण्णासाहेब गोडबोले पुरस्कार प्रदान सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. यावर्षीचा पुरस्कार आमदार प्रकाश आवाडे यांना प्रदान करण्यात आला. यावेळी सहकार महर्षि ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन करण्यात आले.

राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, सहकार भारती राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी, सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटनमंत्री संजय पाचपोर, प्रदेशाध्यक्षा शशिताई अहिरे, महामंत्री विवेक जुगादे, ग्रंथाचे आणि सहकार सुगंध मासिकाचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, स्व. अण्णासाहेब गोडबोले यांचे नातू चेतन लागू, आमदार आशुतोष काळे आदी व्यासपीठावर होते. तसेच सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि आरबीआय संचालक सतिश मराठे, राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे होते. अधिवेशनासाठी सहकारी बँक, पतसंस्था, गृहरचना संस्था विविध सहकारी संस्थांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सहकार भारतीचे विविध जिल्ह्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

**सहकार भारती महाराष्ट्र प्रदेश अधिवेशन शिर्डी...**

*** स्पर्धेच्या युगात सक्षमपणे उभे राहण्याची गरज -**

राज्यपाल बागडे यांनी सांगितले की, सध्या स्पर्धेचे युग आहे. यामध्ये आपण अधिक सक्षमपणे उभे राहण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सुयोग्य असे व्यवस्थापन हवे. संस्थेला तोटा होणार नाही यासाठीचे नियोजन करण्याची गरज आहे. ज्या संस्था बुडाल्या, त्या संस्थांचे ठेवीदार अडचणीत आले आहेत. संस्थेतील आर्थिक निधी हा अन्यत्र वळविण्यात येतो आहे. त्यामुळे व्याज देण्यात अडचणी निर्माण होत आहेत. ज्या मंडळींनी पतसंस्थांवर मालकी गाजवली, त्या अडचणीत आल्याचे दिसते. तर काही बुडाल्या आहेत आणि म्हणून जबाबदारीची जाणीव ठेवून काम करण्याची गरज आहे. ही भूमिका घेऊन सहकार भारती कार्यरत आहे. सहकाराचा विचार, उद्देश लक्षात घेऊन संस्था चालविण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी परस्परांना मदत करण्याची भूमिका ठेवून काम करण्याची गरज आहे. यासाठी सहकार भारतीने पुढाकार घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी सहकार भारती बाबतच्या व्यक्तिगत तसेच सांगली अर्बन बँकेबाबतच्या आठवणींना उजाळा दिला.

*** विविध कार्यकारी सोसायट्या अधिक बळकट व्हाव्यात -**

महसूलमंत्री विखे पाटील म्हणाले की, सहकाराच्या क्षेत्रात अनेक स्थित्यंतरे झाली. त्यामुळे सहकार चळवळीला जी गती अपेक्षित आहे, ती आली नाही. ही चळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न झाला आहे. पण या चळवळीच्या सरकारीकरणाचा प्रयत्न झालेला दिसतो. तसेच काहींचे चळवळीसाठी काय योगदान आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. सहकार क्षेत्रातील साखर कारखाने कमी होत आहेत तर खासगी साखर कारखाने संख्या वाढत आहे. यामागचे कारण शोधण्याची गरज आहे. सहकार क्षेत्रात पतसंस्था चळवळीचे



सहकार भारतीचे संस्थापक लक्ष्मणराव इनामदार यांच्या प्रतिमेचे पूजन करतानाचे छायाचित्र. मध्यभागी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे. डावीकडून भालचंद्र कुलकर्णी, महामंत्री डॉ. उदय जोशी, उजवीकडे महामंत्री जुगादे, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, प्रदेशाध्यक्षा डॉ. अहिरे.

काम आघाडीवर आहे. सहकार क्षेत्राला सध्याच्या स्पर्धेच्या काळात आणखी वाव मिळावा त्याची व्यापकता वाढावी, यासाठी राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरु करण्यात आले आहे. त्याचा सहकार क्षेत्राच्या विकासासाठी नक्कीच फायदा होणार आहे. याबरोबर विविध कार्यकारी सोसायट्यांच्या प्रगतीसाठी व्यापक प्रमाणावर प्रयत्न होणे आवश्यक आहे. काहींनी ही चळवळ बटीक केली होती, ती मुक्त झाली पाहिजे, यासाठी सहकार भारतीने अधिक व्यापक प्रमाणावर प्रयत्न करणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

*** महिला सबलीकरणावर भर हवा –**

पुरस्काराला उत्तर देताना आमदार आवाडे यांनी सांगितले की, सहकाराच्या चळवळीत महिलांचा सहभाग अधिक मोठ्या प्रमाणावर कसं वाढविता येईल. त्याचप्रमाणे त्यांचे सबलीकरण तसेच केवळ महिलांच्या विविध कार्यकारी सोसायट्या कार्यरत असाव्यात यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न होण्याची गरज आहे. याबाबत सहकार भारतीने गंभीरपणे विचार करावा आणि त्यानुसार कार्यवाही करावी. पूर्वीच्या काळात स्व. इनामदार तसेच स्व. गोडबोले या नावामुळे सहकारी बँक चळवळ वाढली. यामधून अनेकांना नवा विचार, प्रेरणा मिळाली आहे. असे असले तरी सहकार क्षेत्रात युवक वर्गाची संख्या कमी जाणवते आहे यावर नेमकी कोणती उपाययोजना करता येईल, त्या अनुषंगाने विचार झाला पाहिजे. हा पुरस्कार मिळाला याचा नक्कीच आनंद आहे. पुरस्काराचा मनापासून स्वीकार करतो असे ते म्हणाले.

*** विचार मंथनाची गरज –**

महामंत्री डॉ. जोशी यांनी स्व. गोडबोले यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला. ते म्हणाले, सध्याच्या काळात सहकाराची दशा आणि दिशा यावर गांभीर्याने विचार मंथन झाले पाहिजे. त्याचबरोबर सहकार चळवळ ही अधिकाधिक प्रमाणात प्रवाहित होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची गरज आहे असे त्यांनी सांगितले.

संपादक कुलकर्णी यांनी स्वागत करुन देशभरातील सहकार भारतीच्या कार्याचा आढावा घेतला. तसेच सहकार महर्षि ग्रंथामागची संकल्पना, प्रथम आवृत्तीला मिळालेला प्रतिसाद आणि स्व. गोडबोले पुरस्कार याबाबतची माहिती सांगितली. स्व. गोडबोले यांचे नातू चेतन लागू यांनी केंद्रीय स्तरावरील पुरस्कारासाठी दहा लाख रुपयांचा निधी प्रदान केला असल्याची माहिती सांगितली. या निधीच्या व्याजातून यापुढील काळात केंद्र स्तरावर पुरस्कार देण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. सहकार भारतीचे महामंत्री जुगादे यांनी आभार, तर प्रदेशचे संपर्क प्रमुख संजय परमणे यांनी सूत्रसंचालन केले.

*** प्रदेश अधिवेशन उद्घाटन –**

*** सहकार क्षेत्रासाठी कार्यकर्त्यांनी रोल मॉडेल तयार करावे –**

सहकार क्षेत्राला नव्याने ऊर्जितावस्था येण्यासाठी या क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी रोल मॉडेल तयार करुन केंद्र सरकारच्या अनुकूल धोरणाचा सहकाराच्या वाढीसाठी कशा प्रकारे काम करता येईल याचा विचार करुन प्रत्यक्ष कार्यवाही करावी असे आवाहन सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी यांनी केले आहे. येथील साई पालखी निवारामध्ये सहकार भारतीच्या त्रैवार्षिक अधिवेशन उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

उद्घाटनाच्या आधी ध्वजारोहण करण्यात आले. उद्घाटन सत्रास सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि आरबीआय संचालक सतिश मराठे, प्रदेशाध्यक्ष शशिताई अहिरे, महामंत्री विवेक जुगादे, सहसंघटनमंत्री शरद जाधव, अधिवेशन आयोजक रवी बोरावके, सहआयोजक अविनाश शिंदे उपस्थित होते. प्रदेश कार्यालय प्रमुख श्रीकांत पटवर्धन यांनी सहकार गीत सादर केले.

*** विश्वस्ताच्या भूमिकेतून काम करावे –**

डॉ. जोशी यांनी सहकार भारतीच्या स्थापनेमागची भूमिका विशद करतांना सांगितले की, ४५ वर्षापेक्षा अधिक काळ सहकार भारती एक विचार घेऊन सहकार क्षेत्रात काम करीत आहे. त्यामागे तत्त्वे अधिक विस्तारण्याचा जपण्याचा प्रयत्न आहे. तसेच काम करणारे कार्यकर्तेदेखील संस्कारित असले पाहिजेत, ही संस्थापक लक्ष्मणराव इनामदार यांची भूमिका होती. सहकाराची मूलतत्त्वे आत्मसात करणे, त्याचा कार्यात विचार करणे हा स्थापनेमागचा उद्देश आहे. मुख्य म्हणजे सहकार क्षेत्रात काम करताना राजकारणाचे जोडे बाहेर असावेत ही ठाम भूमिका आहे. त्यानुसार आजही सहकार भारतीची वाटचाल सुरु आहे. सहकार भारतीच्या व्यासपीठावर आजवर विविध राजकीय पक्षांचे नेते आले

आहेत. कारण हे सहकार क्षेत्राचे काम आहे. आपण संस्थेचे मालक नाही तर विश्वस्त म्हणून काम करणे गरजेचे आहे हा विचार पुढे आला आहे. या विचारातूनच देशाच्या विविध भागात सहकार भारतीचा विस्तार होतो आहे.

*** सहकार चळवळ ही लोकचळवळ –**

निवडणुकीत सहकार भारतीचे पॅनेल असणार नाही हा निर्णय घेण्यात आला होता. असे नमूद करुन ते म्हणाले, पण आता ज्या शिखर संस्था आहेत, त्याच्या निवडणुकीत सहकार भारतीने सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे आणि याची सुरुवात झाली आहे. यापुढील काळात विविध शिखर संस्थांच्या निवडणुकीत सहकार भारती असणार आहे. विविध सहकारी संस्थांमध्ये प्रामाणिक कार्यकर्त्यांची आवश्यकता आहे. कारण सहकार चळवळ ही लोक चळवळ आहे त्यामुळे फार नियमाच्या चौकटीत बांधले जाऊ नये. तरच सहकार क्षेत्राला उर्जितावस्था येणार आहे. आपल्या विचारांचा प्रभाव वाढविण्यासाठी विविध संस्था उभारण्याची गरज आहे. तसेच बँक आणि पतसंस्था यापलीकडे जाऊन अधिक वेगाने काम करण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली. त्यासाठी आपल्यातील सक्रियता वाढणे गरजेचे आहे. सहकार भारतीची विविध राज्यांची अधिवेशने होत आहेत. तसेच विविध प्रकोष्ठांची अधिवेशने झाली. त्यामध्ये विविध घटकांनी मागणीपत्र तयार केली आहेत. ती सर्व केंद्र सरकारला देण्यात येणार आहेत, असे त्यांनी सांगितले.

*** अर्थव्यवस्था गतिमान करणे हे ध्येय –**

आरबीआय संचालक मराठे यांनी सांगितले की, सहकार चळवळ ही अर्थव्यवस्थेचा महत्वपूर्ण भाग आहे. त्यामुळे सहकारी संस्था या एक व्यक्ती अथवा समूहाची न राहता ती सर्व सदस्यांची आहे. समाजासाठी आणि समाजाने निर्माण केलेली एक व्यवस्था आहे. केवळ नफा मिळविणे हे उद्दिष्ट नाही तर आपली अर्थव्यवस्था अधिक गतिमान करणे गरजेचे आहे. पुढील काही वर्षे ही गती कायम राहणार आहे. दरडोई उत्पन्न वाढण्यासाठी सहकार क्षेत्रशिवाय पर्याय नाही. सहकार भारतीकडून जनतेच्या अपेक्षा आहेत. कारण या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर काम करणारी ही एकमेव संस्था आहे. त्यामुळे आपल्या विचाराची आणि कार्याची व्याप्ती वाढविण्याची गरज आहे, असे त्यांनी सांगितले.

सुरुवातीला महामंत्री जुगादे यांनी प्रास्ताविकात गेल्या तीन वर्षांच्या कार्यकाळातील कामकाजाची आणि निर्णयांची माहिती सांगितली. अधिवेशन प्रमुख रविकाका बोरवके यांनी आभार मानले. अधिवेशनाच्या उद्घाटन सत्रानंतरच्या सत्रात प्रदेशाध्यक्ष अहिरे यांनी गेल्या तीन वर्षांतील कामकाजाचा लेखाजोखा मांडला. त्यांनी सांगितले की सहकार चळवळीत फार मोठी ताकद असून विविध घटकांमध्ये सहकार भारतीचे महत्त्व वाढत आहे. मात्र त्यामध्ये राजकारणाचा समावेश असता कामा नये. तसेच या क्षेत्रात महिलांना अधिकाधिक संधी देण्याची गरज आहे असे त्यांनी सांगितले.

या सत्रात ठाणे जनता सहकारी बँक संचालक आणि उद्योजक रामेशा कनानी, सांगली अर्बन बँक अध्यक्ष गणेश गाडगीळ, देवगिरी सहकारी बँक अध्यक्ष किशोर शितोळे, अकोला अर्बनचे अध्यक्ष रामेश्वर फुंडकर यांचा सन्मान करण्यात आला. तसेच सोलापूर महानगराच्या वतीने अहवालाचे प्रकाशन करण्यात आले. तिसऱ्या सत्रात पत्रकार आणि लोकमत न्यूजचे संपादक मिलिंद भागवत आणि निकिता भागवत यांनी वर्तमान परिस्थितीतील मीडियाची भूमिका आणि आवश्यकता यावर विवेचन केले. तसेच ज्येष्ठ वक्ते प्रकाश पाठक यांनी संघटन आणि कार्यकर्ता यांवर विवेचन केले.

*** नूतन पदाधिकारी निवड –**

सहकार भारतीच्या आगामी तीन वर्षांसाठी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली



**छायाचित्रात मध्यभागी सहकार भारतीचे नूतन अध्यक्ष दत्तात्रय चाळके डावीकडे महामंत्री विवेक जुगादे आणि अभिनंदन करताना माधव माटे.**

आहे. यामध्ये प्रदेशाध्यक्षपदी मुंबईच्या अपना सहकारी बँकेचे अध्यक्ष दत्ताराम चाळके आणि महामंत्रीपदी नागपुर येथील विवेकानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष विवेक जुगादे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अभय माटे यांनी काम पाहिले. यावेळी सहकार भारतीची संपूर्ण कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. ही निवड तीन वर्षांसाठी असणार आहे.

या सत्रात काही ठराव चर्चेनंतर एकमताने संमत करण्यात आले. यामध्ये सहकारी बँक विषयावरील ठराव टीजेएसबी बँक अध्यक्ष शरद गांगल, तर आबासाहेब देशमुख यांनी पतसंस्था विषयावरील ठराव, महिला बचत गट आणि स्वावलंबी भारत यावरील ठराव वैशाली आवाडे यांनी तर मत्स्य व्यवसाय विषय वासुदेव सुरजुसे आणि गृहनिर्माण सहकारी संस्था यावरील ठराव अश्विनी बुलाख यांनी मांडला. या सर्व ठरावावर उपस्थित प्रतिनिधींनी सूचना मांडल्या. त्याचा विचार करुन सर्व ठराव पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठविण्यात येणार आहेत असे जाहीर करण्यात आले.

*** अधिवेशनाचा समारोप –**

सहकार क्षेत्राचे सरकारीकरण झाले असून त्या परिस्थितीत सहकार क्षेत्र स्वतंत्र करुन चालविणे हे आव्हान आहे, याकडे सहकार भारतीने गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता आहे असे सहकार भारतीचे राष्ट्रीय संघटनमंत्री संजय पाचपोर यांनी अधिवेशनाच्या समारोप प्रसंगी सांगितले. व्यासपीठावर सहकार भारतीचे प्रदेशाध्यक्ष दत्ताराम चाळके, महामंत्री विवेक जुगादे होते. शैलेंद्र चौधरी यांनी वैयक्तिक गीत सादर केले.

*** संस्थांच्या समस्या सोडविण्यावर भर हवा–**

पाचपोर म्हणाले, आगामी तीन वर्षांच्या कालावधीत सहकार भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी राज्यातील सहकारी संस्थांच्या कार्यलयास भेटी दिल्या पाहिजेत. तसेच या संस्थांच्या समस्या समजावून घेतल्या पाहिजेत या प्रश्नांची सोडवणूक कशी करता येईल, या दृष्टीने विचार करण्याची गरज आहे. विविध समस्या सोडविण्यासाठी सहकारी कायद्यामध्ये आवश्यक ते बदल झाले पाहिजेत. त्यासाठी सहकार भारतीने आपली ताकद दाखविण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र हे सहकाराचे बीज आहे. गेल्या काही वर्षांत हे क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे योग्य समतोल साधण्याची गरज आहे. हे करीत असताना सहकार क्षेत्राला नवी दिशा देण्याच्या दृष्टीने विचार झाला पाहिजे. त्याचबरोबर आपल्या कार्यात गुणवत्ता वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे असून भविष्यातील विस्तारावर लक्ष ठेवले पाहिजे.

संघटना ही सोशल मीडियावर चालत नाही असे नमूद करुन ते म्हणाले, यासाठी मुख्यत: कार्यकर्त्यांनी जागरुक राहण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर आत्मपरीक्षण केले पाहिजे. हे करीत असताना अनुशासन आणि गुणवत्ता यावर भर दिला पाहिजे, असे ते म्हणाले. अधिवेशनाचे सहआयोजक अभिनाथ शिंदे यांनी आभार मानले. अधिवेशनासाठी राज्याच्या ३६ जिल्ह्यांतून आणि २५६ तालुक्यातून एक हजारपेक्षा अधिक प्रतिनिधी




**सहकार भारतीच्या आगामी तीन वर्षांसाठीचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य आणि पदाधिकारी.**
**छायाचित्रात मध्यभागी सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी.**

उपस्थित होते.

*** प्रदेश कार्यकारिणीचे नूतन पदाधिकारी** – सहकार भारतीच्या प्रदेशाध्यक्षपदी आगामी तीन वर्षांसाठी दत्ताराम चाळके – मुंबई तर महामंत्रीपदी विवेक जुगादे – नागपूर यांची अविरोध निवड करण्यात आली आहे. सहकार भारतीचे त्रैवार्षिक अधिवेशन नुकतेच झाले. त्यामध्ये नूतन पदाधिकारी आणि कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

संघटनप्रमुख म्हणून शरद जाधव – नाशिक, सहसंघटन प्रमुख विजय देशमुख – जालना, प्रवीण बुलाख – बदलापूर, तसेच उपाध्यक्षपदी अजय ब्रम्हेचा – नाशिक, नीलिमा बावणे – नागपुर, रविकाका बोरावके, कोपरगाव, मधुसुदन पाटील – कल्याण, दिलीप लोहार – शिरपूर यांची तर सचिवपदी सुनील मोतलग – संभाजीनगर, विनोद भीमनवार – वर्धा, वर्षा कस्तुरकर – जालना, भूषण पैठणकर – मुंबई, नकुल कडू – शिर्डी यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. कोषाध्यक्षपदी गणेश गाडगीळ – सांगली यांची निवड करण्यात आली तर सहकोषाध्यक्ष सुमुख कुलकर्णी – मुंबई आणि औदुंबर नाईक – पुणे.

महिला प्रमुखपदी वैशाली आवाडे – इचलकरंजी आणि सहप्रमुख सुचेता कुकडे, संपर्क प्रमुख संजय परमणे आणि कार्यालय प्रमुख श्रीकांत पटवर्धन – पुणे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी विविध प्रकोष्ठ प्रमुखांची निवड जाहीर करण्यात आली. तसेच राज्यातील विभाग निहाय पदाधिकारी आणि प्रदेश कार्यकारिणी सदस्यांची नावे जाहीर करण्यात आली. यादी पुढील प्रमाणे –

* बँक प्रकोष्ठ प्रमुख – शरद गांगल – ठाणे, सहप्रमुख – शंतनु जोशी – अकोला, सुधीर पगार – नाशिक.

* पतसंस्था प्रकोष्ठ प्रमुख – सागर चौगुले – जयसिंगपूर, सहप्रमुख राजू खुराणा – जालना, अंबादास पांडे – नगर.

* पगारदार पतसंस्था प्रकोष्ट प्रमुख – नानाभाऊ महल्ले – नागपूर.

* जिल्हा बँक प्रकोष्ठ प्रमुख – रेकलाल टेंभरे गोंदिया.

* हाऊसिंग सोसायटी प्रकोष्ठ प्रमुख – अश्विनी बुलाख – बदलापूर, सहप्रमुख – देवदत्त बोराळकर – पुणे.

* ग्रामीण सहकार प्रकोष्ठ प्रमुख – अनिल मेंढे – भंडारा.

* दुग्ध डेअरी संस्था प्रकोष्ठ प्रमुख – उमेश विरधे – पंढरपूर.

* साखर कारखाना प्रकोष्ठ प्रमुख – साहेबराव खामकर – पुणे.

* कृषि माल प्रक्रिया प्रकोष्ठ प्रमुख – रवींद्र अमृतकर – नाशिक, सहप्रमुख वृषल शिंदे – जळगाव, मंगेश वेंडखळे –कोल्हापूर.

* मच्छिमार सहकारी संस्था प्रकोष्ठ प्रमुख – बासुदेव सुरजुसे – मोर्शी, सहप्रमुख कोकिळा वाघ – नाशिक, शैलेश दगडे – डोंबिवली.

* बचत गट विपणन प्रकोष्ठ प्रमुख – मंगल सोनवणे – नाशिक, सहप्रमुख – जया अलिम चंदानी – मुंबई.

* आया टी प्रकोष्ठ प्रमुख – योगेश वाळूंजकर – डोंबिवली, सहप्रमुख – अभिनाथ शिंदे – पुणे.

* ग्रामीण कृषि सहकारी संस्था प्रमुख – प्रकाश सिसोदिया – शिरपूर, सहप्रमुख – भगवान मापारे – जालना, संजीवकुमार जोशी – यवतमाळ.

* विधी प्रकोष्ठ प्रमुख – रामेश्वर खोंड, महिला सहकारी संस्था प्रकोष्ठ प्रमुख – भारती पवार – मुंबई, सहप्रमुख –अंजली मुळे, ऑडिटर प्रकोष्ठ प्रमुख – विजय शेलार – मुंबई, सहप्रमुख – आबासाहेब देशमुख – संभाजीनगर, प्रसिद्धी प्रमुख – श्रीवल्लभ कुलकर्णी – सांगली.

* विभाग निहाय पदाधिकारी याप्रमाणे –

मुंबई अध्यक्ष – राहुल पाटील – मुंबई, विभाग महामंत्री – मंगेश पवार – मुंबई, संघटन प्रमुख – संतोष सुर्वे, सहसंघटन प्रमुख – जगदीश लाड वंजारी पुणे, विभाग प्रमुख – गिरीश भवाळकर – सोलापूर, नगर विभाग प्रमुख – संतोष गायकवाड, सहप्रमुख नाना वायमोडे – माळशिरस

* कोल्हापूर विभाग प्रमुख – चंद्रकांत घुलप – सातारा, विभाग सहप्रमुख – जवाहर छाबडा – इचलकरंजी.

* कोकण विभाग प्रमुख – राजू ठाणगे – कल्याण, * सहप्रमुख – वीणा मोकाशी – बदलापूर, कृष्णकांत निमसे – पनवेल,

* नागपूर विभाग प्रमुख – संजय रोकडे, सहप्रमुख – विजय गोटे – चंद्रपुर,

* अमरावती विभाग प्रमुख – अमित भिसे – यवतमाळ.

* नाशिक विभाग प्रमुख – बंसीलाल अंदोरे – नाशिक, सहप्रमुख – राजेन्द्र पवार – नाशिक, दीपक पंढरपूरकर – जळगाव,

* संभाजीनगर – संभाजी राचुरे – संभाजीनगर, सहप्रमुख – भगवान जायभाई – जालना.

* लातूर विभाग – दीपक देशमुख – बीड, सहप्रमुख – संतोष तौर.

* प्रदेश कार्यकारिणी सदस्य – डॉ. शशिताई अहिरे, नाशिक. अजय मुंधडा – यवतमाळ, धनंजय यादव – दापोली, * चंद्रहास गुजराथी – जळगाव, डॉ. जयंत शेळगीकर – सोलापूर, शरयू हेबाळकर – अंबेजोगाई. डॉ. शांतीलाल सिंगी – संभाजीनगर, कांतीलाल बडाले – पुणे, दादा विचारे – लांजा. विनायक साखरे – पुणे, अश्विनी आठवले – सांगली, किशोर चव्हाण – पैठण, मनोज पांडे – नागपुर, रामकृष्ण आवारे – मुंबई, अनिल अस्टुरकर – परभणी, अजय निकुम्ब – पुणे, दिलीप पतंगे – सोलापूर, भीमाशंकर रायचट्टे – बीड, डॉ. सुधीर कोकरे – नांदेड, सारिका पेंडसे – नागपुर, भरत चिचोळे – मुंबई.

# 'सहकारी बँकांनी ग्रामीण भागातही डिजिटलायझेशनवर भर द्यावा'

## आरबीआय संचालक सतीश मराठे यांचे मत

**भारतीय अर्थव्यवस्थेची सक्षमतेकडे वाटचाल तसेच सहकार क्षेत्रातील तंत्रज्ञानयुक्त बदल, राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र सहकार मंत्रालय व्हावे यासाठी सहकार भारतीने केलेला पाठपुरावा, बँकांचे राष्ट्रीयीकरणानंतरचे बदलते स्वरूप यांसारख्या अनेकविध विषयांवर सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष आणि आरबीआयचे संचालक सतीश मराठे यांची विस्तृत मुलाखत...**

बदलत्या काळाची गरज लक्षात घेऊन नागरी सहकारी बँकांनी डिजिटायझेशनवर अधिक भर दिला आहे हे नक्कीच स्वागतार्ह आहे. या व्यवस्थेमुळे लहान, मध्यम आणि मोठे व्यावसायिक ग्राहकांशी सहजगत्या जोडले गेले आहेत. यामुळे ऑनलाइन पेमेंट व्यवहारात वाढ झाली आहे. शहरी भागात याचा विस्तार व्यापक प्रमाणावर झाला. तसेच ग्रामीण भागावर अधिक भर देण्याची गरज आहे असे मत आरबीआयचे संचालक आणि सहकार भारतीचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मराठे यांनी एका मुलाखतीत व्यक्त केले आहे.

बँकिंग क्षेत्रातील कामकाजात झपाट्याने बदल आणि विस्तार होतो आहे असे नमूद करून ते म्हणाले, एकूणच कामकाजात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढला आहे. यामुळे घरबसल्या बँकिंग व्यवहार ग्राहकांना करता येणे शक्य झाले आहे. यामुळे बँकिंग क्षेत्र अधिक व्यापक होण्यास मदत होणार आहे. डिजिटलायझेशनमुळे ग्रामीण भागातील पंचायत समित्या आपोआप जोडल्या जाणार आहेत. बँकेतील खात्यांची संख्या वाढल्याने कर्जाची उपलब्धता सहजगत्या होण्यास मदत झाली असून भारतीय अर्थव्यवस्थेला याचा नक्कीच फायदा होतो आहे. म्हणजेच अर्थव्यवस्थेच्या प्रगतीमध्ये सर्वसामान्य जनतेचा सहभाग वाढतो आहे.



*** ऑनलाईन पेमेंट सुविधेत देश आघाडीवर –**

बँकांच्या माध्यमातून संस्थात्मक पातळीवर अधिकाधिक प्रमाणात अर्थपुरवठा होऊ शकेल तितके चांगले आहे असे स्पष्ट करून ते म्हणाले,

विशेष मुलाखत...

कारण ही आजची गरज आहे. त्यामुळे देशाच्या विकासाला अधिक गती मिळणार आहे. केंद्र सरकारने मध्यंतरीच्या काळात जनधन खाते योजना सुरू केली असून सध्याच्या स्थितीत देशात सुमारे ५५ कोटी खातेदार आहेत. सर्वात महत्वाची बाब म्हणजे ऑनलाईन पेमेंट सुविधेत जी पे, फोन पे आदी सुविधेत भारत देश आघाडीवर आहे ही अभिमानाची बाब आहे. मध्यंतरीच्या काळात काही अडचणी आल्या पण त्यामधून बँका सावरल्या आहेत. मात्र आजची देशातील स्थिती नक्कीच चांगली आहे. सन १९९१च्या आधीचे बँकिंग क्षेत्र आणि त्यानंतरचे बँकिंग क्षेत्र यामध्ये बराच फरक दिसतो. सन १९९१ मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले. हा राजकीय निर्णय होता पण त्यानिमित्ताने जे धोरण स्वीकारले त्याचा नक्कीच फायदा झाला आहे काही बदल झाले. त्यानंतर विस्तारीकरण, भांडवल नियम, एनपीएसाठीच्या अटी आणि सक्षमीकरण यावर अधिक भर दिला गेला. त्याचप्रमाणे कामकाजात संगणकीकरणावर जास्त भर दिला गेला, असे ते म्हणाले.

*** विकास सोसायट्यांचे रूपांतर मल्टिपर्पजमध्ये करण्यात यावे –**

बँकांचे नियमन हे मुख्यत्वे आरबीआयकडे तर सहकार क्षेत्रातील वित्त संस्थांचे नियमन हे सहकार खात्याकडे असते, असे नमूद करून ते म्हणाले, सहकारी संस्थांमध्ये समाजातील सर्व घटकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असतो आणि या संस्थांच्या वतीने भागधारकांना दरवर्षी लाभांश देण्यात येतो. मुळामध्ये सहकार चळवळ ही केवळ सेवा नाही तर आर्थिक चळवळ आहे. त्यादृष्टीने त्याकडे पाहण्याची गरज आहे. आणखी एक महत्वाचे म्हणजे सहकारी विकास सोसायट्या या ग्रामीण भागातील आर्थिक क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावत आहेत आणि देशातील सर्व राज्यात या सोसायट्या चांगले काम करीत आहेत. त्याची आवश्यकता पाहता या सोसायट्यांचे रुपांतर मल्टिपर्पजमध्ये करण्याची गरज आहे. कारण यामुळे ग्रामीण भागात वित्तपुरवठा मोठ्या प्रमाणावर होण्यास मदतच होणार आहे. यामुळे अर्थव्यवस्था अधिक सक्षम होण्यास हातभार लागणार आहे.

*** भारतीय अर्थव्यवस्था गतिमान आणि आघाडीवर –**

भारतीय अर्थव्यवस्थेबाबत बोलताना ते म्हणाले, एकूणच जगातील विविध देशांचा विचार करता आपल्या देशाची अर्थव्यवस्था अधिक गतिमान आणि आघाडीवर आहे. सर्वात महत्वाची बाब म्हणजे यामध्ये मेक इन इंडिया उपक्रमाचा मोठा वाटा आहे. केवळ आर्थिक क्षेत्रात या घटकाचे महत्व नाही तर अन्य क्षेत्रातदेखील मेक इन इंडियाचा वाटा महत्वाचा आणि उपयुक्त आहे. कारण यामध्ये नियोजनाच्या जोडीला आधुनिक तंत्रज्ञानाच्या बरोबरीने उत्पादन आणि नियोजन याला तितकेच महत्त्व आहे. वाढत्या लोकसंख्येच्या सर्व गरजा पूर्ण करणे शक्य होणार आहे. मध्यंतरीच्या काळात जगभर कोरोनाचे संकट होते आणि त्याची झळ आपल्याला बसली आहे. ती परिस्थिती नसती तर भारतीय अर्थव्यवस्था पांच ट्रिलियन आधीच झाली असती असे त्यांनी सांगितले.

*** सहकार भारतीच्या पाठपुराव्याला यश –**

राष्ट्रीय स्तरावरील स्वतंत्र सहकार मंत्रालयाच्या बाबत विचारले असता ते म्हणाले, देशभरात सध्याच्या स्थितीमध्ये सुमारे साडेआठ लाख सहकारी संस्था कार्यरत असून अंदाजे ३५ कोटी नागरिक या क्षेत्राशी जोडले आहेत. यामध्ये शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागाचा सहभाग मोठ्या प्रमाणावर आहे. रोजच्या दैनंदिन जीवनाशी कामकाजाशी संबंधित सहकारी संस्था आहे. त्यामुळे या सहकारी संस्थांशी निगडित राष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र विभागाची गरज होती. म्हणूनच त्याबाबत सहकार भारतीने केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला. त्याला यश आले आणि स्वतंत्र मंत्रालय सहकारासाठी तयार करण्यात आले आहे.

या स्वतंत्र सहकाराच्या मंत्रालयाच्या माध्यमातून विविध प्रश्नांची सोडवणूक होण्यासाठी केंद्र सरकारदेखील जाणीवपूर्वक प्रयत्न करत आहे, हे निश्चितच स्वागतार्ह आहे.

*****

# पतसंस्थांचे नागरी सहकारी बँकेमध्ये रूपांतर होणे अपरिहार्य

आपल्या देशामध्ये १९०४ साली पहिला सहकारी कायदा अस्तित्वात आला, त्याही पूर्वीपासून पतसंस्था कार्यरत होत्या. आजमितीस संपूर्ण देश भरामध्ये ११०००० पतसंस्था अस्तित्वात असून, त्यामध्ये ११०००० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत, त्यापैकी ७०००० कोटी रूपयांचे कर्ज व्यवहार आहेत, तर ४५००० कोटी रुपयांचे वसूल भाग भांडवल पतसंस्थाच्याकडे आहे. विशेषतः महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटकात ही पतसंस्था चळवळ मोठ्या प्रमाणात फोफावलेली आहे. संपूर्ण देशभर पतसंस्था चळवळ वाढण्यामध्ये पुढील प्रमुख कारणे दिसून येतात.



डॉ. उदय जोशी,
राष्ट्रीय महामंत्री सहकार भारती,
८८८८८ ८०६९०

१) समाजाच्या निम्न आर्थिक समाज वर्गाची आर्थिक पत वाढवण्याचे काम पतसंस्था करतात.

२) सुलभ अटी आणि शर्तीसह न्यूनतम कागद पत्रांमध्ये कर्ज वाटपाचा त्वरित निर्णय करून कर्ज वितरण केले जाते.

३) सन १९९९ पासून रिजर्व बँकेने एकाही नवीन नागरी सहकारी बँकेला परवाना न दिल्याने पसंतसंस्थांची संख्या आणि आकारमान यामध्ये विलक्षण वाढ झाली. या पूर्वी १९९५ ते १९९९ पर्यंत मराठे समितीच्या शिफारसींप्रमाणे अनेक ठिकाणी नानीन सहकारी बँका अस्तित्वात आल्या.

ज्या संस्था सर्व नियमांचे पालन करून आपआपला कारभार उत्तम करीत होत्या, त्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला नाही. परंतु ज्या संस्थांनी आर्थिक शिस्त पालन न केल्यामुळे अशा संस्था अडचणीमध्ये आल्या आणि ठेवीदारांचे आर्थिक नुकसान आणि प्रसंगी आर्थिक शोषण ही झाले.

यातुनच पुढे पतसंस्थांच्या ठेवीसाठी बँकांच्या प्रमाणे ठेव विम्याचे संरक्षण असावे अशी मागणी जोर धरू लागली. पतसंस्थांच्या अनेक व्यासपीठाच्या माध्यमातून पतसंस्था ठेवीदारांना ठेव विम्याचे संरक्षण असले पाहिजे अशी आग्रही मागणी बारंबार होऊ लागली. आजमितीस तरी ही मागणी एवढ्यात पूर्ण होईल अशी चिन्हे नाहीत. सन २०२१ मध्ये केंद्रात स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन झाल्यापासून या मागणीबाबत विशेष प्रयत्न झाले. तथापि याबाबत स्थिती पूर्ववतच राहिलेली आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारच्या सहकार विभागाने भारतीय रिझर्व्ह बँकेसमोर असा प्रस्ताव ठेवला की किमान पक्षी ज्या पतसंस्था नागरी सहकारी बँकेच्या प्रवेशाचे निकष (Entry Point Norms) पूर्ण करतील त्यांना रिझर्व्ह बँकेने बँक परवाना (Banking Licence) द्यावे. सन २०१० मध्ये रिझर्व्ह बँकेच्याच ए एच मालेगाम समितिने ही अशी शिफारस केली होती की, ज्या पतसंस्था बँकेचे प्रवेश निकष पूर्ण करतील, त्यांना बँकेमध्ये रूपांतरित केले जावे. तसेच एखाद्या बँकेस काही कारणाने बँक म्हणून व्यवसाय करने शक्य नसेल, त्यांना पतसंस्था म्हणून काम करण्यास परवानगी देण्यात यावी. मात्र रिझर्व्ह बँकेने मालेगाम समितीच्या शिफारसी स्वीकारल्या नाहीत. त्यानंतर २०१५ साली रिझर्व्ह बँकेनेच नेमलेल्या गांधी उच्चाधिकार समितीने ही (Gandhi High Power Committee) ए एच मालेगाम समितीच्या शिफारसी प्रमाणेच सहकारी बँकेसाठी नवीन परवाना धोरण असावे अशी शिफारस केली होती. पुढे २०२१ मध्ये रिजर्व बँकेने नेमलेल्या एन. एस. विश्वनाथन समितीसमोर हाच प्रश्न परत एकदा मांडला गेला. या बरोबरच रिजर्व बँकेने गेल्या १०/१२ वर्षात एक ही नवीन सहकारी बँकेला परवाना दिलेला नाही. सबब नवीन बँका स्थापन करण्यास ही परवानगी द्यावी अशी मागणी मांडली गेली. केंद्र सरकारनेही त्यास अनुकूलता दर्शवल्याने, रिझर्व्ह बँकेने असे जाहीर केले की, सहकारी बँकांच्यासाठी निर्माणाधीन असलेल्या Umbrella Organisation ची स्थापना झाल्यानंतर नवीन सहकारी बँकेचे परवाना धोरण रिझर्व्ह बँक जाहीर करेल.

पुढे दि. २ मार्च २०२४ रोजी केंद्रीय सहकारिता मंत्री मा. अमित शाह यांनी दिल्लीमध्ये, National Urban Co-Operative Finance and Development Corporation Ltd (NUCFDC) ची umbrella organisation म्हणून स्थापना केली. श्री अमित शाह यांनी स्वतः रिजर्व बँकेकडे आग्रह धरला की, देशभरातील प्रत्येक जिल्ह्यात एक सहकारी बँक असावी. तसेच किमान २०० मोठ्या पतसंस्थांना प्रायोगिक तत्त्वावर बँकेमध्ये रुपांतरित केले जावे. केंद्रीय सहकार विभागाने National Federation of Urban CoOp Banks Credit Societies Ltd (NAFCUB) या शिखर संस्थेस किमान २०० मोठ्या पतसंस्थांचे सर्वेक्षण करून त्यांचे सहकारी बँकेत रुपांतर करण्याची योजना तयार करण्यास सांगितले आहे. जुने निकष कालबाह्य झाल्याने, परिस्थितीनुरूप पतसंस्थांचे बँकेत रुपांतरित करण्याच्या शिफारसी काय असाव्यात हे ही सुचवण्यास सांगितले आहे.

NAFCUB ने केंद्र सरकारला, पतसंस्थांचे सहकारी बँकेत रूपांतर करण्याचे सुधारित निकष पुढीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१) लोकसंख्येनुसार स्थान वर्गीकरण पुढील प्रमाणे :**

| अ ) वर्ग / श्रेणी | लोकसंख्या |
|---|---|
| अ | १० लाख पेक्षा अधिक |
| ब | ०५ लाख पेक्षा अधिक ते १० लाख पेक्षा कमी |
| क | ०१ पेक्षा अधिक ते ०५ लाख पेक्षा कमी |
| ड | ०१ लाख पेक्षा कमी |

**२) भाग भांडवल आणि सभासद संख्या**

| | |
|---|---|
| श्रेणी अ | ५ कोटी ३००० सभासद |
| श्रेणी ब | ४ कोटी २००० सभासद |
| श्रेणी क | ३ कोटी १५०० सभासद |
| श्रेणी ड | २ कोटी १००० सभासद |

३) वरील भाग भांडवल आणि सभासद संख्या यामध्ये महिला बँका तसेच पुर्वोत्तर क्षेत्रातील बँकांसाठी ५०% सवलत राहील.

४) शहरी आणि निमशहरी भागात लघु आणि सूक्ष्म उद्योगांचे प्रमाण वाढत असल्याने नवीन धोरणामध्ये त्यास प्राधान्य देण्यात यावे.

५) पतसंस्थेचे बँकेमध्ये रुपांतर पूर्णपणे ऐच्छिक राहील, परंतु अधिकाधिक पतसंसस्थांनी या योजनेमध्ये सहभागी होऊन आपली आर्थिक जोखीम कमी करून घ्यावी. तसेच सभासदांना ठेव विम्याचे संरक्षण आपोआप प्राप्त होईल.

इच्छुक पतसंस्थांनी NAFCUB बरोबर संपर्क साधून आपली माहिती कळवावी ही विनंती. NAFCUB B 14, Local Shoping Complex, Ring Rd , Naraina village, Nariana, New Delhi 110028.

**– डॉ. उदय जोशी,**
राष्ट्रीय महामंत्री सहकार भारती, Director NAFCUB
मो.नं. – ८८८८८८०६९०.

****

# सहकार विषयावरील जागतिक स्तरावरील परिषद नवी दिल्लीत होणार

**मुंबई –** जागतिक स्तरावरील सहकार विषयावरील प्रथमच नवी दिल्लीमध्ये येत्या दि. २५ ते ३० नोव्हेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आली असून सहकार से समृद्धी या विषयावर परिषद होणार आहे. सहकारी संस्था सर्वांकरिता समृद्धीची निर्मिती करतात, ही परिषदेची मूळ संकल्पना असणार आहे.

इंटरर्नेशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्स आयसीएच्या वतीने परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी इफकोनेदेखील पुढाकार घेतला आहे. आयसीए संस्था संचालक जेरोन डग्लस यांनी सांगितले की, परिषदेत भूतानचे पंतप्रधान, संयुक्त राष्ट्र आर्थिक परिषदेचे अध्यक्ष संयुक्त राष्ट्रांचे प्रतिनिधी आणि भारतीय सहकारी चळवळीतील नेते आणि कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. साधारणपणे सुमारे दीड हजार प्रतिनिधी यामध्ये सहभागी होतील. केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा हे प्रमुख पाहुणे असणार आहेत.

भारतीय सहकार क्षेत्राने सहकारी चळवळीची वाढ आणि आणि विकास, विस्तारासाठी ५४ उपक्रम सुरू केले आहेत. त्या माध्यमातून देशांतर्गत उत्पन्नामध्ये मोठे योगदान देण्यात यश मिळविले आहे आणि नवीन टप्पे गाठले आहेत. समृद्धी आणि सुरक्षित अशी सहकार चळवळ अधिक प्रमाणात विकसित करणे हे दीर्घकालीन ध्येय असणार आहे असे इफकोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. यू. एस. अवस्थी यांनी सांगितले. गेल्या १३० वर्षांच्या कालावधीत प्रथमच सहकार विषयावरील जागतिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

# कॉसमॉस सहकारी बँकेस सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार प्रदान

**पुणे –** सर्वोकृष्ट सहकारी बँक पुरस्काराने येथील कॉसमॉस सहकारी बँकेला केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते एका समारंभात गौरविण्यात आले आहे. महाराष्ट्र अर्बन को ऑप बँक्स फेडरेशनची ४५ वी वार्षिक सभा नुकतीच झाली. त्यावेळी हा सन्मान प्रदान करण्यात आला.

बँक अध्यक्ष मिलिंद काळे आणि व्यवस्थापकीय संचालिका अपेक्षिता ठिपसे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



# डोंबिवली नागरी सहकारी बँकेला आर्थिक वर्षात २३.९३ कोटींचा नफा



**मुंबई –** डोंबिवली नागरी सहकारी बँकेला नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात २३.९३ कोटींचा नफा झाला असून बँकेला सर्वोकृष्ट बँक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. बँकेने सदस्यांना ९ टक्के लाभांश जाहीर केला आहे. बँकेची ६५ वी शाखा पुणे जिल्ह्यातील आंबेगाव या ठिकाणी सुरू करण्यात आली आहे. रा.स्व.संघाचे जेष्ठ स्वयंसेवक विनय वेलणकर, दिनेश पटेल आणि माजी नगरसेवक दीपेश म्हात्रे यांनी सदिच्छा भेट दिली.

# मजूर सहकारी संस्थेला शासन मदत करेल - सार्वजनिक बांधकाममंत्री चव्हाण

**मुंबई –** मजूर सहकारी संस्था या तळागाळातील नागरिकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संस्था असून त्यांना सर्वतोपरी मदत करण्याची शासनाची भूमिका आहे असे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी येथे संगितले. राज्य मजूर सहकारी संस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

भाजपचे आमदार प्रवीण दरेकर, जिल्हा बँक उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, संघाचे अध्यक्ष संजीव कुशाळकर आदी यावेळी उपस्थित होते. ते म्हणाले, मजूर सहकारी चळवळीतील या संस्थेला आणि त्यामध्ये कार्यरत असणाऱ्यांना मदत करण्यासाठी शासन कायमच पुढाकार घेणार आहे.

दरेकर यांनी सांगितले की, शासनाकडून मजूर संस्थेला मिळणाऱ्या कामांची मर्यादा एक कोटीवरुन तीन कोटी करण्यात आली आहे. तसेच मजूर संस्थांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी कर्जमर्यादा १५ लाख होती. ती वाढवून ५० लाखापर्यंत वाढविण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

# देशातील आर्थिक परिसंस्था सक्षम करण्यावर आरबीआयचा भर - संचालक सतीश मराठे




**कोल्हापूर -** देशातील आर्थिक परिसंस्था अधिकाधिक प्रमाणात सक्षम आणि बळकट करण्यावर आरबीआयचा कल असणार आहे असे मत आरबीआयचे संचालक सतीश मराठे यांनी सांगितले. येथील शिवाजी विद्यापीठाचे गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र आणि जिल्हा नागरी सहकारी सहकारी बँक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने इनामदार यांच्या जयंती निमित्ताने चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. सहकारी बँकासमोरील प्रश्न आणि आरबीआय हा चर्चासत्राचा विषय होता.

अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के आणि प्रमुख पाहुणे म्हणून कोल्हापूर जिल्हा नागरी बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष निपुण कोरे होते. मराठे यांनी सांगितले की, आरबीआयच्या प्रयत्नांना सहकारी बँकांची चांगली साथ लाभल्याने त्याचे चांगले परिणाम पाहावयास मिळत आहेत. बँकांनी आपले प्रश्न संस्थात्मक पातळीवर सोडवून देशाच्या विकासाला चालना देण्याच्या प्रयत्नांत सहभागी होण्याची गरज आहे. बँकांच्या विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आरबीआय सकारात्मक आहे, असे ते म्हणाले.

कोरे यांनी सांगितले की, सहकारी बँका आणि आरबीआय यांच्यातील कणखर दुवा म्हणून संचालक मराठे काम करीत आहेत, तर कुलगुरू शिर्के यांनी सांगितले की, आर्थिक संस्थांनी पुढील किमान पाच वर्षे वाटचालीची दिशा निर्धारित करावी. त्यासाठी आराखडा तयार करण्यात यावा, त्यासाठी विद्यापीठाच्या वतीने आवश्यक मदत करण्यात येईल.

केंद्र संचालक डॉ. राजन पडवळ यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. अधिसभा सदस्य संजय परमणे यांनी स्व. इनामदार यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला.

---

# राज्य सहकारी परिषदेच्या अध्यक्षपदाचा राजन पाटील यांनी स्वीकारला पदभार



**पुणे -** सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या २७ सप्टेंबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार नेमणूक करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेच्या अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) पदाचा नूतन अध्यक्ष राजन पाटील यांनी राज्य सहकारी परिषदेच्या कार्यालयात पदभार स्विकारला.

मोहोळचे आमदार यशवंत माने, अपर आयुक्त व विशेष निबंधक श्रीकृष्ण वाडेकर, अपर निबंधक राजेश सुरवसे, उपनिबंधक किरण सोनवणे उपस्थित होते.

सहकारी चळवळीशी संबंधित सर्व बाबींवर राज्य शासनाला सल्ला देणे, सहकारी संस्थांना येणाऱ्या अडीअडचणी दूर करण्यासाठी मार्ग व पर्याय सुचविणे, राज्यातील सहकारी चळवळीच्या विकासाबाबतच्या योजना व धोरणे यांची शिफारस करणे आदी बाबी सहकारी परिषदेकडून करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

# सहकार क्षेत्राच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न सोडविणार

**सोलापूर -** समाजातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सहकार क्षेत्राच्या माध्यमातून सोडविण्यावर अधिक भर देण्यात येणार असल्याचे राज्य सहकार परिषद अध्यक्ष राजन पाटील यांनी सांगितले. जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने अध्यक्ष दिलीप पतंगे यांच्या हस्ते अध्यक्ष पाटील यांचा सत्कार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

फेडरेशन उपाध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी, सुमित पतंगे आदी उपस्थित होते. पाटील यांनी सांगितले की, राज्याच्या ग्रामीण भागात सहकाराची गंगा पोचली. त्यामुळे विकासाला गती मिळाली आहे. यापुढील काळात गती वाढविण्यावर भर देण्यात येईल असे त्यांनी नमूद केले.

पतंगे यांनी जिल्ह्यातील सहकारी पतसंस्थांच्या माध्यमातून सुरू असणाऱ्या कामाची माहिती सांगितली. ते म्हणाले की, सहकार परिषदेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर काम करता येणे शक्य असून विविध सहकारी संस्थांच्या अडीअडचणी सोडवण्याला प्राधान्य देता येते. तसेच सहकारी कायद्यामध्ये सर्वसामान्य जनतेसाठी लवचिकता आणण्याबाबतचे धोरण ठरविता येते. यासाठी भविष्यकाळात सहकार परिषदेला जे जे सहकार्य लागेल ते देण्यात येईल. यावेळी सहकारी संस्थांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# बँकांप्रमाणे पतसंस्थांना ठेवींवर विमा संरक्षण मिळाले पाहिजे

## सहकार भारती राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी




**रायगड –** कपूर समितीच्या अहवालानुसार आर्थिक संस्थांच्या ठेवीदारांना संरक्षण देण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था हवी. त्यासोबत १०० टक्के भागभांडवल पुरविण्याचे दायित्व सरकारने स्वीकारले तरच आर्थिक क्षेत्रातील सहकारात मोठ्या संख्येने कार्यरत पतसंस्थांना ऊर्जितावस्था लाभेल. बँकांप्रमाणे पतसंस्थांना ठेवींवर विमा संरक्षण मिळाले पाहिजे, अशी आग्रही मागणी सहकार भारतीचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी यांनी केली.

अलिबाग येथे आयोजित रायगड जिल्हा सहकारी पतसंस्थांचा महासंघाच्या २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मार्गदर्शन करताना डॉ. जोशी बोलत होते. डॉ. जोशी म्हणाले की, राज्यात १३५४१ पतसंस्थांच्या माध्यमातून ५६ हजार कोटींच्या ठेवींना विमा संरक्षण देण्यासाठी १० वर्षांत परतफेडीच्या अटीवर राज्य शासन अवघे १०० कोटी रु. देऊ करते ही रक्कम अतिशय तुटपुंजी असल्याने राज्य शासनाने सहकार क्षेत्राला झळाळी देण्यासाठी पुनर्विचार करण्याचे सुचित करून नियामक मंडळात राजकीय शक्तींचा हस्तक्षेप टाळावा असा सल्ला दिला.

व्यासपीठावर महासंघाचे अध्यक्ष डॉ. जे. टी. पाटील, सचिव योगेश मगर, राज्य फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष तथा आदर्श पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पाटील, दिलीप पटेल जगदीश कवळे अमित ओझे प्रमोद पाटील चंद्रकांत घोसाळकर प्रकाश चांदिवडे संजय वानखेडे आदी उपस्थित होते. कार्यक्रम पत्रिकेचे वाचन सचिव योगेश मगर यांनी केले.

राज्य फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष पाटील यांनी प्रभावी वसुली व आर्थिक शिस्त पाळण्याचे आवाहन उपस्थितांना केले. रायगड जिल्ह्यातील पतसंस्थांचे पदाधिकारी सभेस उपस्थित होते. सभेच्या यशस्वीतेसाठी समता आंबेकर विवेक पाटील व भूषण राऊत यांनी परिश्रम घेतले.

## उद्यमी महिला नागरी सहकारी पतसंस्थेचा सदस्यांना १० टक्के लाभांश

**जळगाव –** येथील उद्यमी महिला नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने सदस्यांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. पतसंस्थेची ३० वी वार्षिक सर्व साधारण सभा पार पडली. संस्था अध्यक्ष पद्मजा अत्रे अध्यक्षस्थानी होत्या. सुरुवातीला संचालिका मीनाक्षी जोशी आणि स्वाती फिरके यांनी सहकार गीत सादर केले.

विविध क्षेत्रात गौरवपूर्ण कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा सभेत गौरव करण्यात आला. कार्यक्रम पत्रिकेवरील विषयांचे वाचन करून सर्व विषय मंजूर करण्यात आले. संचालिका रेवती कुरंभट्टी यांनी आभार मानले.

## कर्मवीर भाऊराव पाटील मल्टिस्टेट सोसायटीला सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्कार प्रदान

**जयसिंगपूर, कोल्हापूर –** येथील कर्मवीर भाऊराव पाटील मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीला सर्वोत्कृष्ट संस्था पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले आहे. शिर्डी येथे फेडरेशन ऑफ मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या वतीने हा पुरस्कार केंद्रीय सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशीष भूतानी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

सोसायटीचे अध्यक्ष सुरेश वाबळे, राज्य पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे, माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख, संस्था अध्यक्ष अरविंद मजलेकर हे उपस्थित होते.

## बळवंत नागरी सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी राधेशाम बजाज

**जळगाव –** येथील बळवंत नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी राधेशाम बजाज आणि उपाध्यक्षपदी सविता नाईक यांची बिनविरोध निवड झाली आहे. पतसंस्थेच्या संचालक पदासाठी नुकतीच निवडणूक झाली. त्यानंतर झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत नूतन पदाधिकारी निवडण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एम. पी. भारंबे यांनी काम पाहिले.

अध्यक्षपदी निवड झाल्यावर बजाज यांनी सांगितले की, संस्थेचे सदस्य, ठेवीदार यांच्या प्रगतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. नूतन संचालक म्हणून संदीप लाड, संजय कासार, प्रवीण झंवर, राजेंद्र पाटील, पद्माकर इंगळे, मिलिंद चंदनकर, महेश संत, शोभना खोरखेड, प्रमोद माळी हे निवडून आले आहेत.

## अनंत नागरी सहकारी पतसंस्थेला दीपस्तंभ पुरस्कार प्रदान

**शिर्डी –** वाशिम जिल्ह्यातील अनंत नागरी सहकारी पतसंस्थेला शिर्डी येथील समारंभात दीपस्तंभ पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या वतीने हा पुरस्कार अमरावती विभागातील द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार म्हणून देण्यात आला आहे.

खासदार भाऊसाहेब वाकचौरे आणि फेडरेशन अध्यक्ष काका कोयटे आणि संचालक यावेळी उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष तान्हाजी रंजवे आणि सरव्यवस्थापक गजानन जाधव यांनी हा पुरस्कार स्वीकारला. संस्थेला यापूर्वी अनेक पुरस्कार प्रप्त झाले आहेत.

यावेळी पतसंस्थेचे पदाधिकारी तसेच राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे पदाधिकारी आणि अधिकारी उपस्थित होते. अनंत नागरी पतसंस्थेल पुरस्कार मिळाल्याबद्दल संस्थेच्या सदस्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

# राजकारण विरहित सहकार चळवळच ठरणार आहे सक्षम...

राष्ट्राच्या विकासामध्ये समाजकारण अर्थकारण, राजकारण व व्यापारीकरण या चार मूलभूत बाबींचा स्पर्श केला जातो. हे चारीही विभाग स्वतंत्ररीत्या कार्यरत राहिले तर राष्ट्र प्रगतीपथावर असते. अर्थकारणामध्ये समाजकारणामध्ये व्यापारीकरणामध्ये राजकारणाचा समावेश नसावा आणि राजकारण हे राजकीय व्यक्तींनी करावे अशा स्वरूपाचा त्यामधला गर्भित अर्थ आहे. मात्र सद्यस्थितीमध्ये कोणत्याही राष्ट्राच्या व्यवस्थेचे चिंतन करत असताना आपणाला दिसते की राष्ट्राच्या समाजकारणामध्ये अर्थकारणामध्ये व्यापारीकरणामध्ये राजकारणाचा समावेश झाला आहे. त्याला सहकार चळवळदेखील अपवाद ठरलेली नाही.



राजेंद्र घाटे
९८९०४ ०१७८८

सहकारी चळवळीचे मुख्य सूत्र म्हणजे समाजाच्या आर्थिक घटकाची उन्नती व्हावी. आर्थिक समानता यावी आणि एकत्र येणाऱ्या व्यक्तींना आपापले कार्य पूर्ण करण्यासाठी त्याची मदत व्हावी. या सूत्राला कुठेतरी छेद आता सध्या जाताना दिसतो आहे. याचे कारण सहकार चळवळ ही राजकारणापासून अलिप्त राहिली पाहिजे, हा विचार मागे पडून, राजकारणाच्या उभारणीसाठी राजकीय व्यक्तिमत्व घडवण्यासाठी म्हणून सहकारी संस्थांची स्थापना करणे ही बाब प्रचलित झाली आहे. त्यामुळे मूळ सहकार चळवळीचा गाभा कुठे बाजूला जाताना आपल्याला दिसतोय आणि हळुहळू सहकार चळवळीची वाटचाल ही खासगीकरणाकडे होती आहे का असा प्रश्न निरामन होतो.

वास्तविक पाहता यामध्ये सर्वच बाबींवर चिंतनाची वेळ आली आहे. समाजाची बदलत चाललेली प्रवृत्ती, शासकीय कर्मचाऱ्यांचा सहकार चळवळीकडे बघण्याचा दृष्टिकोन, संस्थाचालकांचा सहकारी संस्थांमध्ये असलेला वावर, सभासदांची संस्थेप्रती असलेली उदासीनता, सेवक वर्गाचं अकार्यक्षमतेकडे झुकलेले वर्तन, या सगळ्या गोष्टी या सहकार चळवळीला मारक ठरत आहेत. यावर राजकारणाचा काय परिणाम आहे तर आज स्थिती अशी आहे. सहकारी संस्थांमध्ये सभासद जे आहेत, यामध्ये राजकीय गट निर्माण झाल्याचे आपल्याला दिसत आहे. सरकारी कर्मचारी जे आहेत, त्यांच्यावर राजकारणी व्यक्तींचा दबाव आणि त्यानुसार निर्णय प्रक्रिया व त्यामध्ये बरोबर चूक न पाहता, सत्यता न पडताळता सहकारी संस्थांना वेठीस धरणे, सहकारात काम करणाऱ्या व्यक्तींना वेठीस धरणे ही प्रवृत्ती विकसित होताना दिसत आहे. कर्मचारी वर्गामध्ये जे काही बदल करण्याची अपेक्षा आहे, त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये बदल, नवीन नवीन समाजामध्ये येऊ घातलेले बदल, जेणेकरुन आपल्याला पाहता येईल की सर्वच क्षेत्रांमध्ये संगणकीकरणाचा प्रभावी वापर होऊ लागला आहे. ज्याला आपण इ-गव्हर्नन्स म्हणतो, त्या पद्धतीची रचना सर्वच क्षेत्रांमध्ये आहे. सहकार क्षेत्रदेखील त्याला अपवाद नाही. उलट काही देशांच्या सर्वेमधून असे निदर्शनास आला आहे की भारत हा असा देश आहे की ज्यामध्ये बँकेबाबत बँकिंग व्यवहाराबाबत टेक्नॉलॉजीचा जास्तीत जास्त वापर प्रभावीपणे हा केला जातो किंवा यामध्ये भारत प्रथम क्रमांकावरती आहे असे काही निष्कर्ष दिसत आहेत.



भारतामध्ये नुकतीच जी २० परिषद झाली. परिषदेमध्ये जे परकीय पाहुणे आले आणि भारतीय बाजारपेठेमध्ये ज्यावेळी ते फेरफटका मारत होते. त्यांच्या निदर्शनास आले की, छोटे छोटे दुकानदार रस्त्यावरती विक्री करणारे फिरते विक्रेते, यांच्याकडेदेखील क्युआर कोड आला आहे. नागरिक ऑनलाईनवर आर्थिक देवाण-घेवाण करीत आहेत. सर्व क्षेत्रांमध्ये आता यांत्रिकीकरणाची क्रांती झाली आहे. यांत्रिकीकरणाचा स्वीकार करणे, हे सहकारी संस्थांतील कर्मचाऱ्यांच्या समोर एक आव्हान आहे. म्हणून त्यांनीसुद्धा पाठिंबा दिला पाहिजे, नवीन बाबी आत्मसात केल्या पाहिजे. ग्राहक सेवेच्या बाबतीमध्येसुद्धा अर्थसेवा ही आता इमर्जन्सीच्या सेवांसारखे २४ तास सेवा देण्याची आता वेळ आपल्याकडे आली आहे. रात्री होणारे प्रवास रात्री अपरात्री एकमेकांच्या देशाशी होणारे दळणवळण, यामध्ये माणसाला केव्हाही आता अर्थाची गरज लागते आणि म्हणून आपल्याला तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक देता येतील का? या सगळ्या गोष्टींची आव्हाने समोर आहेत. म्हणून सहकारी संस्थांचा कारभार हा राजकारण विरहित जर झाला, तर खऱ्या अर्थाने त्यांना स्वायत्तता मिळेल आणि खऱ्या अर्थाने या संस्था समाजाच्या गरजा पूर्ण करू शकतील.

सहकारी संस्था स्थापन करत असताना असणारी गरज ही काळाच्या ओघामध्ये बदलत चालली आहे. अर्थकारणामध्येसुद्धा नॉन बँकिंग फायनान्स कंपन्यांसारख्या कंपन्या येऊ घातले आहेत. परकीय गुंतवणूकसुद्धा येऊ लागली. अशा सगळ्या बदलांमध्ये सहकारी चळवळ मागे पडत आहे. सहकाराचा विचार मागे पडत चालला आहे असे वाटते. याचे कारण शोधले तर लक्षात येते. राजकारणाच्या माध्यमातून सहकारी संस्थांना वेठीस धरले जात आहे. त्यामुळे ही चळवळ स्पर्धात्मक काळामध्ये टिकण्यात मागे पडली आहे. यावर चिंतन करत असताना सहकारातील मंडळींनी खऱ्या अर्थाने सहकारी चळवळीची तत्त्वे याचा कुठेतरी पुन्हा एकदा पुनर्मूल्यांकन करणे गरजेचे आहे. सहकारी चळवळ विकसित व्हावी यासाठी नेमकं काय केलं पाहिजे, याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

कोणाचे क्षेत्र कुठे आहे, हे सुद्धा आपण बसल्या जागेला जगातले लोकेशन शोधू शकतो, त्याचा पेपर पाहू शकतो. आधार कार्ड, पॅन कार्ड यासारखी कार्ड्स आज आपल्याला देशाच्या व्यक्तींचे आयडेंटिफिकेशन देऊ शकतात. यातूनच आपल्याला सहकारी चळवळीला कार्यक्षेत्र मुक्त करता येईल का? आज अनेक ठिकाणी मायग्रेशन्स होत असतात. महाराष्ट्राचा विचार करायचा म्हटले तर महाराष्ट्राच्या विविध तालुका, जिल्हा, गाव पातळीवरून लोक आज पुणे, मुंबई, नागपूर या ठिकाणी स्थलांतरित झाली आहेत. शिक्षणासाठी झाली किंवा व्यवसायासाठी झाली की नोकरीसाठी झाली, याबाबत सहकार चळवळीने कुठेतरी आता चिंतन करण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे जी व्यवस्था सहकार चळवळीची आहे, याचे सर्व अंतिम अधिकार हे सहकार खाते की जे सहकार मंत्र्यांच्या माध्यमातून चालविले जाते, त्यांच्याकडे आहेत. शेवटी अशा पद्धतीने चिंतन होऊन त्याला व्यवहाराच्या चौकटीमध्ये बसवणे आणि कायदा आणि व्यवहार याची सांगड घालून ही चळवळ सुदृढ करणे सक्षम करण्यासाठी राजकारणी व्यक्तींनी त्यामध्ये सकारात्मक विचार करण्याची आवश्यकता आहे.

सहकारी संस्थांना काही बाबी बंधनकारक झाल्यात की ज्या स्पर्धात्मक काळामध्ये त्यांना स्पर्धा करण्यासाठी त्यात तंत्रज्ञान असेल, मनुष्यबळ असेल, कायद्यातील तरतुदी असतील या अपुऱ्या पडतात आणि म्हणून सहकार चळवळ ही मूलतः राजकारणापासून विरहित असली पाहिजे. गावामध्ये

पान क्र. २५ वर...

# सहकाराचा प्रचार आणि प्रसार करणारे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अध्यासन



**सन १९८१ पासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अध्यासन सुरू करण्यात आले. याबाबतची सविस्तर माहिती लेखाच्या माध्यमातून देत आहोत...**

प्रवरा नदीच्या तीरावरील लोणी एक छोटसं खेडेगाव. तिथे १९०१ साली एका शेतकरी कुटुंबामध्ये विठ्ठलराव विखे पाटील यांचा जन्म झाला. अतिशय लहान वयामध्येच त्यांच्यावरती कुटुंबाची जबाबदारी आली. मूळचा आध्यात्मिक कल असतानाही शेती व त्यामुळे आजूबाजूची सामाजिक परिस्थिती याची जाण लवकरच आली. कोरडवाहू शेती व दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांची हलाखीची स्थिती पाहून काहीतरी त्यांच्या बांधवांच्या परिस्थितीमध्ये बदल झाला पाहिजे. यासाठी त्यांनी शेतकऱ्यांना प्रथम एकत्र करून लढा व नंतर सहकारी संस्थाची सुरुवात केली. त्यावेळेस खाजगी साखर कारखान्यांची सुरुवात झाली होती. शेतीमालावरती प्रक्रिया करण्याचा गुन्हाळांच्याशिवाय हा पहिला प्रयत्न म्हणावा लागेल. परंतु खासगी साखर कारखाने शेतकऱ्यांची पिळवणूक करत होते. कमी दर देणे, ऊस वेळेवर न उचलणे, तात्काळ उसाची किंमत अदा न करणे अशामुळे शेतकरी अतिशय त्रस्त झाला होता. यावेळी १९४५ साली पद्मश्रींची धनंजय राव गाडगीळ यांच्याबरोबर भेट झाली आणि त्यांनी सहकारी साखर कारखाना उभा करण्याचे ठरवले. वैकुंठ मेहता संस्थेमध्ये पद्मश्रींचे चिरंजीव माननीय बाळासाहेब विखे पाटील इंडियन सोसायटीच्या एका कार्यक्रमासाठी आले असताना त्यांना विचारले की ज्यावेळेस पद्मश्री साखर कारखान्याची उभारणी करत होते त्यावेळेच्या तुमच्या आठवणी काय आहेत. बाळासाहेब भावनावश झाले. खूप वेळ त्यांना सावरण्यास लागला आणि अगदी थोडक्यात त्यांनी सांगितले की त्यांचे वय त्यावेळेस १६ वर्षांचे होते. त्यावेळच्या सर्व आठवणी त्यांच्या लक्षात आहेत. आपल्या वडिलांच्यासाठी बाळासाहेब भाकरीचं गाठोडं डोक्यावर घेऊन ते वडिलांच्या मागे मागे फिरत असत व जिथे बैठक सभा होत. तिथे वडिलांच्या चपला सांभाळण्याचं कामही बाळासाहेब करत होते. तात्पर्य की अतिशय कष्टाने व स्वखर्चाने सहकार रुजवण्याचे कार्य त्या काळी करण्यात आले. उच्च मूल्य आधारित सहकार होता.

**भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय सहकार मंत्री अमीत शहा, 'मेक इन इंडिया' व 'सहकारातून समृद्धी'साठी अनेक उपक्रम / योजनांची अंमलबजावणी करत आहेत व विद्यापीठाचेही उद्दिष्ट आहे. ते अथिक प्रकर्षाने प्रत्यक्षात आणण्याची एक जबाबदारी अध्यासनावरती आहे.**



प्रा. डॉ. अनिल कारंजकर
८००७७ २५०८८

पद्मश्रींच्या विचाराचा प्रभाव केवळ बाळासाहेबांच्या वर नव्हे तर सर्व शेतकऱ्यांच्या वरही पडला व त्यातूनच १९४९ साली पहिल्या सहकारी साखर कारखान्याची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्याच वेळेस गुजरातमध्ये दूध प्रक्रियेसाठी 'अमूल'ची स्थापना पण झाली. पद्मश्रींच्या पहिल्या सहकारी साखर कारखान्यांसाठी त्यावेळेच्या मध्य प्रांताचे अर्थमंत्री वैकुंठ मेहता यांनी प्रांतीय सरकारतर्फे रुपये सहा लाखाची मदत केली. सरकारकडून साखर कारखान्यासाठी ही पहिली मदत होती त्यामुळे व पुढे पद्मश्रींच्या प्रेरणेने सहकारी साखर कारखान्यांचे जाळेच तयार झाले. पश्चिम महाराष्ट्र तर 'शुगर बाउल' म्हणून केवळ महाराष्ट्रात नव्हे तर सर्व जगभर प्रसिद्धीस आला. या सहकारी साखर कारखान्यांमधून इतर सहकारी संस्था जसे सहकारी बँका, दुध व्यवसाय संस्था, पाणीपुरवठा संस्था, पतसंस्था आदींचे एक मोठे जाळे विणले गेले. आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ पद्मश्रींच्या पहिल्या साखर कारखान्याने केली असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. त्याचेच प्रतिबिंब आपल्याला पुढे वारणानगर, इस्लामपूर, अकलूज अशा भागांमध्ये दिसते. शैक्षणिक संस्था, वैद्यकीय शिक्षण व उपचार संस्था व सहकारी संस्थांचे जाळेच निर्माण झाले. महाराष्ट्रातील औद्योगिकरणालासुद्धा अतिशय मोठ्या प्रमाणात यामधून चालना मिळाली. पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील यांचे हे कार्य पुढे सतत चालू राहावे या विचाराने तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळाचे सदस्य व बाळासाहेब विखे पाटील यांनी पुणे विद्यापीठाला विनंती करून पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील सहकार अध्यासनाची स्थापना १९८१ साली केली. अर्थात अध्यासनाचा मुख्य उद्देश हा पद्मश्री विखे पाटील यांच्या विचारांचा प्रसार करणे, सहकारी संस्थांच्यामध्ये नावीन्य आणणे, तरुण वर्गाला सहकारामध्ये निमंत्रित करणे व त्यांना शिक्षित-प्रशिक्षित करणे आणि मुख्य म्हणजे पद्मश्रींनी जे व्रतस्थ जीवन व्यतीत केले, ती मूल्ये नवीन पिढीमध्ये रुजवण्यासाठी सहकारामध्ये संशोधन करणे, त्याचबरोबर सहकार कायद्यामध्ये बदल, युवकांना सहकार संस्थांची स्थापना व व्यवस्थापन यासंबंधी माहिती देणे हे कार्य अध्यासनामार्फत केले जाते.

याबरोबरच काळानुरूप आपण पाहतो आहोत की आता कुटुंबव्यवस्था केवळ शहरांमध्ये नाही तर ग्रामीण भागातसुद्धा बदलली आहे. कुटुंबे अतिशय छोटी झालेली आहेत. शहरांमध्ये असो किंवा ग्रामीण भागात असो, घर हे दोन किंवा तीनच व्यक्तींचे असते. त्याचा परिणाम शेती कामासाठी किंवा इतर कामासाठी मनुष्यबळ उपलब्ध असत नाही. सध्या महाराष्ट्रामध्ये तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाची खूप मोठी सोय झाली आहे. गावोगावी इंजिनीअरिंग महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापन झाल्या आहेत. पण त्या प्रमाणात तिथून बाहेर पडणाऱ्या युवकांना संधी मिळत नाही. याच वेळेस ७० ते ८० टक्के शेतीमालाची अजूनही नासाडी होते. पिढ्यानपिढ्या शेतकऱ्यांना शेतीमालास योग्य भाव मिळत नाही. शहरी भागात वृद्धांचा सांभाळ, गिग सहकारी संस्था या सर्व प्रश्नांना एकत्रित करून युवकांना चांगली उपजीविका मिळावी, त्यांची पिळवणूक होऊ नये, त्याचबरोबर ग्राहकांचेसुद्धा पिळवणूक होऊ नये या दृष्टीने स्वयंरोजगाराच्या संधी सहकाराच्या माध्यमातून कशा उपलब्ध होतील, त्यासाठी त्यांनी काय केलं पाहिजे याची माहिती त्यांना त्यांच्या अभ्यासक्रम पूर्ण करताना जर मिळाली तर पदवी किंवा पदव्युत्तर नंतर युवक चाचपडत असतात, त्यांना पुढे काय करायचं, पुढे त्यांचे काय भविष्य याला कुठेतरी एक चांगली दिशा अध्यासनाच्या प्रयत्नातून मिळू शकेल. पद्मश्री डॉक्टर विठ्ठलराव विखे पाटील अध्यासनामार्फत अशी दिशा देण्याचे, एक विचार प्रवर्तनाचे काम करण्याचा मानस आहे.

**– सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
**पद्मश्री डॉ. वि. वि. पाटील सहकार अध्यासन**

*****

# पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने...

**पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघाच्या स्थापनेस ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. महासंघ जिल्ह्यातील गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्सना मार्गदर्शन करणे, संस्थांचे प्रश्न शासन दरबारी मांडणे, नियमांमध्ये आणि संस्थांच्या हिताच्या दुरुस्त्या सुचविणे, तसेच सभासद व कार्यकारिणी सदस्यांना प्रशिक्षण देणे अशी अनेक कामे करतो. महासंघाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांचा आढावा घेणारा हा विशेष लेख...**



सुहास पटवर्धन
९४२२० ०४७०१

महाराष्ट्रात एकूण १,२५,००० सहकारी गृहनिर्माण संस्था आणि २००,०००० अपार्टमेंट्स आहेत आणि यातील ८०% संस्था या मुंबई, पुणे, ठाणे या भागात कार्यरत आहेत.

पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स महासंघाच्या स्थापनेस ५० वर्षे पूर्ण झाली आहेत. महासंघ जिल्ह्यातील गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्सना मार्गदर्शन करणे, संस्थांचे प्रश्न शासन दरबारी मांडणे, नियमांमध्ये आणि संस्थांच्या हिताच्या दुरुस्त्या सुचविणे, तसेच सभासद व कार्यकारिणी सदस्यांना प्रशिक्षण देणे अशी अनेक कामे करतो. महासंघाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त महासंघाने ५०व्या वर्षात ५० विविध ठिकाणी ५० कार्यक्रम करण्याचा मानस व्यक्त करून तसे कार्यक्रमही आयोजित केले आहेत.

आपणास माहीत आहे की, सहकारास १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. यापूर्वी सहकार खाते हे कृषी खाते अंतर्गत येत होते. पण आता केंद्र सरकारने सहकारास प्रोत्साहन देण्यासाठी वेगळे सहकार खाते केंद्र स्तरावर निर्माण केले आहे. आणि मा. खासदार अमित शहा हे केंद्रीय सहकार मंत्री आहेत. तसेच आपल्या पुण्यातील लाडके माजी महापौर मा. मुरलीधर मोहोळ यांचीही आता केंद्रीय सहकार राज्य मंत्री म्हणून निवड झाली आहे. यामुळे पुण्यावर ही एक मोठी जबाबदारी आली आहे. सहकारी संस्थांच्या विविध प्रश्नांवर पुढाकार घेऊन ते सोडविण्याची जबाबदारी आपली आहे.

महाराष्ट्र हाउसिंग फेडरेशनला NCUI (नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया, नवी दिल्ली) यांनी सभासदत्व दिलेले आहे. २०२५ या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षामध्ये गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स यांच्या अनेक प्रश्नांवर पुढाकार घेण्याची जबाबदारी दिली आहे.

* **प्रशिक्षण –** महाराष्ट्रातीलच नाही तर संपूर्ण भारतातील गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्स यांच्या पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची जबाबदारी महाराष्ट्र हाउसिंग फेडरेशनने घेतली आहे.



* **डिजिटल इंडिया / सहकार मित्र –** आपणास माहीत आहे की, भारतात डिजिटल इंडिया नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन अशा अनेक सहकारी संस्था केंद्रीय व राज्य पातळीवर कार्यरत आहेत. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ मध्ये आपण भारतातील प्रत्येक सहकारी संस्थेत सहकार मित्र नेमणार आहोत. हा सहकार मित्र आपल्या संस्थेत / परिसरात अनेक प्रकारची कामे करणार आहे. उदा. संस्थेतील ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले, यांना संगणक, मोबाईल, इमेल, वेबसाइट इ. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबद्दल माहिती आणि प्रशिक्षण देणार आहेत. यातून अनेक युवक, युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे.

* **मतदान केंद्र व मतदान टक्केवारी वाढवणे –** सध्या भारतात सन २०२४ हे निवडणुकीचे वर्ष, संपूर्ण देशभरात लोकसभेच्या निवडणुका झाल्या आहेत. तसेच अनेक राज्यांत विधानसभेच्या निवडणुका झाल्या आहेत, महाराष्ट्रातही आता विधानसभा निवडणुका होणार आहेत, यानिमित्ताने महाराष्ट्रातील सर्व जिल्हा फेडरेशन/महासंघ केंद्रीय आणि राज्य निवडणूक आयोग, जिल्हाधिकारी, निवडणूक आयुक्त यांचे सहकार्यातून पुण्यापासून काही उपक्रम करीत आहोत. ज्यामुळे प्रत्येक गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट्समध्ये १०० टक्के मतदान व्हावे हे आपले उद्दिष्ट असणार आहे. यासाठी आपण मतदार याद्या अद्ययावत करणे, नवीन मतदारांची नावनोंदणी करणे, बदलून गेलेल्या किंवा मृत मतदारांची नावे कमी करणे, यासाठी मोठ्या प्रमाणावर मोहीम राबविली आहे. पुणे शहरात पहिल्यांदाच १२६ विविध मोठ्या गृहनिर्माण संस्थांमध्ये मतदान केंद्रे सुरु झाली आहेत. यामुळे त्या संस्थेतील व त्या भागातील सामान्य नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला, अपंग यांना मतदान करणे सुलभ होणार आहे. त्यांचा त्रास व वेळ वाचणार आहे. केंद्र, तसेच राज्य व जिल्हा प्रशासनाशी सहकार्य करून, आपण हा एक मोठा उपक्रम राबविला आहे. यातून लोकशाही आणि मुक्त वातावरण निर्माण होईल, अशी आम्हाला खात्री आहे. यासाठी आपण मतदार याद्या अद्ययावत करण्यासाठी, नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. हा उपक्रम कायमस्वरूपी यापुढेही आपण चालू ठेवणार आहोत. मतदानाच्या दिवशीही नागरिकांना, संस्थांतील सभासदांना काही अडचण आल्यास त्या दूर करण्याचा आपण प्रयत्न करणार आहोत.

आम्हाला खात्री आहे की या उपक्रमामुळे मतदान टक्केवारीबाबत पुण्याचे एक नवे रेकॉर्ड निर्माण होईल.

* **निवडणूक सहकार मित्र –** यानिमित्ताने आपण विविध संस्थांमधील काही प्रतिनिधी घेऊन त्यांना निवडणुकीत सहकार मित्र म्हणून कार्य करण्यासाठी प्रशिक्षण देणार आहोत. ही जबाबदारी महाराष्ट्र आणि पुणे जिल्हा फेडरेशनने घेतली आहे.

* **शाळा, कॉलेज, विद्यापीठे यामधील उपक्रम –** आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ निमिताने आपण असे अनेक उपक्रम सुरू केले आहेत. आणखी नवीन उपक्रम शाळा, कॉलेज, विद्यापीठे यामध्ये त्यांचे संस्थेच्या सहकार्याने राबविणार आहोत. तेथे आपण विविध कार्यक्रम आणि प्रशिक्षण सुरू करणार आहोत. आणि सहकारातून समृद्धी हे ध्येय पूर्ण करणार आहोत.

* **सहकार डेबिट कार्ड** (Debit Card) – आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष २०२५ आधी या वर्षात आपण विविध राष्ट्रीय, सहकारी, व्यापारी बँकांच्या सहकार्यातून सहकार डेबिट कार्ड निर्माण करण्याचे योजिले आहे. या डेबिट कार्डच्या माध्यमातून सहकारी संस्था व त्यांच्या सभासदांना विविध उत्पादने १० टक्के किंवा अधिक डिस्काउंट मिळून थेट उत्पादकांकडून खरेदी

पान क्र. २५ वर...

पान क्र. २२ वरून...

## राजकारण विरहित सहकार चळवळच ठरणार आहे सक्षम...

सहकारी संस्था स्थापन करायची असेल किंवा झाली असेल तर विविध प्रकारच्या राजकीय मंडळींनी एकत्र यावे. वैचारिक विविधता असलेल्या व्यक्तींनी एकत्र यावे व आर्थिक सामाजिक उन्नतीसाठी सहकारी संस्थेची स्थापना करावी. सहकारी संस्था चालवत असताना विचारांमध्ये राजकीय विचार असेल तो सहकारी संस्थेच्या दरवाज्याच्या बाहेर ठेवावा, अशी भूमिका स्व. यशवंतराव चव्हाण यांनी कायम घेतली. ग्रामीण भागामध्ये क्रांती झाली असेल तर ती सहकार चळवळीमुळे झाली आणि जिथे सहकार चळवळीला एक उत्तम नेतृत्व मिळाले, त्या परिसरामध्ये सहकार चळवळीच्या माध्यमातून विकास झालेला पाहायला मिळतो.

पश्चिम महाराष्ट्र, गुजरातमध्ये अमूल सारखा प्रकल्प (आनंद डेअरी), नागपूरमध्ये विदर्भ प्रीमियर को-ऑप. हाऊसिंग सोसायटी आहे, अशा पद्धतीच्या अनेक संस्था आहेत. ज्यांनी आपले कार्य उत्तमरीत्या केले आणि त्याचा परिणाम समाजातील समाजकारण, अर्थकारण व्यापारीकरण सुदृढ होण्यासाठी झाला. राजकीय हस्तक्षेपाने जर सहकारी संस्था उभ्या राहणार असतील, चालवल्या जाणार असतील, तर ही चळवळ बदनाम व्हायला वेळ लागणार नाही. बदनामी आपोआप होते व खासगी क्षेत्र पुढे येताना दिसतात. यातून कुठल्याही विषयावरती कुठल्याही पक्ष राजकीय नेते यांच्यावर टीका टिपणी करायची नाही. सहकारात काम करत असताना ही सहकार चळवळीची निकोप वाढ कशी होईल, यासाठी सर्व राजकीय मंडळी एकत्र यावे. सहकारी चळवळी सक्षम करण्यासाठी त्याचा कसा उपयोग करता येईल, याचा विचार व्हावा. महाराष्ट्रामध्ये असा विचार अनेक वेळा झालाय. त्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ स्थापन करण्यात आले.

सहकार चळवळ सक्षम, सुदृढ व्हावी यासाठी खऱ्या अर्थानं जो अंत्योदयाचा विषय समोर आला आहे की समाजातल्या शेवटच्या घटकाचा विकास झाला पाहिजे तर राष्ट्राचा विकास होईल ही कल्पना सातत्याने पुढे येत आहे. ही कल्पना प्रत्यक्षात आणायची जर असेल तर की सहकार चळवळीशिवाय पर्याय नाही. कारण सहकारामुळे ग्रामीण भागामध्ये व्यक्ती व्यक्तींपर्यंत पोहोचता येते. खासगी क्षेत्राला आता तिथपर्यंत पोहोचण्यासाठी बराच पल्ला गाठावा लागेल. म्हणून सहकारी चळवळीच्या माध्यमातून गावोगावी असलेल्या विविध कार्यकारी सहकारी संस्था, शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या गृहनिर्माण सहकारी संस्था, सहकारी बँक, पतसंस्था, दूध डेअरी यांना चालना देण्यासाठी काय करता येईल अशा पद्धतीची एक रचना राज्यामध्ये विकसित व्हावी. महाराष्ट्राने सहकारी चळवळीचे नेतृत्व केलेले आहे. पुन्हा एकदा आम्ही सर्वच कार्यकर्ते मंडळींनी महाराष्ट्रातील सहकार चळवळ नुसती सुदृढ सक्षम नव्हे तर देशाला, जगाला आदर्शवत कशी ठरेल, यासाठी कार्य करण्याची आवश्यकता आहे. ****

---

पान क्र. २४ वरून...

## पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्ताने...

करता येतील, यासाठी आपण प्रयत्न सुरू केले आहेत. यामध्ये अगदी फ्रिज, टीव्ही, सोलर, सफाई उत्पादने, धान्य, फर्निचर, फळे, भाज्या, अशा अनेक ग्राहकोपयोगी उत्पादनांचा समावेश असणार आहे. याचा मोठा फायदा सहकारी संस्था आणि सभासदांना दोघांनाही मिळणार आहे.

* **सदनिका भाड्याने देणे-घेणे –** आपण नागरिकांना संस्थेतील त्यांचे सदनिका भाड्याने द्यायचे, घ्यायचे असतील तसेच खरेदी विक्री करायची असेल, तर ही माहिती अद्ययावत करून ऑनलाईन माध्यमातून उपलब्ध करून देणार आहोत. यासाठी पुढाकार घेणार आहोत.

* **डीम्ड कन्व्हेयन्स / मानीव हस्तांतरण तसेच पुनर्विकसन, स्वयं-पुनर्विकास –** याबद्दलची सर्व प्रक्रिया आता ऑनलाईन होणे आवश्यक आहे. यासाठीही आपण शासन स्तरावर पाठपुरावा करून त्यास मान्यता मिळवली आहे. यामुळे ही प्रक्रिया जलद आणि पारदर्शकपणे होईल. आणि सर्व नागरिकांना त्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष लाभ होईल.

* **बिगरशेती कर (एन.ए. नॉन-ॲग्रीकल्चर) कर –** हा जो NA tax होता, त्यासाठी महासंघाने विविध प्रकारे पाठपुरावा केला होता, जनहित याचिका दाखल केली होती. त्यास यश मिळून आता सरकारने एन.ए. कर रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. ब्रिटीशांच्या काळातील हा कर आता कायमस्वरूपी रद्द झाला आहे. ही एक मोठी उपलब्धी आपण पूर्ण केली आहे. सरकारने गावठाणाचा विस्तार करून ही करमाफी करणे आवश्यक होते. कारण आता नवीन बांधकामे आणि विकासकामांमुळे अशा ठिकाणी आत्ता भविष्यात शेती होणार नाही किंवा शेती होणे अशक्य आहे, अशा ठिकाणीही सरकारने एन. ए. कर लावणे चालू ठेवले. त्यात वाढही केली. तसेच दंड आणि व्याजसुद्धा लावले होते आणि २० वर्षांच्या थकबाकीच्या नोटिसा पाठविल्या होत्या. यामध्येही आत्ता महासंघाने अशा ठिकाणीही एन.ए. कर माफ करण्यात यावा, अशी याचिका/पुनर्याचिका महासंघाने केली आहे. आम्हास खात्री आहे की सरकार यामध्ये सकारात्मक विचार करेल आणि एन. ए. कर व्याज दंड/सहित पूर्वीचाही पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेईल. यासाठी मा. उच्च न्यायालयात आपली याचिका प्रलंबित आहे.

* **तंटा-मुक्त सोसायटी –** याचबरोबर तंटा-मुक्त सोसायटी हा एक मोठा उपक्रम महासंघाने राबवणे सुरू केले आहे. यासाठी महासंघाने विविध कार्यक्रम घेतले आणि त्यावेळी असलेले मा. सहकार आयुक्त, श्री. अनिल कवडे साहेब आणि विद्यमान आयुक्त मा. दिपक तावरे साहेब, यांचे मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम आयोजित करून, संस्थांना संपर्क करून संस्थेने आपापसात चर्चा करून वाद-तंटा मिटवण्यासाठी पुढाकार घेतला. तंटा-मुक्त सोसायटी निर्माण करण्याचे ध्येय ठेवले आहे.

* **टँकरमुक्त संस्था –** जनतेला पिण्याचे स्वच्छ पाणी पुरवणे ही सरकारची जबाबदारी आहे. मात्र, पुणे आणि उपनगरातील अनेक संस्थांना पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावत आहे. उदा. बाणेर, बालेवाडी, नगर रोड, उंड्री आदी भागातील अनेक संस्थांना लाखो-करोडो रुपये खर्च करून पाणी टँकरने मागवावे लागते. यातीलही लॉबी दूर करण्यासाठी, मोडून काढण्यासाठी याबाबतही महासंघाने व इतर समविचारी संस्थांनी ॲडव्होकेट श्री. सत्या मुळे याचे मार्फत मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे आणि टँकरमुक्त संस्था निर्माण करण्याचे ध्येय ठरविले आहे. याबाबत विभागीय आयुक्त यांचेकडे दर ३ महिन्यांनी आढावा/review घेतला जातो. आम्हाला खात्री आहे की, या माध्यमातून आपला पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटेल.

अशा अनेक प्रश्नांवर महाराष्ट्र राज्य व विविध जिल्हा महासंघ व विभागीय कार्यालये पातळीवर दर महिन्याला विविध ठिकाणी मेळावे, संमेलने, सहकार दरबार, आयोजित करण्यात येतो. तसेच याबाबत अखिल भारतीय स्तरावर गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट यासाठी प्रतिनिधी मंडळ (Representative Body) निर्माण करून देशातील सर्व संस्थांना आपण यामध्ये जोडणार आहोत.

मला खात्री आहे की, या सर्व उपक्रमात सर्व सहकारी संस्था, सहकार प्रतिनिधी यांचे महाराष्ट्र आणि जिल्हा फेडरेशनला नेहमी सहकार्य मिळाले आहे. आणि यापुढेही असेच सहकार्य मिळण्याची अपेक्षा करतो.

**– सुहास पटवर्धन**

**पुणे/महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण महासंघ अध्यक्ष**

******

# देशातील साखर उद्योगाला नवी दिशा देणारा आराखडा तयार



आगामी दहा वर्षांचा साखर उद्योगाचा विचार करुन या क्षेत्रातील विविध घटकांचा अभ्यास करुन आराखडा तयार केला आहे नजीकच्या काळात हा आराखडा केंद्र सरकारला सादर करण्यात येणार आहे. यामध्ये उसाचे नवे वाण, लागवड उपलब्ध पाण्याचे नियोजन उपपदार्थ, सहवीज निर्मिती, ऊसाचा दर, तसेच साखरेचा घरगुती आणि व्यापारी क्षेत्रासाठीचा दर, सहकारी आणि खासगी साखर कारखाने आदी बाबींचा साकल्याने विचार करण्यात आला आहे. हा आराखडा या क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या विभागाला देण्यात येणार आहे. याबाबत व्यापक चर्चा झाल्यानंतर या आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.



प्रकाश नाईकनवरे
९२०५३ ७७५५४

भारतीय साखर उद्योग दिशा आणि दशा या मुख्य विषयावरील आराखडा तयार करताना ऊस उत्पादक शेतकरी, व्यापारी, याखेरीज अन्य घटक, तसेच सहकारी आणि खासगी साखर कारखाने अशा विविध घटकांचा व्यापक विचार करण्यात आला आहे. अशा स्वरूपाचा आराखडा साखर उद्योगासाठी प्रथमच तयार करण्यात आला आहे. तसेच विविध प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी कोणती उपाययोजना करता येईल याचादेखील साकल्याने आराखड्यात विचार करण्यात आला आहे. त्यामुळे हा आराखडा साखर उद्योग क्षेत्राच्यादृष्टीने महत्त्वपूर्ण आणि नवी दिशादर्शक ठरणारा आहे.

*** साखर उद्योग क्षेत्रात उपपदार्थ निर्मितीवर भर –**

गेल्या काही वर्षात साखर उद्योग क्षेत्रात उपपदार्थ उत्पादनास साखरेच्या बरोबर प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामध्ये सहवीजनिर्मिती, इथेनॉल, डिस्टिलरी आदी उत्पादनांवर विशेष भर देण्यात आला आहे. उपलब्ध माहितीनुसार गेल्या वर्षी सुमारे ७ लाख टन साखरेचा वापर इथेनॉलसाठी करण्यात आला आहे. तर यावेळच्या हंगामात सुमारे १२ लाख टन साखरेचा वापर होण्याचा अंदाज आहे. त्यामागे एकमेव कारण म्हणजे साखर उद्योग हा आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावा आणि उस उत्पादक शेतकऱ्यांना उसाचा रास्त आणि किफायतशीर दर देता यावा याची सांगड साखरेच्या किमान विक्री दराशी घालणे आवश्यक आहे. त्या प्रमाणात इथेनॉलच्या विक्री दरात वाढ होणे गरजेचे आहे.

*** इथेनॉल उत्पादनाचा कारखान्याला आधार –**

इथेनॉलचा वापर इंधनात करणे हे नक्कीच स्वागतार्ह पाऊल असणार आहे. कारण गेल्या ५ वर्षांत जैव इंधन क्षेत्र म्हणून इथेनॉलच्या वाढीमुळे ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर उत्पादन क्षेत्राला मोठा आधार मिळाला आहे. त्यामुळे आपोआपच कारखान्याची आर्थिक स्थिती सुधारण्यास हातभार लागला आहे. सन २१-२२ मध्ये तेल विपणन कंपन्यांना केलेल्या इथेनॉलच्या विक्रीतून साखर उद्योगाला २०,५०० कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे तर येत्या २०२५ पर्यंत यामध्ये वाढ होऊन ६० लाख मे. टनापेक्षा अधिक साखर इथेनॉल उत्पादनासाठी वळविण्याचे उद्दिष्ट असणार आहे. म्हणजेच या क्षेत्रात जगात भारत हा इथेनॉल उत्पादन क्षेत्रातील तिसरा देश ठरणार आहे.

*** साखरेच्या दराबाबत साशंकता –**

ऊसाच्या रास्त आणि किफायतशीर दरात दरवर्षी वाढ होत असली तरी साखरेच्या दरात वाढ होत नाही. तसेच साखरेचा उत्पादन खर्च वाढत असल्याने साखर कारखान्यांचा तोटा वाढतो आहे. केंद्र सरकारने साखरेचा किमान विक्री दर प्रती किलो हा ४२ रुपये करावा, असा प्रस्ताव राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने केंद्र सरकारला दिला आहे. साखर उत्पादनात जगात भारताचा दुसरा क्रमांक आहे. त्यातच सध्याची स्थिती साखर निर्यातीला अनुकूल आहे, तशी मागणीदेखील करण्यात आली आहे. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे साखरेचा बाजारातील साखरेचा दर हा घरगुती आणि व्यावसायिक वापरसाठीचा एकच आहे. देशातील एकूण मागणीचे प्रमाण पाहता २० ते २५ टक्के घरगुती आणि उर्वरित मागणी ही व्यावसायिक वापरसाठीची आहे. त्यामुळे मुख्यत्वे साखरेच्या दराचा प्राधान्याने विचार करण्यात यावा अशी मागणी या क्षेत्रातून करण्यात येत आहे.

*** आगामी गाळप हंगामात ऊसाची उपलब्धता वाढणार –**

यंदाच्या वर्षी देशभरात पावसाचे प्रमाण समाधानकारक असल्याने त्याचा फायदा ऊसाच्या उत्पादनाला झाला आहे. नजीकच्या काळात सुरू होणाऱ्या उसाच्या गाळप हंगामात त्याचे प्रतिबिंब पाहावयास मिळणार आहे. नुकत्याच संपलेल्या वर्षात देशात ३१३७.८० लाख टन ऊसाचे गाळप पूर्ण झाले आहे आणि साखर उतारा १०.२० टक्के राहिला आहे. येणाऱ्या हंगामात देशात ३२१ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज आहे. तर २१ लाख टन साखर इथेनोलसाठी उपलब्ध होण्याचा अंदाज आहे.

मात्र महाराष्ट्रात येणाऱ्या गाळप हंगामात अंदाजे १० लाख टन साखर उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. म्हणजेच गतवर्षी राज्यात ११० लाख टन साखर उत्पादन झाले होते, ते येत्या हंगामात ९० ते १०२ लाख टन होण्याचा अंदाज आहे. यावर्षी राज्यात ११.६७ लाख हेक्टरवर ऊसाची लागवड झाली आहे. साधारणपणे ९०४ लाख टन उसाचे गाळप होण्याचा अंदाज आहे. महाराष्ट्राच्या बरोबरीने कर्नाटक, बिहार, गुजरात, तमिळनाडू, मध्य प्रदेश, हरियाणा, पंजाब, उत्तराखंड, तेलंगणा, पश्चिम बंगाल आदी राज्यात ऊसाचे पीक घेण्यात येते.

*** साखर नियंत्रण आदेशाकडे सर्वांचे लक्ष –**

साखर नियंत्रण आदेश १९६६ मध्ये सुधारणा प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन आहे. त्याचा मसुदा साखर नियंत्रण आदेश २०२४ कारखान्यांकडे पाठविण्यात आला आहे. याबाबत कारखान्यांनी सूचना हरकती पाठवाव्यात असा दृष्टीकोन आहे. साखर नियंत्रण आदेश २०२४ नुसार नवा कायदा अस्तित्त्वात आल्यास त्याच्या परिणामाबाबत विविध स्वरूपाच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

एका अर्थाने सरकारची साखर उद्योग क्षेत्रावरील पकड अधिक घट्ट होणार काय? असे अनेक प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. मात्र साखर नियंत्रण कायद्यातील दुरुस्तीच्या आधी केंद्र सरकारने २०२४-२५ या वर्षात उसाचा रस, शुगर सिरप बी - हेवी, सी हेवी पासून इथेनॉल उत्पादनाला मंजूरी दिली आहे. तसेच ऊसाच्या रसापासून तयार करण्यात येणारी खांडसरी आणि गुळाच्या उत्पादनाला अधिकृत व्यवसायाचे स्वरूप येणार आहे.

– व्यवस्थापकीय संचालक
राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ
नवी दिल्ली. *****

# सहकार क्षेत्रात आदर्श नागरी पतसंस्थेला सर्वोच्च स्थानावर नेण्याचा संकल्प

## नवीन आर्थिक वर्षात ८०० कोटी एकत्रित व्यवसायाचे उद्दिष्ट

**आदर्श पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्य पतसंस्था फेडरेशनचे उपकार्याध्यक्ष सुरेश पाटील यांच्याशी सहकार सुगंध रायगड जिल्हा प्रतिनिधी मेघराज जाधव यांनी केलेली बातचीत...**



सुरेश पाटील
संस्थापक अध्यक्ष

शून्यातून विश्व निर्माण करण्याएवढे यश आदर्श संस्थेने गेल्या २६ वर्षांत संपादन केले असून ६५० कोटी एकत्रित व्यवसायाचा टप्पा गाठला असून यंदाच्या वर्षी तो ८०० कोटींपर्यंत नेण्याचा संकल्प आहे. अलिबागमध्ये छोट्याशा २०० चौ. फूट भाडयाच्या जागेत मांडलेल्या संसाराचे स्वरूप आदर्श भवन सारखी दिमाखदार वास्तू उभारण्यात झाले आहे. संस्थेने १७ शाखांच्या माध्यमातून ४० हजारांहून अधिक सभासदांना जोडण्याचा प्रयत्न केला आहे. संस्थेने सामाजिक बांधिलकी जोपासत गुणवत्तापूर्वक व्यवस्थापन व मूल्यवर्धित ग्राहक सेवेकडे विशेष भर दिला आहे, अशी माहिती अध्यक्ष सुरेश पाटील यांनी सांगितली.

*** आदर्श पतसंस्थेची वेगळी कोणती वैशिष्ट्ये आहेत –**

बँकिंग सेवा क्षेत्रात मग त्या बँका असोत वा पतसंस्था एनपीएचे प्रमाण हे न्यूनतम राखणे खूपच आव्हानात्मक असते. आदर्श पतसंस्थेने कर्ज वसूली ही प्रधान बाब मानून प्रशिक्षित कर्मचारी यांच्या सहकार्याने वसुली करत ग्रॉस एनपीए प्रमाण फक्त ०.८८ टक्क्यांपर्यंत खाली आणले आहे. संस्थेने सुरुवातीपासूनच शून्य टक्के नेट एनपीए राखून लेखापरीक्षणात सातत्याने ऑडिट 'अ' वर्ग प्राप्त केला आहे उल्लेखनीय बाब म्हणजे आदर्श पतसंस्थेच्या स्वमालकीच्या सुमारे २५ कोटी इतक्या बाजारमुल्याच्या कार्यालयीन ८ जागा आहेत. स्वमालकीच्या मुख्य कार्यालयाच्या ईमारतीमधून १७ शाखांवर विभागवार कामकाज नियंत्रण व नियोजन होत असून कर्जवाटप व वसुली याबाबत कर्मचाऱ्यांना व्यवस्थापनाकडून १०० टक्के स्वातंत्र्य दिले जाते आणि संस्थेची गुंतवणूक संपूर्ण सुरक्षित आहे.

*** संस्थाचालक हे विश्वस्ताच्याच भूमिकेत –**

संस्थाचालक हे मालक नसून विश्वस्ताच्या भूमिकेत सदैव राहतात. त्यामुळे सभासदांचे हित जोपासणे हे प्रमुख कर्तव्य मानले जाते. सर्वसामान्यांसाठी वैयक्तिक अडचणीसाठी १.५० लाख रकमेपर्यंत सुलभ व जलद कर्जासाठी वैयक्तिक कर्ज योजना उपलब्ध असून अल्प रिड्युसींग व्याजदरामध्ये दिली जाते. आदर्श कोणत्याही मायक्रो फायनान्स कंपनीमार्फत कर्ज वाटप न करता त्यासाठी स्वत:च्या कर्मचाऱ्यांद्वारे संचलित अशा कार्यपद्धतीद्वारे ग्रामीण जनतेला मायक्रो फायनान्सपेक्षा जवळजवळ निम्म्या व्याजदरामध्ये सर्वात जलद कर्ज उपलब्ध करून देत आहे. तसेच अनेक खासगी नॉन बँकिंग फायनान्स कंपन्याही ग्राहकांकडून खूप जास्त व्याज घेत आहेत आदर्श त्यांच्यापेक्षाही निम्म्या व्याजदरामध्ये कर्ज उपलब्ध करून देत आहे. अतिजलद कर्जासाठी सोनेगहाण, राष्ट्रीय बचतपत्र तारण, एलआयसी तारण, ठेवतारण सारख्या योजना अल्प व्याजदरात उपलब्ध असल्याने गरजू कर्जदार याचा लाभ घेतात.

*** सर्वसामान्यांसाठी विविध कर्ज योजना –**

सर्वसामान्यांसाठी होम अप्लायन्सेस टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन, इन्व्हर्टर तसेच सोलर खरेदीसाठी त्वरित कर्ज योजना उपलब्ध असून टू व्हीलर खरेदीसाठी कमी व्याजदराने त्वरित कर्ज तसेच महिलांसाठी टू व्हिलर कर्जासाठी सवलतीच्या व्याजदराने संस्था कर्ज देत आहे.

सर्वसामान्यांसाठी वरील सर्व कर्जांना कमीतकमी कागदपत्रे व कमीतकमी व्याजदर आकारला जात असून समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयास आदर्श करीत आहे. त्यासाठी सर्व सभासद कर्जदार ठेवीदार यांची मोलाची साथ हवी त्यांनी समर्थपणे संचालक मंडळाच्या पाठीशी रहावे असे आवाहन करून आदर्श पतसंस्थेप्रती व्यक्त केलेल्या विश्वासाला कधीही तडा जाणार नाही. तसेच आपुलकी जिव्हाळा व सहकाऱ्यांच्या बळावर पतसंस्थेला सर्वोच्च स्थानावर नेण्याचा संकल्प सिद्धीस नेऊन कोकणात नव्हे, महाराष्ट्रात 'आदर्श'चे नाव उज्वल करू असा सार्थ विश्वास व्यक्त केला.

*** विविध पुरस्काराने कार्याचा गौरव –**

संस्था सामाजिक कार्यातही अग्रेसर आहे. सहाशे मोतीबिंदू ऑपरेशन्स दरवर्षी रक्तदान शिबिरे आयोजन अशा इतर अनेक क्षेत्रांमध्ये समाजसेवेचा आदर्श संस्थेने निर्माण केलेला आहे. महाराष्ट्र शासनाचा पहिला सहकार भूषण पुरस्कार, राज्य फेडरेशनचा सर्वोत्तम आदर्श पतसंस्था दीपस्तंभ पुरस्कार व रायगड जिल्हा फेडरेशनचे पुरस्कार तसेच बँको पुरस्कार असे अनेक महत्वाचे पुरस्कार संस्थेला लाभले असल्याचेही त्यांनी सांगितले.

*****



# बुलडाणा अर्बन अन्न सुरक्षेसाठी गोदाम श्रृंखलेवर भर देणार



**बुलढाणा –** बुलढाणा अर्बनच्या ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभेत सदस्यांना ११ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष राधेश्याम चांडक होते.

बुलडाणा अर्बनला कुटुंब मानतो. हे कुटुंब देशभरामध्ये आदर्श आहे. येता काळ हा शेती व्यवस्थेवर अवलंबून असणारा काळ असणार आहे. जगभरामध्ये जमीन कमी होत आहे. अन्नाची गरज वाढत आहे. अनेक देशांमध्ये कधी ओला आणि कोरडा दुष्काळ असतो. त्यामुळे शेती उत्पादनात साठवून ठेवण्याची क्षमता वाढवावी लागणार आहे. आगामी काळात बुलडाणा अर्बन अन्न सुरक्षेच्या दृष्टीने गोदाम श्रृंखलेला अधिक बळ देणार आहे.

उत्पादित मालाच्या निर्यातीची गरज लक्षात घेऊन बुलडाणा अर्बन फार्मर प्रोड्युसर कंपनीच्या सहकार्यातून मालाची निर्यात केली जाणार आहे. प्रायोगीक तत्त्वावर लवकर गुलाब फुलांची निर्यात करण्यात येणार आहे. देशातील विद्युत निर्मिती क्षेत्रातील संकटाचा सामना करण्यासाठी प्रत्येकाने सौर ऊर्जाचा उपयोग करून घ्यावा. संस्था लवकरच चिखली येथे सौरऊर्जा प्रकल्प करणार असल्याचे ते म्हणाले.

**नवीन तंत्रज्ञानावर भर देणार – डॉ. सुकेश झंवर**

संस्थेचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक डॉ. सुकेश झंवर यांनी संस्थेचा संपूर्ण आढावा सादर केला. संस्थेच्या प्रगतीची माहिती सांगितली. वेअर हाऊसचा फायदा सात लाखापेक्षा अधिक शेतकरी घेत आहेत. संस्थेचे १३ कोल्ड स्टोरेज असून त्याचाही शेतकऱ्यांना फायदा होत आहे. संस्थेच्या सभासदाला क्यूआर कोड, डिजिटल बँकींग प्रणाली, एटीएम व अशा प्रकारच्या सुविधांचा लाभ मिळत आहे.

वेद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शांतीपाठ म्हटला. विषय पत्रिकेचे वाचन संजय कुलकर्णी यांनी तर सुत्रसंचलन गजानन धांडे यांनी आणि आभार डॉ. किशोर केला यांनी मानले. सभेकरिता मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, नागपूर, भंडारा, चंद्रपूर, नांदेड, लातूर धाराशिव, जळगांव वर्धा या जिल्ह्यातून तसेच मध्यप्रदेश, तेलंगण, आंध्रप्रदेश या राज्यातून सभासद सदस्य तसेच संचालक, खातेदार उपस्थित होते.

# निवेदिता महिला सहकारी सोसायटीचा १५ टक्के लाभांश जाहीर

**चंद्रपूर –** गेली अनेक वर्षे सदस्यांना १५ टक्के लाभांश देणारी निवेदिता महिला सहकारी क्रेडिट को-ऑप. सोसायटीने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात १ कोटी ८२ लाख रुपये नफा मिळविला आहे. संस्थेच्या नऊ शाखा कार्यरत आहेत. सोसायटीची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये वरील माहिती सांगण्यात आली.

संस्थेच्या एकूण ठेवी १४७.५२ कोटी असून ५५.५५ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. वसूल भाग भांडवल २०३.४४ कोटी असून स्वनिधी १८ कोटी ५६ लाख ४४ हजार आहे.



अहवाल वर्षात संस्थेला १ कोटी ८२ लाख ९६ हजार नफा झाला असून आणि सदस्यांना १५ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे.

सध्या संस्थेच्या ९ शाखा कार्यरत असून संस्था स्थापनेपासून लेखा परीक्षणात 'अ' वर्ग मिळत आहे. उपाध्यक्ष प्रज्ञा कवासे यांनी आभार मानले.

# पतसंस्थांच्या अडकलेल्या ठेवी लवकरच परत करणार

कॅश क्रेडिट खात्याच्या युनिटची, खातेदाराची ठराविक अंतरानंतर निश्चितपणे भेट घ्यावी. युनिटला भेट दिल्यानंतर तेथील परिस्थिती समजू शकते. त्याचप्रमाणे स्टॉकबाबतही अंदाज बांधता येतो. ही भेट सदिच्छा भेट नसावी तर यामध्ये जीएसटी रिटर्न्स बघणे, सेल्स रेकॉर्ड्स तपासणे या बाबी अंतर्भूत असाव्यात. याव्यतिरिक्त खातेदाराशी औपचारिक आणि अनौपचारिकपणे बोलून त्यांना त्यांच्या खात्याबद्दल काही अडचणी असल्यास त्यातून मार्ग काढता येतो. खातेदाराची अतिरिक्त कर्ज मागणी असल्यास त्याबद्दलही सहानुभूतीने विचार करता येतो. प्रत्येक भेट ही व्यवसाय वाढीची संधी या पद्धतीने त्या भेटीकडे पहावे. भेटीच्या निमित्ताने आजूबाजूला

पान क्र. ५३ वर

# नागरी सहकारी बँका - परिस्थितीनुरूप बदलाची अपेक्षा



गणेश निमकर
९८२२५ ६८५५०

**आजच्या डिजिटल युगात सहकारी संस्थांनी आपण सध्या कुठे आहोत व भविष्यात आपल्याला या स्पर्धेत टिकून रहायचे असेल तर नेमके कोणते बदल आणि ते किती कालावधीत स्वीकारणे आवश्यक आहे याचे आत्मचिंतन करून त्या दृष्टीने तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे.**

सावकारीला पर्याय म्हणून सहकारी चळवळ उदयास आली. ग्रामीण भागात राज्य सहकारी, जिल्हा मध्यवर्ती बँक व वि.का.स. संस्थांच्या त्रिस्तरीय यंत्रणेच्या माध्यमातून कृषी पतपुरवठा केला जातो. नागरी व शहरी भागातील रहिवासी यांना नागरी सहकारी बँका व पतसंस्थांचे माध्यमातून वित्त पुरवठा केला जातो. एका अर्थाने त्या नागरी बँक ही शहरी भागातील सर्वसामान्य व मध्यमवर्गीय लोकांची अर्थवाहिनी आहे.

सहकारी बँकिंग क्षेत्रामध्ये मुख्यत्वे नागरी सहकारी बँका, राज्य सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती बँका व प्राथमिक कृषी संस्था या कार्यरत आहेत. भारतामधील एकूण बँकिंग व्यापारी, खासगी, लघुवित्त, प्रादेशिक ग्रामीण व सहकारी इ. विविध बँकांचे प्रकार आहेत. दिनांक ३१.०३.२०२३ अखेर भारतामध्ये सर्व प्रकारच्या बँकांची एकूण संख्या २०२७ असून त्यापैकी १५०२ नागरी बँका, ३४ राज्य बँका व ३५१ जिल्हा मध्यवर्ती बँका आहेत. एकूण सर्व बँकांमध्ये सहकारी बँकांची संख्या ९३% असून एकूण बँकिंग व्यवसायांमध्ये सर्व सहकारी बँकांचा हिस्सा जेमतेम ८% आहे. एकूण देशपातळीवरील बँकिंग व्यवसायामधील संख्येच्या मानाने असणारा हिस्सा हा खूपच कमी आहे. कोणत्याही क्षेत्रावर नियंत्रण करताना जे काही धोरणात्मक निर्णय घेतले जातात, त्यावेळी त्या क्षेत्रातील एकूण व्यवसायावर त्याचा किती प्रमाणात होऊ शकतो याचा विचार करूनच नियंत्रक त्यांची नियंत्रण दिशा ठरवतात. सन २०२० मध्ये बँकिंग नियमन कायदा बदलताना केंद्र सरकार व रिझर्व्ह बँकेने या बाबींचा प्रामुख्याने विचार केल्याचे आपल्याला दिसून येईल.

दिनांक १ मार्च १९६६ पासून सहकारी बँकांचा खऱ्या अर्थाने उदय झाला. या बँकांवर रिझर्व बँक ऑफ इंडिया व संबंधित राज्य किंवा बहुराज्यीय बँकेचे बाबतीत केंद्र शासन यांचे दुहेरी नियंत्रण आजही आहे. पी.एम.सी. बँकेच्या घटनेनंतर रिझर्व बँकेला दुहेरी नियंत्रण मर्यादा जाणवल्याने जून २०२० मध्ये बँकिंग नियमन कायद्यामध्ये मोठे बदल करण्यात आले. पूर्वी सर्व सहकारी बँकांचे जे प्रशासकीय नियंत्रण सहकार खात्याकडे त्यातील बराचसा भाग रिझर्व बँकने स्वतःच्या अखत्यारीत आणला आहे. रिझर्व्ह बँक सध्या तंत्रज्ञानाचा वापर करून सूक्ष्म पद्धतीने दैनंदिन पातळीवर जे नियंत्रण करीत असल्याने ही बाब सध्या जरी सहकारी बँकांना अडचणीची वाटत असली तरी याला कोणताच पर्याय नसल्याने सहकारी बँकांनी स्वतःमध्ये बदल करून ते सकारात्मकरीत्या स्वीकारणे अपरिहार्य आहे.

सहकारी बँकांची सभासद किंवा ठेवीदारांना माहिती देण्याची उदासीनता पाहून रिझर्व्ह बँकेने आर्थिक पत्रके प्रसिद्धी व प्रकटीकरण संदर्भात सर्वच सविस्तर परिपत्रक निर्देशित केले असून, यामध्ये अनेक आर्थिक बाबींची माहिती अहवालामध्ये प्रसिद्ध होत असल्याने आता गुंतवणूकदार यांना बँकेने कोणत्या क्षेत्रात व किती आर्थिक जोखीम घेतली आहे हे समजणार आहे. या पारदर्शकतेमुळे सुरुवातीच्या काळामध्ये सहकारी बँकांना हे सुरुवातीला थोडे जडच जाणारच असे तरी नंतर विश्वासार्हता वाढण्यास मदतच होईल. आजही सहकारी बँकांमधील ठेवीदारांना त्यांची ठेव ही ठेव विमा महामंडळाच्या विमा संरक्षण मर्यादेपर्यंतच सुरक्षित असल्याची मानसिकता आहे. ज्या दिवशी ही मानसिकता बदलेल त्या दिवशी सहकारी बँकांमधील ठेवीदारांमध्ये खऱ्या अर्थाने अधिक विश्वासार्हता निर्माण झाली असे म्हणावे लागेल.

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग असून रिझर्व बँकेच्या नियंत्रण पद्धतीबरोबरच स्पर्धेमध्ये टिकून राहणे हे देखील आज सहकारी बँकांसमोर मोठे आव्हान आहे. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात ग्राहकांच्या अपेक्षा बदलत आहेत. तंत्रज्ञानामध्ये मोठी जोखीम असून तंत्रज्ञान उभारणीसाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज आहे. तंत्रज्ञान वापर व सुरक्षेबाबतीत सहकारी बँकांमधील संचालक व कर्मचारी वर्गाने स्वतःमध्ये आमूलाग्र बदल केला पाहिजे.

आजच्या डिजिटल युगात सहकारी संस्थांनी आपण सध्या कुठे आहोत व भविष्यात आपल्याला या स्पर्धेत टिकून रहायचे असेल तर नेमके कोणते बदल आणि ते किती कालावधीत स्वीकारणे आवश्यक आहे याचे आत्मचिंतन करून त्या दृष्टीने तातडीने पावले उचलणे आवश्यक आहे. सहकारी संस्थेबरोबर 'स्पर्धेतून व्यवसाय' ही मानसिकता बदलून 'सहकार्यातून व्यवसाय' ही मानसिकता विकसित करावी लागेल. या पुढे माझ्या संस्थेचा स्पर्धक सहकारी संस्था नसून 'सहकारा अंतर्गत सहकार' ही भावना दृढ करून सर्वच स्तरांवर संघटितपणे वाटचाल केली तर भविष्यात सहकार क्षेत्र हेच अन्य क्षेत्रांसाठी मोठे स्पर्धक बनेल व सहकारी संस्थांची देखील व्यवसाय आणि ग्राहक वृद्धी कोणीही थांबवू शकणार नाही. सहकारी संस्थांनी ही मानसिकता स्वीकारली तरच भविष्यातील कोणतेही बदल सहकारी संस्था अगदी लीलया स्वीकारून खंबीरपणे उभ्या राहतील, हे मात्र नक्की!

*****

---

पान क्र. ५२ वरून

## कॅश क्रेडिट, बँकांसाठी उत्तम कर्ज व्यवहार

असलेली दुकाने प्रतिष्ठाने कारखाने, संस्था यांच्याबाबत माहिती घेता येते. त्यांना बँकेची माहिती देता येते.

कॅश क्रेडिट खातेदारांसोबत बँकेचे सौहार्दपूर्ण संबंध असले पाहिजेत. त्यांच्या तात्पुरत्या गरजा, सीजनल लिमिट्स याबाबत सहानुभूतीने विचार करून खातेदाराला गरजेनुसार कर्ज पुरवठा केला पाहिजे. खातेदार आपल्याकडेच राहील या दृष्टीने आपले कायम प्रयत्न असले पाहिजेत, कारण नागरी सहकारी बँकांतील चांगले खातेदार यांच्यावर अन्य खासगी, सरकारी आणि स्मॉल फायनान्स बँकांचा डोळा असतो. या दृष्टिकोनातून आपला खातेदार आपल्या बँकेसोबत समाधानी राहील यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. त्यासाठी भेटीगाठी चर्चा नियमित बोलणे हे आवश्यक आहे बँकेचे आपल्याकडे लक्ष आहे, एवढे खातेदाराला समजले तरीही पुरेसे असते. कॅश क्रेडिट खात्यांबाबत या खात्यांच्या उपयुक्ततेबद्दल शाखेतील प्रत्येकाला वेळोवेळी माहिती देणे आवश्यक असते. या खातेदारांना उत्तम ग्राहक सेवा दिली पाहिजे, कारण यांच्या माध्यमातून सर्वोत्तम लाभप्रदता प्राप्त होत असते. कॅश क्रेडिटखात्याकडे बँकेने नेहमी सकारात्मक पद्धतीने बघितले पाहिजे.

**– डॉ. अभय मंडलिक**
**लेखक खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक असून बँकिंग या विषयाचे अभ्यासक आहेत.**

******

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) आधारित आधुनिक बँकिंग सेवा - भविष्यातील वेध

बँकिंग व्यवहारामध्ये डिजिटल सेवेचा वापर वाढविण्यासाठी बँकिंग स्तरावर अनेक उपाययोजना करून डिजिटल बँकिंग साक्षरता वाढविण्यासाठी बँका सतत प्रयत्नशील होत्या, पण म्हणावे तसे यश मिळत नव्हते. पृथ्वीवर निसर्गाचा कोप झाला आणि कोरोना महामारीने संपूर्ण जगाला वेढले व संपूर्ण जग लाकडाऊनच्या खाईत ओढले गेले. कोरोना महामारीमुळे जगातील प्रगत आणि आधुनिक तंत्रज्ञान वापराच्या शिखरावर पोहोचलेले देश वैद्यकीय सुविधा उपलब्धीसाठी हतबल झाले. बँकिंगचे व्यवहार करण्यासाठी मर्यादा आल्या आणि जगातील अर्थव्यवस्था ठप्प झाली. घरबसल्या आर्थिक व्यवहार करण्यासाठी उपलब्ध साधनांचा शोध सुरू झाला आणि या साधनांना महत्त्व प्राप्त झाले.



श्रीकांत जाधव
९८९०५९७०९५

भारतात इंटरनेट बँकिंग सुविधांसह यूपीआय डिजिटल बँकिंगसारख्या साधनांचा वापर होता, पण मर्यादित. कोरोना नंतर डिजिटल बँकिंगच्या वापरात महत्त्वपूर्ण बदल घडले आहेत.

*** कोरोना नंतरचे डिजिटल बँकिंग –**

**१. डिजिटल बँकिंगचा वेगवान स्वीकार –** कोरोना काळात लोकांनी सार्वजनिक ठिकाणांवर जाणे कमी केले. त्यामुळे ऑनलाइन बँकिंगचा स्वीकार मोठ्या प्रमाणात वाढला. ग्राहकांनी बँक शाखांमध्ये जाण्याऐवजी मोबाइल ॲप्स आणि इंटरनेट बँकिंगद्वारे व्यवहार करणे पसंत केले. यामुळे डिजिटल बँकिंग सेवांचा वापर गतीने वाढला.

**गेल्या काही वर्षात बँकिंग क्षेत्रात झपाट्याने बदल होत असून नजिकच्या काळात आर्टिफिशियल इंटेलिजेन्सचा प्रवेश होत आहे. याविषयी भाष्य करणारा लेख...**

**२. पेमेंट आणि व्यवहारांची वाढ –** ऑनलाइन पेमेंट, UPI, आणि ई-वॉलेटसारख्या सेवांचा वापर वाढला. रोखीच्या व्यवहारांमध्ये घट होऊन ऑनलाइन व्यवहार सामान्य झाले. विशेषतः किरकोळ विक्रेत्यांपासून ते मोठ्या व्यापाऱ्यांपर्यंत सर्वांनी डिजिटल पेमेंट स्वीकारले.

**३. सुरक्षेवरील भर –** वाढत्या डिजिटल व्यवहारांमुळे सुरक्षेवर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले. फसवणूक आणि सायबर हल्ल्यांपासून संरक्षण देण्यासाठी बँकांनी जद्धा, मल्टी-फॅक्टर ऑथेंटिकेशन आणि फिशिंगविरोधी उपाययोजना लागू केल्या.

**४. चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल बँकिंग –** बँका आणि वित्तीय संस्थांनी अश्र आधारित चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल असिस्टंट्सचा वापर वाढवला. ग्राहकांना त्वरित सेवा देण्यासाठी बँकांनी २४/७ सपोर्ट सुरू केला, ज्यामुळे शाखांवर अवलंबित्व कमी झाले.

**५. ऋण प्रक्रिया डिजिटल झाल्या –** कर्ज अर्ज करण्याच्या प्रक्रिया पूर्णतः डिजिटल झाल्या. कर्ज मंजुरी, क्रेडिट स्कोअरिंग, आणि दस्तावेज पडताळणी या सर्व गोष्टी ऑनलाइन व्यवस्थापित केल्या जात आहेत. यामुळे ग्राहकांना घरातूनच कर्ज अर्ज आणि मंजुरीच्या सोयी उपलब्ध झाल्या.

**६. वित्तीय समावेशकतेत सुधारणा:** ग्रामीण आणि अल्पविकसित भागांमध्येही डिजिटल बँकिंगच्या वापराने वित्तीय समावेशकतेत सुधारणा झाली. बँकांच्या सेवा दूरदराजच्या भागांपर्यंत पोहोचवण्यासाठी मोबाइल बँकिंग ॲप्स आणि फिनटेक कंपन्यांनी मोठी भूमिका बजावली.

**७. डिजिटल सेवांच्या सुलभीकरणात वाढ –** बँकांनी ग्राहक अनुभव सुलभ करण्यासाठी नवीन तंत्रज्ञान स्वीकारले. मोबाइल ॲप्समध्ये सुधारणा करून वापरकर्त्यांना अधिक सुलभ आणि सोयीस्कर इंटरफेस प्रदान केले. बँकिंग सेवांचा वापर कमी तांत्रिक ज्ञान असलेल्या लोकांसाठी देखील सोपा झाला.

**८. डिजिटल इनोव्हेशन आणि फिनटेक कंपन्यांचे योगदान –** फिनटेक कंपन्या आणि बँकांनी एकत्र येऊन डिजिटल बँकिंग क्षेत्रात नवीन इनोव्हेशन्स आणले. पेमेंट प्लॅटफॉर्म्स, इन्स्टंट लोन, ॲप्स आणि रोबो-सल्लागार यासारख्या नवकल्पना ग्राहकांसाठी उपलब्ध केल्या गेल्या.

**९. कस्टमर सपोर्टची डिजिटल व्यवस्था –** महामारीच्या काळात ग्राहकांना त्वरित मदत आणि सपोर्ट देण्यासाठी बँकांनी डिजिटल सपोर्ट प्रणालींवर अधिक भर दिला. कॉल सेंटर्स, चॅटबॉट्स, आणि ऑनलाइन सपोर्ट सेवा जास्त सक्रीय झाल्या.

**१०. कामकाजाची स्वयंचलितता –** कोरोना काळात बँकांनी आपले अंतर्गत कामकाजदेखील अधिकाधिक स्वयंचलित केले. यामध्ये कर्ज मंजुरी, लेखापरीक्षण आणि जोखमीचे विश्लेषण यासारख्या प्रक्रियांमध्ये AI आणि ऑटोमेशनचा वापर झाला.

कोरोनानंतर डिजिटल बँकिंगचा वाढलेला वापर हे एक दीर्घकालीन परिवर्तन आहे, ज्यामुळे बँकिंग अधिक सोयीस्कर, सुरक्षित आणि तांत्रिकदृष्ट्या प्रगत बनले आहे.

*** भारतातील बँकिंग क्षेत्रात डिजिटल व्यवहारांची गरुड झेप :-**

मागील चार वर्षात भारतातील बँकिंग क्षेत्रात डिजिटल व्यवहारांची प्रचंड वाढ झाली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे कोरोना महामारी आणि त्यानंतरच्या लॉकडाऊनमुळे बँकिंग व्यवहारांमध्ये झालेला बदल. काही महत्त्वाचे बदल आणि आकडेवारी खालीलप्रमाणे आहेत :

**१. यूपीआयचा प्रसार –** UPI (Unified Payments Interface) हे डिजिटल व्यवहारांसाठी सर्वात लोकप्रिय साधन बनले आहे. २०१८ मध्ये सुमारे ९०० दशलक्ष व्यवहार झाले होते, तर २०२३ मध्ये हे व्यवहार ९००० दशलक्षांवर गेले आहेत. यामुळे यूपीआयच्या व्यवहारांच्या संख्येत जवळपास १० पट वाढ झाली आहे.फेब्रुवारी २०२१ मध्ये एकट्या यूपीआयवरून ४.२५ लाख कोटी रुपयांचे व्यवहार झाले होते.

**२. डिजिटल पेमेंट्स वाढ –** भारतात डिजिटल पेमेंट्समध्ये २०१९ पासून मोठी वाढ झाली आहे. २०२१ पर्यंत ८८ अब्ज डिजिटल व्यवहार झाले होते, ज्यात वाढून २०२३ पर्यंत वार्षिक वाढीचे प्रमाण ५१% पर्यंत पोहोचले.

**३. मोबाइल बँकिंगचा विस्तार** मोबाइल बँकिंग ॲप्सच्या वापरात मोठी वाढ झाली आहे. २०२० मध्ये मोबाईल बँकिंग व्यवहारांचे प्रमाण ७०% पर्यंत वाढले. यामुळे लोकांना बँकेत प्रत्यक्ष जात न करता घरबसल्या बँकिंग सेवा उपलब्ध झाल्या.

**४. बायोमेट्रिक आणि फसवणूक विरोधी तंत्रज्ञानाचा वापर** आधार बायोमेट्रिक प्रमाणीकरणाच्या साहाय्याने सुरक्षित व्यवहार वाढले आहेत. यामुळे फसवणूक कमी होऊन व्यवहारांची सुरक्षितता वाढली आहे.

**५. Cryptocurrency ची सुरुवात** डिजिटल चलनांचा वापर वाढला असून, भारतातही क्रिप्टोकरन्सीच्या वापरावर चर्चा सुरू आहे, जरी त्याचे तंत्रज्ञान आणि नियम निश्चित झालेले नाहीत.

भारतात डिजिटल बँकिंग व्यवहारात गेल्या चार वर्षात प्रचंड वाढ झाली आहे. सरकारच्या 'डिजिटल इंडिया' अभियानामुळे आणि UPI, आधार, आणि इतर डिजिटल सेवांच्या प्रचारामुळे बँकिंग क्षेत्रात मोठे बदल झाले आहेत. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने हे क्षेत्र अजून अधिक स्वयंचलित

आणि ग्राहककेंद्रित होण्याची शक्यता आहे.

*** आर्टिफिशियल इंटेलिजन्स बँकिंग सेवा :- भविष्यातील वेध**

**१. AI चा प्रभाव:** AI बँकिंग क्षेत्रात ग्राहकांच्या सेवा, व्यवहार प्रक्रिया आणि धोका व्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये मोठा बदल घडवत आहे. अल्गोरिदम आणि मशीन लर्निंगचा वापर करून, बँका ग्राहकांच्या गरजांवर आधारीत उत्पादने आणि सेवा देऊ शकतात. त्याचबरोबर AI वर आधारित निर्णय घेणारे सिस्टम्स बँकेला जोखमींचे अधिक प्रभावीपणे विश्लेषण करण्यास सक्षम बनवतात.

**२. चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल असिस्टंट्स –** AI वर आधारित चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल असिस्टंट्स ग्राहकांच्या प्रश्नांना त्वरित उत्तर देतात. ही सेवा २४/७ उपलब्ध असल्यामुळे ग्राहकांचे समाधान वाढते. चॅटबॉट्स तांत्रिक माहिती देऊन फक्त संवाद साधत नाहीत, तर कर्ज अर्जाचे स्थिती तपासणे, खाते बदलणे किंवा कार्ड ब्लॉक करणे यांसारख्या कामांसाठीही उपयुक्त ठरतात.

**३. डेटा विश्लेषण आणि ग्राहकांचा व्यवहार –** AI ग्राहकांच्या बँकिंग व्यवहारांचा अभ्यास करून त्यांच्या गरजा ओळखू शकतो. व्यवहाराच्या पद्धतींवरून, कोणत्या ग्राहकांना कोणत्या प्रकारच्या सेवांची गरज आहे, हे बँक AI च्या सहाय्याने जाणू शकते. यामुळे वैयक्तिकृत सेवा आणि उत्पादने सादर करता येतात.

**४. धोका व्यवस्थापन –** फसवणूक ओळखण्यासाठी AI चा उपयोग फार महत्त्वाचा आहे. AI आधारित अल्गोरिदम फसवणूक करणाऱ्या संशयास्पद व्यवहारांचा वेगाने शोध घेऊन त्यावर कारवाई करू शकतात. बँकांना शक्य फसवणुकीपासून संरक्षण मिळविण्यासाठी AI चा मोठ्या प्रमाणावर वापर होतो आहे.

**५. क्रेडिट स्कोअरिंग आणि लोन अप्रूव्हल्स –** कर्ज मंजुरीसाठी पारंपरिक पद्धतींना वेळ लागत असे. मात्र, AI वेगवेगळ्या डेटा पॉइंट्सचा अभ्यास करून क्रेडिट स्कोअरिंग करताना अधिक अचूक अंदाज देतो. यामुळे कर्ज अर्ज जलद प्रक्रियेत येऊन ग्राहकांना जलद सेवा मिळू शकते.

**६. स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट्स आणि ब्लॉकचेन –** AI च्या मदतीने स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट्सची अंमलबजावणी केली जाते, ज्यामुळे आर्थिक व्यवहार अधिक पारदर्शक आणि सुरक्षित होतात. स्मार्ट कॉन्ट्रॅक्ट्स हे स्वयंचलित आहेत आणि ते ठराविक अटी पूर्ण झाल्यावर व्यवहार पूर्ण करतात.

**७. वैयक्तिकृत सेवा –** AI च्या साहाय्याने बँका वैयक्तीकृत सल्लागार सेवा देऊ शकतात. उदाहरणार्थ, एका ग्राहकाच्या खर्चाच्या पद्धतीचा अभ्यास करून त्याला अधिक चांगल्या गुंतवणूक योजना सुचवल्या जाऊ शकतात. यामुळे ग्राहकांचे समाधान आणि विश्वास वाढतो.

AI च्या सहाय्याने बँकेच्या अंतर्गत ऑपरेशनल प्रक्रियांमध्ये स्वयंचलितता येते, ज्यामुळे कर्मचाऱ्यांचा वेळ वाचतो आणि मानवी त्रुटी कमी होतात. यामुळे खर्चही कमी होतो आणि कार्यक्षमता वाढते.

**९. कस्टमर ॲनालिटिक्स –** AI चा उपयोग करून बँका ग्राहकांच्या वर्तनाचे आणि खर्चाचे विश्लेषण करू शकतात. यामुळे बँकांना नवीन उत्पादने विकसित करणे आणि त्यांना ग्राहकांच्या गरजेनुसार सादर करणे शक्य होते.

**१०. नवीन नियामक फ्रेमवर्क –** AI चा वाढता वापर लक्षात घेता बँकिंग क्षेत्रातील नियामक धोरणे अद्ययावत करावी लागतील. डेटा सुरक्षा, गोपनीयता, आणि नैतिकता यावर आधारित नवीन नियम विकसित होऊ शकतात, जे AI वापराच्या मर्यादा आणि जबाबदारी निश्चित करतील.

**११. फिनटेक आणि AI चे एकत्रीकरण –** फिनटेक कंपन्या आणि बँका AI चा वापर करून बँकिंग सेवांचे डिजिटलीकरण आणि सुलभीकरण करतात. या एकत्रीकरणामुळे तंत्रज्ञानावर आधारित नवीन सेवा आणि उत्पादने निर्माण होतात, जसे की वेगवान व्यवहार, स्वयंचलित लोन प्रक्रिया आणि स्मार्ट पेमेंट सिस्टिम्स.



**१२. स्वयंचलित गुंतवणूक सल्ला** (Robo Advisors) **–** AI आधारित रोबो- सल्लागार (Robo-Advisors) गुंतवणूकदारांना सल्ला देण्याचे काम करतात. हे सल्लागार बाजारातील ट्रेंडचा अभ्यास करून गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम पर्याय सुचवतात. यामुळे आर्थिक नियोजन अधिक सुलभ आणि कमी खर्चिक होते.

**१३. AI मध्ये नैतिकता आणि गोपनीयता –** AI चा वापर करताना बँकांनी डेटा गोपनीयतेचे आणि नैतिकतेचे नियम पाळणे आवश्यक आहे. AI ग्राहकांच्या डेटाचा वापर करून अनेक प्रक्रिया पूर्ण करत असल्यामुळे, यातील कोणताही गैरवापर होऊ नये, याची काळजी घ्यावी लागते.

**१४. पैसे वसुलीची प्रक्रिया –** AI कर्जदारांच्या वर्तणुकीचे विश्लेषण करून पैशांची वसुली करणे सुलभ करते. AI च्या मदतीने बँकांना कोणत्या कर्जदारांकडून कर्ज वसूल होण्याची शक्यता आहे हे ओळखता येते आणि त्यानुसार कारवाई करता येते.

**१५. AI वर आधारित क्रेडिट कार्ड धोरण:** AI ग्राहकांच्या खर्चाच्या सवयींवर आधारित क्रेडिट कार्ड योजना सुचवते. क्रेडिट कार्ड ऑफर आणि बक्षिसे ग्राहकांच्या गरजेनुसार सानुकूलित केल्या जातात, ज्यामुळे ग्राहकांचे समाधान आणि वापर वाढतो.

**१६. AI आधारित बाजारातील स्पर्धा –** बँका AI चा वापर करून बाजारातील स्पर्धेत टिकून राहण्यासाठी नाविन्यपूर्ण उत्पादने आणि सेवा सादर करू शकतात. ग्राहकांसाठी अत्याधुनिक सुविधांची आणि सेवांची निर्मिती केल्यामुळे ग्राहक आकर्षित होतात.

**१७. बँकिंग इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये बदल –** AI च्या वापरामुळे पारंपरिक बँकिंग प्रणालींमध्ये बदल होणे आवश्यक आहे. जुन्या पद्धतींना सोडून अधिक वेगवान, डिजिटल आणि सुरक्षित पद्धतींचा वापर केला जात आहे.

**१८. वित्तीय समावेशकता** (Financial Inclusion) **–** ग्रामीण आणि अल्पविकसित भागांमध्ये AI च्या सहाय्याने वित्तीय सेवांचा विस्तार होऊ शकतो. उदाहरणार्थ, AI वर आधारित मोबाइल बँकिंग ॲप्समुळे ग्राहकांना वित्तीय सेवा सहज उपलब्ध होतात.

**१९. AI वर आधारित वित्तीय साक्षरता –** बँका AI आधारित साधने आणि ॲप्स विकसित करून ग्राहकांना वित्तीय साक्षरता वाढवण्यास मदत करू शकतात. AI च्या सहाय्याने ग्राहकांना गुंतवणूक, कर्ज, आणि बचत याबद्दल अधिक माहिती दिली जाऊ शकते.

**२०. AI ची सतत सुधारणा आणि भविष्यकालीन अनुकूलता –** AI तंत्रज्ञान सतत प्रगती करत असल्यामुळे बँकिंग क्षेत्रातील प्रणालींनाही त्यानुसार सुधारावे लागेल. नवीन AI मॉडेल्स आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने बँकिंग प्रणाली अधिक कार्यक्षम आणि अनुकूल बनवता येईल.

AI च्या वाढत्या वापरामुळे बँकिंग क्षेत्रात होणाऱ्या बदलांवर आणि त्यांच्या संभाव्य परिणामांवर विस्तृत दृष्टिकोन प्रदान करतील.

**– लेखक : श्रीकांत जाधव**
**महेश सहकारी बँक लि. पुणे (वसुली व विधी विभाग)**
**मो. नं. ९८९०५९७०९५**
**सह लेखक – AI *****

# डिजिटल भारत

डिजिटल लॉजिस्टिक, डिजिटल सही, डिजिटल आर्थिक व्यवहार, डिजिटल जीवन प्रमाणपत्र, डिजिटल माहिती, डिजिटल संवाद, डिजिटल करन्सी आणि डिजिटल माणूसपण आला. लेखन, वाचन, गायन, कलाकुसर, चित्रकला असे संपूर्ण कलाक्षेत्रदेखील डिजिटल पद्धतीने सोपे सहज आणि कमी वेळात होणारे झालेले आहे. इलेक्ट्रॉनिक आणि दूरसंचार टेलिफोन या दोन क्षेत्रांत क्रांती झाली आणि ते ज्ञान भांडार खुले झाल्याने सर्वत्र आतपर्यंत पोचले. भारतीय संगणक संख्या, वापर आणि वैविध्याने भरून जाऊन उतू जायला लागले. सेवाक्षेत्र विस्तारले, बरोबर औद्योगिक क्षेत्रही वाढले. १२० कोटी लोकांना दोन वेळा लस देण्याची प्रक्रिया जगभरातील प्रगत देशांपेक्षा प्रभावीपणे झाली. अनेक देशांना मोफत लस देऊ केली आणि कायमस्वरूपी आपल्याशी बांधून घेतले. यालाच क्षणोक्षणी डिजिटल वापर या ना त्या स्वरूपात केला जातो. यालाच डिजिटल क्रांती म्हणतात आणि ती अशीच जोर धरून विस्तारित आहे.



वंदना धर्माधिकारी
९८९०६ २३९१५

डिजिटल बँकिंग हा तर जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. सहकारी बँकांनी तंत्रज्ञानावर आधारित नवीन सुविधांचा वापर मोठ्या प्रमाणात करीत आहेत. त्याने बँकांचा विस्तार होताना दिसतो. दर्जा उंचावला, वातावरणात बदल झाला, एकूणच बँक व्यवसाय सुधारला, असे सकारात्मक बदल बँकिंगमध्ये स्पष्ट रुजलेले जाणवते. सर्व प्रकारच्या बँकाकडे डिजिटल बँकिंग सुविधा उपलब्ध आहे. आर्थिक विभाग संपूर्णत: टेक्नोलॉजीधिष्ठित झाला आहे. डिजिटल देवाणघेवाण मग ती कशाचीही असो हे पदोपदी जाणवते आणि वाकुल्या दाखवते, तुला अजून येत नाही का डिजिटल हे करता, ते तरी येते का? अगदी खरं. कंपन्या कशा बंद पडल्या. ज्यांनी नवीन तंत्रज्ञान वापरले नाही, तसेच या गोष्टींचा वापर न केल्यास तुम्ही आम्ही मागे पडणार. कोणी विचारणार नाही. तेव्हा मंडळी गतिमान स्पर्धेत टिकून राहायचे असेल तर नवसंकल्पना समजून अंगीकारल्याच पाहिजेत.

इलेक्ट्रॉनिक बँकिंग म्हणजे ई बँकिंग होय. त्याने अनेकविध प्रकार आणि नावेदेखील आहेत. ते असे - नेट बँकिंग, इंटरनेट बँकिंग, डिजिटल बँकिंग, मोबाईल बँकिंग, ऑनलाईन बँकिंग, अनेकविध ॲप्स जसे की पेटीएम, गुगल पे इत्यादी. यापैकी काहीही वापरून व्यवहार करताना काळजी घ्यावी लागते, नीट लक्ष देणे महत्त्वाचे असते. ऑनलाईन बँकिंगची मागणी बँकेकडे करावी लागते. आधार कार्ड, मोबाईल फोन ज्या खात्याशी जोडलेले आहेत, अशाच खात्याला या सोयी मिळू शकतात, अन्यथा नाही. बँकेच्या नियमानुसार अर्ज देऊन पुढील प्रक्रियेत इंटरनेट बँकिंग जोडणी मिळू शकते. थोडेसे किंचित कष्ट घेऊन नेट बँकिंग शिकून घेतले, की वाटेल तुम्हाला हे मी आधी का नाही शिकलो. वेळ यावी लागते म्हणायचे आणि ऑनलाईन व्यवहार करायचे.

स्मार्ट बँकिंग कार्यप्रणालीमुळे आपल्या व्यावसायिकतेवर तसेच व्यक्तिगत आयुष्यातही मोठे बदल झाले आहेत. सर्वांच्याच आयुष्यात नवीन तंत्रज्ञानाने कमाल केली आणि माणूस बदलत गेला. तिथे बँक ग्राहक येतातच. बँकिंग स्मार्ट झाले, लोकांकडे पैसा येऊ लागला, आणि त्यांनाही बँकांनी स्मार्ट वागणूक देऊ केली. २००० साली टेक्नोलॉजीने आधीच्या अनेकविध गोष्टी, प्रथा यांना कलाटणी दिली आणि भारतात बदलाची चक्रे जोरात फिरू लागली. एका ग्राहकाला केंद्रस्थानी ठेवून कस्टमाईज सेवा देणे शक्य झाले. प्रत्येक सेक्टर तंत्रज्ञानाधिष्ठित झाल्याने यंत्राची गती मिळाली आणि अर्थव्यवस्था चक्र जोरात फिरू लागले. यामध्ये सर्व बँकांचा वाटा अतिशय मोलाचा आहे.

देशभरात मोठे कारखाने, व्यावसायिक, मॉल्स ते अगदी कोपऱ्यावर भाजी, भेळ, फुले विकणारे खेडूत अडाणी, न शिकलेले असे विक्रेते आज खुशीत अनेकविध प्रकारे यूपीआय ॲप्स वापरतात. इतर देशांना ही कार्यप्रणाली भारताकडून पाहिजे. यामध्ये केवळ व्यवहार सुलभता, सहजता नाही तर बचत, पारदर्शकता, आर्थिक उन्नती, कमी जोखीम असा बहुरंगी फायदा असल्याने दुनिया मजे में ई-बँकिंग स्वीकार करती है। यापाठोपाठ जगभरातील अनेक देशांना आंतरराष्ट्रीय व्यवहारात सहजता देण्यासही जणूकाही नव्याने एनपीसीआय इंटरनॅशनल कंपनी सुरू केली आहे. म्हणजे जे व्यवहार आपण आपल्या देशात करू शकतो. ते जगातील देश एकमेकांमध्ये असेच अल्पशा वेळात करू लागतील. नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया देशभरातील बँकांच्या आपापसातील सर्व व्यवहारांची पूर्तता करणारी संस्था आहे. सेटलमेंट ऑफ पेमेंट करणे ही महत्त्वाची जबाबदारी एनपीसीआयकडे आहे.

इंटरनेट वापरामध्ये, डिजिटल जीवन यामध्ये जगात भारताचा नंबर दुसरा आहे. पहिला चीन आहे. भारतात २०१४ साली इंटरनेटचा प्रसार १४% होता, तोच २०२४ मध्ये ५२% पर्यंत वाढला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात जलद गतीने टेक्नॉलॉजी वापर वाढला आहे. प्रत्येक सेक्टरमध्ये इंटरनेट शिवाय पान हलत नाही. म्हणजेच इंटरनेटवरील अवलंबित्व वाढले आहे. याचा अर्थ असा की त्याशिवाय काम थांबते. प्रचंड सक्षम अशी ही मोठी डिजिटल क्रांती झालेली आहे. भारत यामध्ये अग्रगण्य देश आहे. देशात सार्वजनिक ठिकाणीदेखील इंटरनेटची सुविधा उपलब्धता दिसते. उदा. रेल्वे स्टेशन, हॉटेल्स इथे वाय-फाय (Wi-Fi) सुविधा असते.

भारतीय डिजिटल कॅशलेस अर्थव्यवस्थेला भक्कम करण्यामध्ये प्रत्येक नागरिकांचा खारीचा का होईना वाटा आहे. तसे इ-बँकिंग जीवनाचा एक अविभाज्य घटक बनत आहे. कॅशलेश व्यवस्था बळकटी देते ती पुढील गोष्टींवरून लक्षात येईल. काही महत्त्वाचे मुद्दे इथे घेतलेले आहेत. इतर अनेक आहेत, ते सर्वांनाच जाणवतात.

(१) अर्थव्यवस्थेला इथे चालना दिली जाते. दोनपाच रुपयांचा व्यवहारदेखील बँकिंगच्या माध्यमातून आर्थिक चक्रातून फिरून येतो. त्याची नोंद घेतली जाते. त्याने नोटा छापणे खर्च कमी झाला, तसेच नाणी टांकसाळणे कमी झाले.

(२) देशविघातक कारवाया, देशाचे समाजाचे नुकसान करणाऱ्या दहशतवादी संघटना यांना बेहिशोबी काळा पैसा लागतो, त्याचा पुरवठा करणे अशांना अवघड होऊन बसले. आपोआप घटनांना आळा बसला, त्या कमी झाल्या आहेत.

(३) कागदाचा वापर मोठ्या प्रमाणात कमी झाल्याने वृक्ष तोड कमी झाली. वातावरणात फरक झाला. निसर्गाचा तोल सांभाळला जातो आणि पर्यावरण रक्षण होते.

पान क्र. ५७ वर

## जनता सहकारी बँकेने राखले एनपीएचे प्रमाण शून्य टक्के

**गोंदिया –** येथील जनता सहकारी बँकेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात एनपीएचे प्रमाण शून्य टक्के राखण्यात यश मिळविले आहे, अशी माहिती बँक अध्यक्ष सीए दिनेश दादरीवाल यांनी सांगितली. बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. उपाध्यक्ष राजकुमार तिवारी आणि अन्य संचालक, अधिकारी यावेळी उपस्थित होते. लेखापाल नारायण शर्मा यांनी विषय पत्राचे वचन आणि ताळेबंद सादर केला. तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश जोशी यांनी सूत्र संचालम आणि संचालक धीरज अग्रवाल यांनी आभार मानले.

## विदर्भ महिला क्रेडिट को-ऑप. सोसायटीला २२ लाख नफा

चंद्रपूर, वरोरा – विदर्भ महिला क्रेडिट को-ऑप. सोसायटीने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात निव्वळ नफा २२ लाख रुपये मिळविला असून सदस्यांना १० टक्के लाभांश जाहीर केला आहे. संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये वरील माहिती सांगण्यात आली. संस्था अध्यक्ष निर्मला मेघाटे अध्यक्षस्थानी होत्या. जिल्हा विकास अधिकारी बी. सी. फलके उपस्थित होत्या. संचालिका पुष्पा गोटे यांनी संस्थेच्या वाटचालीचा आलेख्रा मांडला. दहावी आणि बारावी परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता नक्षिणे यांनी सभेसमोरील विषयाची मांडणी केली. संस्थेच्या ठेवी १७ कोटी असून कर्ज वाटप १२ कोटीचे करण्यात आले आहे. सभेला संचालक, अधिकारी, कर्मचारी, सदस्य उपस्थित होते.

## चिंतामणी ग्रामीण सहकारी पतसंस्थेच्या वार्षिक सभेत विविध विषयांवर चर्चा

**वर्धा –** येथील चिंतामणी ग्रामीण सहकारी पतसंस्थेची वार्षिक सभा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात संस्थेचे संस्थापक सुरेश खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली  झाली.

संस्थेचे अध्यक्ष मंगेश खेडकर, उपाध्यक्ष अशोकराव बोरसरे आणि संचालक सभेला उपस्थित होते. संस्थेच्या प्रगतीवर आणि भविष्यकालीन योजनांवर सभेत साधकबाधक चर्चा झाली. महिला बचत गटांना होत असलेल्या कर्ज वाटप योजनेवर आणि नव्याने सुरु करावयाच्या सोने तारण कर्ज वाटप योजनेवर चर्चा करून भविष्यकालीन नियोजन करण्यासंबंधी सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला.

ठेव प्रतिनिधी महेंद्र महाजन यांनी आभार मानले. सभेच्या यशस्वितेसाठी चिंतामणी ग्रामीण पतसंस्थेचे कर्मचारी तसेच एजंट सुभाष खेडकर, रोशन ढाले, सुनील मोहिजे, अरुण भावरकर, नीरज संचरिया, महेंद्र महाजन, विलास बोबडे, विवेक नागपुरे, भूषण दुर्गे यांनी सहकार्य केले.

## आदिती अर्बनचा ८ टक्के लाभांश जाहीर

**बुलढाणा –** येथील आदिती अर्बनची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये सदस्यांना ८ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष सुरेश देवकर अध्यक्षस्थानी होते.

राज्याच्या विविध जिल्ह्यांत संस्था सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, अशी माहिती त्यांनी सांगितली. यावेळी संस्था पदाधिकारी, संचालक, अधिकारी सदस्य उपस्थित होते. विभागीय व्यवस्थापक राजू वैद्य यांनी सूत्र संचालन केले.

पान क्र. ५६ वरून

## डिजिटल भारत

(४) लाच देणे घेणे कमी झाले. रोखीने ती देता येत नाही, खात्यात जमा केली तरी त्याला मर्यादांचे बंधन आहे. इथे कॅश व्यवहार करून लाच घेणे, पैसा खाणे, वाईट कृत्यांसाठी पाठबळ देणे हे धंदे ठप्प व्हायला लागले. तरीही नव्या नव्या मार्गाने होतातच अशा गोष्टी.

(५) आता नोटा नाणी वापरायचीच नाहीत, तर नोटा हव्यातच कशाला. त्यातूनही खोट्या नोटा लागेनासे झाले. चलनातून त्या काढल्या गेल्या, आणि नव्याने फारशा आधीच्या प्रमाणात खूपच कमी झाल्या. ही देशाची एक संरक्षक भिंत असते. ती कायम अभेद्य असायला हवी.

हे व इतर काही मुद्दे बघितले की जाणवते, देशाला समृद्धीची वाट सापडली, त्यावरुन जाताना एकेक दगड बाजूला करुन पुढे मार्गक्रमणा अंगीकारली गेली आहे. जसजसे डिजिटलीकरण वाढत आहे, तसे इ-बँकिंग जीवनाचा एक अविभाज्य घटक बनत आहे. मोबाईल आणि व्हॉट्सॲपशिवाय किती वेळ आपण मोकळे राहू शकतो? विचारा स्वत:लाच. तसेच हे डिजिटल डिजिटल सारे काही आपणास स्वीकारावे लागणार आहे.

डिजिटल बँकिंग, डिजिटल अर्थव्यवस्था आणि डिजिटल भारत प्रगत देश असे आपण अभिमानाने म्हणू शकतो. तेव्हा जागतिक स्पर्धेत आपला पाचवा असलेला नंबर याच गतीने प्रगती करताना लवकरच तिसऱ्या नंबरवर येत आहे. हे विशेष उल्लेखनीय कौतुकास्पद आहे. याचे श्रेय तमाम भारतीयांना जाते. जयहिंद!!

– वंदना धर्माधिकारी मो.– ९८९०६२२९१५

Email: Vandana10dyahoo.co.in

*****



# चुकीच्या बाबींना महिला संचालकानी विरोध करावा - विद्याधर अनास्कर



**पुणे –** सहकारी बँक हिताच्या दृष्टीने काही चुकीच्या बाबी होत असतील तर बँकेच्या महिला संचालकांनी त्यास विरोध करण्याची गरज आहे. नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राला हे वरदान ठरणार आहे, असे मत राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केले आहे.

पुणे जिल्हा नागरी बँक असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. अमनोरा येस फाउंडेशनच्या वतीने प्रदान करण्यात येणारा स्व. मीरा देशपांडे पुरस्कार प्रदान प्रसंगी ते बोलत होते. असोसिएशन अध्यक्ष सुभाष मोहिते, उपाध्यक्ष साहेबराव टकले, पुणे मर्चंट्स को-ऑप. बँक अध्यक्ष विजय ढेरे, तसेच नीलेश ढमढेरे, प्रा. अनिल कारंजकर अनिरुद्ध देशपांडे यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमात महेश सहकारी बँकेच्या संचालिका संगीता मणीयार, राजर्षि शाहू सहकारी बँकेच्या मंगल जाधव, श्री गजानन लोकसेवा सहकारी बँकेच्या अनुराधा गोरखे आणि संत सोपानकाका सहकारी बँकेच्या राजवर्धिनी जगताप यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## राज्य सहकारी बँकेची निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन योजना

**पुणे –** महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या वतीने निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन योजना जाहीर केली असून सलग दहाव्या वर्षी १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेला ६१५ कोटींचा निव्वळ नफा झाला आहे, अशी माहिती बँक प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी सांगितली. बँकेची ११३वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यावेळी त्यांनी ही माहिती सांगितली.

देशभरात प्रथमच राज्य सहकारी बँकेने कर्मचारी वर्गासाठी पेन्शन योजना सादर केली आहे, असे नमूद करून ते म्हणाले, दरमहा दहा हजार रुपये पेन्शन देण्यात येणार आहे. सध्या एकूण ५०७ कर्मचारी असून त्यांना या योजनेचा लाभ होणार आहे. यासाठी आवश्यक असणारी गुंतवणूक बँकेने केली आहे. योजनेचे कर्मचारी वर्गाकडून स्वागत करण्यात आले आहे.

बँकेचा स्वनिधी सहा हजार ५३० कोटी झाला असून भांडवल पर्याप्तता प्रमाण ८१.५० टक्के आहे. तसेच बँक ठेवींमध्ये ४,९६९ कोटींनी वाढ झाली आहे. वर्षाअखेरीस ठेवी २३ हजार ५८३ कोटी इतक्या आहेत. गेली १२ वर्षे लेखा परिक्षणात 'अ' वर्ग प्राप्त झाला आहे, असे त्यांनी सांगितले.

## बाणेर नागरी सहकारी पतसंस्थेचा २६ वा वर्धापनदिन साजरा

**पुणे –** बाणेर नागरी सहकारी पतसंस्थेचा २६ वा वर्धापन दिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान यावेळी करण्यात आला. शिवसेना उबाठा गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे उपस्थित होत्या.

कार्यक्रमात मानसिक आरोग्य आणि ध्यानसाधना पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. डॉ. दिलीप मुरकुटे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या वाटचालीची माहिती आणि कार्याचा आढावा घेतला.

## कल्पवृक्ष सहकारी पतसंस्थेचा लाभांश जाहीर

**पुणे –** कल्पवृक्ष सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. यावेळी सदस्यांना १३ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. अध्यक्ष नानासाहेब सूर्यवंशी अध्यक्षस्थानी होते. संस्थेचे वसूल भाग भांडवल २ कोटी ८७ लाख असून स्वनिधी ९ कोटी ४१ लाख रुपये आहे. तसेच ठेवी २४ कोटी ४० लाख आहेत. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात यशस्वी कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. प्रदीप भापकर यांनी प्रास्ताविक आणि रमेश निवंगुणे यांनी सूत्रसंचालन केले.

## नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँकेचे कॉसमॉस बँकेत विलीनीकरण करण्यास मान्यता

**पुणे –** बंगलोर येथील नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँकेचे येथील कॉसमॉस सहकारी बँकेत विलीनीकरण करण्यास बँकेच्या सदस्यांनी बहुमताने मंजूरी दिली आहे, अशी माहिती बँक अध्यक्ष मिलिंद काळे यांनी सांगितली.

नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या एकूण १३ शाखा असून त्यांचा एकूण व्यवसाय हा १३९३ कोटी आहे अशी माहिती अध्यक्ष काळे यांनी सांगितली. ते म्हणाले, कॉसमॉस बँकेने १८ लहान मध्यम आणि मोठ्या सहकारी बँकांचे विलीनीकरण करून घेतले आहे.

नॅशनल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या विलीनीकरणास आरबीआयने मंजूरी दिल्यास कॉसमॉस बँकेचा कर्नाटक राज्यात विस्तार होण्यास मदत होणार आहे.

## कॉसमॉस बँकेच्या पुणे जिल्ह्यात नवीन दोन शाखा कार्यरत

**पुणे –** येथील कॉसमॉस सहकारी बँकेच्या पुणे जिल्ह्यातील मांजरी आणि ताथवडे या ठिकाणी नवीन शाखा सुरू करण्यात आल्या आहेत. यामुळे बँकेच्या शाखाची संख्या एकूण ४५ झाली आहे. बँक अध्यक्ष मिलिंद काळे यांच्या हस्ते शाखा उद्घाटन करण्यात आले.

बँकेने नव्याने कॉस्मो उत्सव ठेव योजना सुरू केली आहे. योजनेस ग्राहकांचा भरघोस प्रतिसाद मिळतो आहे. योजनेसाठी आकर्षक व्याज दर देण्यात येणार आहे. उपाध्यक्ष यशवंत कासार आणि संचालक अधिकारी उपस्थित होते.

## पुणे पीपल्स बँकेचा १२.५० टक्के लाभांश जाहीर

**पुणे –** पुणे पीपल्स को-ऑप. बँकेने अहवाल वर्षासाठी १२.५० टक्के लाभांश सदस्यांसाठी जाहीर केला आहे. त्याचप्रमाणे आगामी आर्थिक वर्षात बँक एकूण व्यवसायाचा तीन हजार कोटींचा व्यवसायाचा टप्पा पूर्ण करेल अशी माहिती बँक अध्यक्ष जनार्दन रणदिवे यांनी सांगितली. बँकेची वार्षिक सभा नुकतीच झाली. त्यामध्ये वरील माहिती सांगण्यात आली.

ते म्हणाले, ठेवी १४७१ कोटी रुपये झाल्या असून कर्ज वाटप ९०८ कोटी इतके आहे. एकूण व्यवसाय २३७८ कोटी इतका झाला असून एनपीए शून्य टक्के ठेवण्यात बँकेला यश मिळाले आहे.

तसेच बँकेला निव्वळ नफा १६.२० कोटी इतका झाला आहे तर सीडी रेशो ६१.७० टक्के आहे. ज्येष्ठ संचालक सुभाष मोहिते यांनी मार्गदर्शन केले तर बँक मुख्य कार्यकारी अधिकारी संजय भोंडवे यांनी सूत्र संचालन केले.

# देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाटचालीत सहकारी बँकांची भूमिका महत्त्वाची - मराठे



**लासलगाव -** देशाची अर्थव्यवस्था नजिकच्या काळात जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होईल आणि यामध्ये सहकारी बँकांची भूमिका महत्त्वाची असणार आहे. म्हणून सहकारी बँकांनी सूक्ष्म वित्त आणि कृषी कर्जावर भर देण्याची गरज आहे, असे मत आरबीआय संचालक सतीश मराठे यांनी सांगितले.

येथील लोकनेते दत्ताजी पाटील सहकारी बँकेला त्यांनी नुकतीच भेट दिली, त्यावेळी ते बोलत होते. राज्य अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स फेडरेशन अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, सहकार भारतीच्या तत्कालीन प्रदेशाध्यक्ष डॉ. शशिताई अहिरे आदी उपस्थित होते. बँक अध्यक्ष नानासाहेब पाटील, तसेच बँक संचालक, अधिकारी उपस्थित होते. सरव्यवस्थापक शंतनु पाटील यांनी बँकेच्या आर्थिक स्थितीची माहिती सांगितली.

## जळगाव जनता सहकारी बँकेला पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचा पुरस्कार



**पुणे -** आर्थिक वर्षात बँकेने चांगली कामगिरी करत एनपीएचे प्रमाण शून्य टक्के ठेवण्यात यश मिळवल्याबद्दल पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशनच्या वतीने येथे आयोजित कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

बँकेच्या वतीने संचालक जयंतीलाल सुराणा, उपमहाव्यवस्थापक पंकज पाटील, अधिकारी दिनेश मडके, वैदेही देशपांडे यांनी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ सहकार आयुक्त व निबंधक दिपक तावरे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया संचालक सतीश मराठे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, आयुक्त अनिल कवडे यांच्या हस्ते स्वीकारला.

## कल्लाप्पाण्णा आवाडे जनता सहकारी बँक सर्वोत्कृष्ट बँक पुरस्काराने सन्मानित

पुणे - महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स फेडरेशनने आयोजित केलेल्या पुरस्कार सोहळ्यामध्ये रू. २५०० कोटी ते रू. ५००० कोटींपर्यंत ठेवी असणाऱ्या सहकारी बँकांमध्ये कल्लाप्पाण्णा आवाडे जनता सहकारी बँकेस सर्वोत्कृष्ट बँक म्हणून तृतीय क्रमांकाने सन्मानित करण्यात आले. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते बँकेचे अध्यक्ष स्वप्निल आवाडे व बँकेचे सर्व संचालक यांनी पुरस्कार स्वीकारला.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक सतीश मराठे, सहकार आयुक्त व निबंधक दीपक तावरे, फेडरेशनचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, उपाध्यक्षा वैशाली आवाडे, कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे, सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांच्यासह बँकेचे संचालक बाबुराव पाटील, महेश सातपुते, बंडोपंत लाड, सुभाष जाधव, शैलेश गोरे, राजू चव्हाण, सचिन देवरुखकर, सचिन केस्ती बँकेचे सीईओ संजय शिरगावे उपस्थित होते.

## सहकारातून समृद्धी साकारण्याचा प्रयत्न -दिलीप संघानी

**पुणे -** सहकार क्षेत्रातून रोजगार निर्मितीबरोबर समृद्धी साकारण्याचा प्रयत्न आगामी काळात करण्यात येणार असल्याचे मत भारतीय सहकारी संघ आणि इफ्कोचे अध्यक्ष दिलीप संघानी यांनी व्यक्त केले आहे. राज्यस्तरीय मार्केटिंग सहकारी संस्था प्रतिनिधींच्या कार्यशाळेचे उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

ग्रामीण कारागीर सहकारी संस्था अध्यक्ष सुभाष पाटील, राज्य सहकारी संघ उपाध्यक्ष हिरामण सातकर, राज्य मार्केटिंग सहकारी संस्था फेडरेशन अध्यक्ष दत्ता पानसरे, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण आयुक्त अनिल कवडे, वैकुंठ भाई मेहता संस्था संचालिका डॉ. हेमा यादव, राज्य सहकारी गृहनिर्माण संघाचे अध्यक्ष सुहास पटवर्धन आदी यावेळी उपस्थित होते. कार्यशाळेला राज्याच्या सर्व जिल्ह्यांतील ३०० पेक्षा अधिक प्रतिनिधी उपस्थित होते. ग्रामीण कारागीर महासंघाचा सहकार रत्न पुरस्कार मावळमधील अंकुश आबेकर यांना प्रदान करण्यात आला.




# श्री गोवर्धनसिंहजी रघुवंशी सहकारी बँकेला सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार प्रदान



**नंदुरबार –** दि महाराष्ट्र अर्बन को-ऑपरेटिव बँक्स फेडरेशनच्या वतीने सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार येथील श्री. गोवर्धनसिंहजी रघुवंशी सहकारी बँकेला नुकताच प्रदान करण्यात आला.

पुरस्कारासाठी युनिट बँक व १०० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँका या गटातून पुरस्कार प्राप्त झाला आहे. बँकेचे अध्यक्ष पृथ्वीराज रघुवंशी व भगवती रघुवंशी संचालक मंडळाने पुरस्कार स्वीकारला. अध्यक्ष रघुवंशी यांनी सांगितले की, बँकेला मिळणारा पुरस्कार सर्व संचालक, व्यवस्थापन, कर्मचारी तसेच सभासद, ग्राहक, ठेवीदार व हितचिंतक यांना आनंद मिळवून देणारा आहे.

# सहकार क्षेत्रात लेखा परीक्षण विभागाची जबाबदारी महत्वाची -सहकार आयुक्त

**पुणे –** सहकार क्षेत्रात लेखा परीक्षण विभागाची जबाबदारी महत्वाची असते म्हणून या क्षेत्रातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी सहकारी संस्थासाठी कार्यरत राहावे, अशी अपेक्षा राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांनी व्यक्त केली आहे.

सहकारी संस्थांचे पुणे जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग-१ चे कार्यालय गुलटेकडी येथून स्वारगेट येथील इमारतीत स्थलांतरित करण्यात आले. या नूतन कार्यालयाचे उद्घाटन आयुक्त तावरे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. अपर आयुक्त श्रीकृष्ण वाडेकर राजेश सुरवसे, तसेच सहकार खात्यातील अधिकारी यावेळी उपस्थित होते. विशेष लेखापरीक्षक डी. एन. काळे यांनी सांगितले की, कार्यालयाच्या नूतनीकरणासाठी सहकार आयुक्तांनी अवसायन निधीतून २३ लाख रुपयांची रक्कम उपलब्ध करून दिली. त्यामुळे कार्यालयाच्या नूतनीकरणामधून सुसज्ज असे कार्यालय उभे राहण्यास मदत झाली आहे. जिल्ह्यातील सुमारे ३० हजार पेक्षा अधिक सहकारी संस्थांच्या लेखा परीक्षणाचे कामकाज या कार्यालयातून होणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय भोईटे आणि रामदास ससर यांनी आभार मानले.



# सहकार चळवळीच्या गुणात्मक विकासासाठी प्रशिक्षणाची गरज
# राज्य सहकारी संघ अध्यक्ष रामदास मोरे यांचे मत

**पुणे –** राज्यात सहकार चळवळीचा गुणात्मक विकास होण्यासाठी राज्यामध्ये सहकारी क्षेत्राशी निगडित व्यक्तींना उच्च दर्जाचे सहकारी शिक्षण द्यावे, असे महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष रामदास मोरे यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य सहकारी संघाच्या पद्मभूषण वसंतदादा पाटील सभागृहात सहकार प्रशिक्षण केंद्राचे 'सहकार महर्षी साहेबराव सातकर सहकार प्रशिक्षण केंद्र' नामकरण समारंभात मोरे बोलत होते.

अपर निबंधक श्रीकृष्ण वाडेकर, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे, राज्य सहकारी संघाचे उपाध्यक्ष हिरामण सातकर, मानद सचिव विद्या पाटील, पुणे ग्रामीण सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक प्रकाश जगताप, पुणे जिल्हा सहकारी बोर्डचे उपाध्यक्ष रतन हेगडे, राज्य सह संघाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सोनाली रावळ-ठाकूर, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील उपस्थित होते.

मोरे म्हणाले, राज्य सहकारी संघाचे राज्यात एकूण १३ सहकार प्रशिक्षण केंद्र आहेत. त्यामध्ये १ जुलै १९४७ ला पुणे व रायगड जिल्ह्यासाठी पुणे येथे स्थापन झालेल्या केंद्राचा समावेश आहे. माजी आमदार सहकार महर्षी स्व. साहेबराव सातकर यांचा राज्यातील अनेक सहकारी संस्थांच्या जडणघडणीत मोलाचा वाटा आहे. सहकारी शिक्षण प्रशिक्षण हे त्यांचे आवडीचे क्षेत्र होते. साहेबराव सातकर यांच्या सहकारातील अलौकिक कार्याच्या स्मृती चिरंतन राहाव्यात, या हेतूने येथील प्रशिक्षण केंद्राचे नामकरण 'सहकार महर्षी साहेबराव सातकर सहकार प्रशिक्षण केंद्र' असे करण्यात येत आहे.

*** सहकाराचे शिक्षण खूप महत्त्वाचे –**

सहकार चळवळीची भरभराट होण्यासाठी सहकाराचे शिक्षण खूप महत्त्वाचे आहे. सध्या माध्यमांचे स्वरूप बदलले आहे. त्यामध्ये सहकार क्षेत्राने टिकण्यासाठी आवश्यक पावले उचलणे गरजेचे आहे. सर्व संस्थांच्या संचालक मंडळाने यावर विचार करून संस्थेच्या भरभराटीसाठी प्रयत्न करावा. विद्यार्थ्यांना सहकार विषयाची आवड निर्माण व्हावी, याकरिता महाविद्यालयीन स्तरावर सहकार शिक्षण देणे गरजेचे आहे. प्रत्येक विभागस्तरावर प्रशिक्षण वर्गाचे योग्य नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

अपर निबंधक वाडेकर म्हणाले, स्व. साहेबराव सातकर यांच्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी संघाला वैभव प्राप्त झाले. सहकारी चळवळ वाढली पाहिजे, तिची भरभराट झाली पाहिजे. यासाठी स्व. सातकर यांनी काम केले. समाजाचा सहकाराच्या माध्यमातून विकास करायचा असेल तर सहकारी शिक्षण प्रशिक्षणाची अत्यंत गरज आहे, या त्यांच्या मतानुसार गेली १०६ वर्षे सहकारी संघ काम करत आहे. यावेळी प्रा. दुर्गाडे, बुट्टे पाटील, सातकर व श्रीमती पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले.




# गोदावरी अर्बन 'सहकार भूषण' पुरस्काराने सन्मानित

**शिर्डी** – गोदावरी अर्बनने महाराष्ट्रासह, आंध्रप्रदेश, तेलंगणा, कर्नाटक व गुजरात या राज्यांमध्ये सहकार रुजविण्यात व वाढविण्यात मोलाचे योगदान दिल्याबद्दल नॅशनल मल्टिस्टेट फेडरेशनच्या वतीने गोदावरी अर्बनला 'सहकार भूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

केंद्रीय सहकार सचिव डॉ. आशिष भूतानी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी माजी सहकार मंत्री सुभाष देशमुख, सहकार सहनिबंधक संभाजीराव निकम, राज्य फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर मल्टिस्टेट फेडरेशनचे अध्यक्ष सुरेश वाबळे, बुलढाणा अर्बनचे अध्यक्ष राधेश्याम चांडक उपस्थित होते. सोहळ्याचे आयोजन नॅशनल मल्टिस्टेट फेडरेशनच्या वतीने सहकार भवन येथे करण्यात आले होते.

गोदावरी अर्बनने सहकार क्षेत्रामध्ये कायमच प्रगतीचा आलेख उंचावत ठेवण्याचा विक्रम केला आहे. ग्राहकांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने दर्जेदार व सुलभ सेवा देण्यासाठी संस्था कार्य करीत आहे. पुरस्काराबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन केंद्राचे अध्यक्ष खासदार हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील यांनी संचालक, ग्राहक व कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

# पुणे पीपल्स को-ऑप. बँक अध्यक्षपदी सीए जनार्दन रणदिवे

**पुणे** – पुणे पीपल्स को-ऑप. बँक अध्यक्षपदी सीए जनार्दन रणदिवे यांची तर उपाध्यक्षपदी डॉ. रमेश सोनावणे यांची निवड करण्यात आली आहे. बँक संचालकांच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. निवड एक वर्षासाठी असणार आहे.

नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने २ हजार ४६२ कोटी रुपयांचा टप्पा पूर्ण केला असून त्यामध्ये ठेवी १ हजार ५०२ कोटी तर कर्ज ९६० कोटी दिले आहे. एनपीए टक्केवारी शून्य टक्के असून सीडी रेशो ६४ टक्के आणि निव्वळ नफा १६ कोटी इतका झाला आहे. बँक सदस्यांना साडेबारा टक्के दराने लाभांश देण्यात आला, असे अध्यक्ष रणदिवे यांनी सांगितले.

# महेश सहकारी बँकेचा आर्थिक वर्षात एकूण व्यवसाय १४०० कोटी

**पुणे** – येथील महेश सहकारी बँकेने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात एकूण व्यवसाय १४०० कोटींचा केला असून एनपीएचे प्रमाण शून्य टक्के राखण्यात यश मिळविले आहे. बँकेने सदस्यांना १० टक्के लाभांश जाहीर केला आहे.

बँकेची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच झाली. त्यामध्ये वरील माहिती सांगण्यात आली. बँकेस ६.२१ कोटी निव्वळ नफा झाला असून गेल्या वर्षीच्या तुलनेत बँकेने एकूण व्यवसायात १४ टक्के वाढ केली आहे. भांडवल पर्याप्तता प्रमाण २०.९२ टक्के आहे. व्यवसायाच्या वाढीसाठी नवीन शाखा उघडण्याचा मानस विद्यमान अध्यक्ष जुगलकिशोर पुंगलिया यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्र हे बँकेचे कार्यक्षेत्र असून सध्या १५ शाखा कार्यरत आहेत. ग्राहकांना बँक सर्व प्रकारच्या तंत्रज्ञानयुक्त अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देत आहे. बँकेला विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. उपाध्यक्ष गोपाल राठी यांनी आभार मानले.

# श्री छत्रपती शाहू बँकेचा १० टक्के लाभांश जाहीर

**बीड** – येथील श्री छत्रपती शाहू बँकेने १० टक्के लाभांश सदस्यांना जाहीर केला आहे तर नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात २३ कोटी ३५ लाख रुपये नफा झाला आहे, अशी माहिती सर्व साधारण सभेत सांगण्यात आली. सध्या ठेवी १४०० कोटी रुपये असून ८०० कोटींचे कर्ज वितरण करण्यात आले आहे.

# एनपीएचे प्रमाण कमी करण्यावर भर देणार

**पुणे** – आगामी दहा वर्षांच्या कालावधीत संस्थेच्या एनपीएचे प्रमाण शून्य टक्के करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती श्री तिरुपती नागरी सहकारी पतसंस्था अध्यक्ष संतोष चोपडा यांनी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सांगितली. तसेच सदस्यांना ८ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला आहे. या सभेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात संस्थेचे भाग भांडवल ३ कोटी ३८ लाख ठेवी ११७ कोटी ९४ लाख तर कर्ज वाटप ८८ कोटी १८ लाख आणि गुंतवणूक ४५ कोटी ४४ लाख आणि खेळते भांडवल १४९ कोटी २५ लाख इतके आहे, असे त्यांनी सांगितले. संस्थेने ग्राहकांना विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

# राजर्षि शाहू सहकारी बँकेचे न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीबरोबर टायअप

**पुणे** – येथील राजर्षि शाहू सहकारी बँकेच्या वतीने न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीबरोबर टायअप केले आहे. याबाबतचा करार नुकताच झाला आहे, अशी माहिती बँक अध्यक्ष सुधाकर पन्हाळे यांनी सांगितली.

ते म्हणाले बँकेच्या विविध ठेव योजना, कर्ज योजना डिजिटल उत्पादनांच्या बरोबरीने कंपनीच्या योजना ग्राहकांना देखील देता येणार आहेत. यावेळी बँक संचालक आणि अधिकारी उपस्थित होते.

# मनी म्यूल अकौंट

नुकतेच म्हणजे ऑगस्ट महिन्याच्या २४ तारखेला स्टेट बँकेच्या हैद्राबाद येथील शमशेरगंज शाखेत सुमारे रु.१७५ कोटी इतका मोठा फ्रॉड झाला असल्याचे निदर्शनास आले असून हा फ्रॉड मनी म्यूल अकौंटच्या माध्यमातून झाला असल्याचे उघड झाले आहे. त्या संबंधित लोकांना दि. २४/०८/२०२४ रोजी अटक झाली असून प्रमुख आरोपींनी कित्येक मनी म्यूल खाती उघडून संबंधित खातेदारांच्या अपरोक्ष मोठ्या रकमा वरचेवर विविध ठिकाणी ट्रान्स्फर केल्या असल्याचे दिसून आले. हे व्यवहार जरी बँकेमार्फत झाले असले तरी व्यवहारातील प्रत्यक्ष लाभार्थ्यांची ओळख पटविणे खूप अवघड होऊन जाते. शिवाय अशा गुन्ह्यातील दोषींपर्यंत पोहचणे तपास यंत्रणांना अवघड होऊन जाते, कारण अशा फसवणुकीच्या व्यवहारात मुख्य आरोपीकडून मनी म्यूल्सचा अकौंटचा प्रामुख्याने वापर केला जातो. सर्वसामान्यास मनी म्यूल म्हणजे काय याची कल्पना नसते व आपल्यापैकी कोणीही कळतनकळत मनी म्यूल होऊ शकतो. म्हणून आज पण मनी म्यूल म्हणजे काय, एखादी व्यक्ती मनी म्यूल कशी होते व त्याचे दुष्परिणाम काय याची माहिती घेऊ.



सुधाकर कुलकर्णी
९४२३० ०२०१४

**मनी म्यूल म्हणजे काय ?**

मनी म्यूल म्हणजे असी एक व्यक्ती जी आपल्या बँक खात्यावर स्वत:शी संबंधित नसलेली रक्कम जमा करून घेत असते व त्यानंतर दिलेल्या सूचनेनुसार त्याच्यासी संबंधित नसलेल्या खात्यावर ट्रान्स्फर करीत असते. अशी रक्कम बहुतांश वेळा फसवणुकीतून किंवा बेकायदेशीर व्यवहारातून आलेली असते. थोडक्यात हे बँक खाते बेनामी नसते तर हे खाते त्या व्यक्तीकडून नकळत तर कधी काही मोबदल्यात अशा गैर व्यवहारासाठी वापरण्यास दिले जाते. असे आपले बँक खाते वापरू देणाऱ्या व्यक्तीस मनी म्यूल (पैसे वाहून नेणारे खेचर) असे म्हणतात. बऱ्याचदा अशा मनी म्यूलला खातेधारकास या पैशांमागच्या गुन्हेगारी बाबतची कल्पना नसते. तर कधीकधी असे खातेदार बिनासायास होणाऱ्या आर्थिक लाभासाठी असे खाते उघडण्यास तयार होतात.

गुन्हेगारी टोळ्या अशा मनी म्यूल्सचा वापर करून गैरव्यवहार/फसवणूक/अमली पदार्थांची विक्री /दडपशाही यातून मिळविलेला काळा पैसा पांढरा करीत असतात. याला मनी लाँड्रींग असे म्हणतात. मनी थोडक्यात मनी लाँड्रींग म्हणजे काळा पैसा पांढरा करणे होय. मनी लाँड्रींगमध्ये मनी म्यूल्सचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असतो.

**मनी म्यूल्स कसे बनविले /नेमले जातात ?**

गुन्हेगारी टोळ्या मनी म्यूल नेमण्यासाठी प्रामुख्याने पुढील पद्धती वापरतात

**१) फसव्या जाहिराती :** यामध्ये ई-मेल/एसएमएस /व्हॉट्स ॲप/फेसबूक किंवा तत्सम सोशल मीडिया माध्यमातून नोकरीचे प्रलोभन दाखविले जाते. अशा जाहिरातीमध्ये चांगल्या मोबदला दिला जाईल असे सांगितले जाते. विशेष म्हणजे यासाठी कुठल्याही अनुभवाची /शिक्षणाची अट असत नाही व काम घर बसल्या ऑन लाईन करावयाचे असते. यामुळे सुशिक्षित परंतु कुठलेही व्यवसायिक कौशल्य नसणारी व्यक्ती सहजगत्या अशा जाहिरातीस बळी पडून मनी म्यूल होते. साधारणपणे सुशिक्षित बेरोजगार युवक, हाऊसिंग सोसायट्यांमधील रखवालदार, पदपथावरील लहान विक्रेते कमिशनच्या लोभाने अशी बँक खाती उघडण्यास तयार होतात म्हणजेच मनी म्यूल होतात.



**२) रोमान्स स्कॅम –** यामध्ये प्रामुख्याने विवाह लांबलेले, घटस्फोटीत किंवा विधवा-विधुर स्त्री/पुरुष यांच्याशी सोशल मीडिया किंवा डेटिंग प्लॅटफॉर्म संपर्क साधला जाऊन त्यांच्या वैवाहिक परिस्थितीचा गैरफायदा घेऊन त्यांना प्रलोभन दाखवून मनी म्यूल बनविले जाते.

**मनी म्यूलचे प्रामुख्याने खालील तीन प्रकार असतात –**

१) अशी व्यक्ती की जिला आपले बँक खाते अशा प्रकारच्या गैरव्यवहारासाठी वापरले जात आहे याची जाणीव नसते. अशी खाती पर्सनल डेटा चोरी करून उघडली जातात व त्यावरील सह्या संबंधित व्यक्तीच्या नसतात. अशी खाती उघडण्यात कधी कधी संबंधित बँक कर्मचारीसुद्धा सहभागी असतात.

२) ज्यांना नोकरीचे आमिष दाखवून खात्याचा तपशील द्यायला सांगितला जातो व या खात्यातून व्यवहार करण्यास सांगितले जाते व व्यवहाराच्या काही टक्के (२% ते ५%) रक्कम मोबदला म्हणून दिली जाते.

३) रोमान्स स्कॅममधील व्यक्ती सोशल मेडिया किंवा डेटिंग प्लॅटफॉर्म ओळख झालेल्या व्यक्तीवर विश्वास ठेऊन आपल्या खात्यावर समोरच्या व्यक्तीस रक्कम जमा करण्याची अनुमती देते व त्यानंतर समोरच्या अनोळख्या व्यक्तीवर विश्वास ठेऊन ती सांगेल त्याप्रमाणे आपल्या खात्यात जमा झालेली रक्कम अनोळखी माणसाच्या खात्यावर ट्रान्स्फर करते.

मनी म्यूल होऊ नये यासाठी दक्षता कसी घ्यावी :

१) जेव्हा आपण कुठल्याही प्रकारचा नोकरीसाठी अर्ज न करता आपल्याला एखादी चांगला पगार असलेली नोकरी देऊ केली जाते. तसेच त्यासाठी कुठल्याही अनुभव/शिक्षणाची अट नसते, अशा नोकरीच्या मोह टाळावा.

२) कधी कधी बँकेला व्यवसाय वाढीच्या उद्देशाने खाती उघडावयाची आहेत, असे सांगून परस्पर त्रयस्थ व्यक्ती आपले पॅन व आधार कार्ड घेऊन स्वत:च सुरुवातीची रक्कम भरून आपले खाते बँकेत उघडीत असते.

२) जेव्हा एखाद्या डेटिंग प्लॅटफॉर्म ओळख झालेली व्यक्ती आपले बँक अकाऊंट, आधार कार्ड व पॅन यासारखा तपशील मागत असेल तर अशा व्यक्तीस प्रत्यक्ष भेटून खात्री पटली, तरच त्याचेसोबत आर्थिक व्यवहार करावेत.

३) वर्क फ्रॉम होम व ऑनलाईन असे जर कामाचे स्वरूप असेल तर काम देऊ करणारी व्यक्ती किंवा संस्था यांची पूर्ण माहिती घेऊनच काम स्वीकारावे. केवळ घरबसल्या कमी कष्टात पैसे मिळतील म्हणून अनोळखी व्यक्ती अथवा कंपनीने देऊ केलेली नोकरी/भागीदारी स्वीकारू नये.

४) परदेशी कंपनी अथवा व्यक्तीकडून नोकरी अथवा भागीदारी देऊ केली जात असेल तर पूर्ण खात्री झाल्याशिवाय ऑफर स्विकारू नये.

*** कळत नकळत मनी म्यूल झाल्यास**

**पान क्र. ६३ वर**

# सहकार क्षेत्रामुळेच समाजाचा सर्वांगीण विकास शक्य - सुरेश प्रभू




माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांचा सन्मान करताना बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे

**पुणे -** देश पूर्णपणे विकसित होण्यासाठी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार क्षेत्राखेरीज पर्याय नाही असे मत माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांनी व्यक्त केले आहे. नवीन राष्ट्रीय सहकार धोरण निश्चितीचे पैलू या विषयावर कॉसमॉस सहकारी बँकेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

ते म्हणाले, देश विकसित करण्यासाठी देशाची संपूर्ण क्षमता वापरण्याची गरज आहे. व्यक्तीचा आणि समाजाचा विकास होणे यामुळे आवश्यक आहे आणि हे केवळ सहकारामुळे शक्य आहे. कायमस्वरूपी वाढत राहील अशी अर्थव्यवस्था आपल्याला निर्माण करायची आहे. शेतकरी, कामगार, महिला, युवक, नव उद्योजक या सर्व घटकांना बळ मिळाले पाहिजे. सहकाराच्या माध्यमातून गावपातळीवर विविध व्यवसाय करण्यासाठी अनेक दालने उपलब्ध करून दिली जाणार आहेत. नवीन राष्ट्रीय सहकार धोरण करताना या सर्व बाबींचा विचार करण्यात आला आहे. नवीन सहकार धोरणाच्या अंमलबजावणी साठी विविध प्रभावी उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. असे त्यांनी सांगितले.

बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे यांनी सांगितले की, देशाची अर्थव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सहकार क्षेत्राचे नवीन व्यापक धोरण ठरविण्याचे काम वेगाने सुरु आहे. सहकार क्षेत्रासमोरील आव्हाने वाढली आहेत. उत्तम उत्पादने आणि उत्तम सेवा देण्यासाठी तंत्रज्ञान आणि आर्थिक पाठबळ याची गरज आहे. केंद्र आणि राज्य शासन याबाबत योग्य धोरण तयार करीत आहे त्यामुळे आगामी काळात सहकार क्षेत्र अधिक बळकट होणार आहे.

महाराष्ट्र अर्बन बँक्स फेडरेशन अध्यक्ष विद्याधर अनास्कर यांनी सांगितले की, सहकार धोरण यशस्वी होण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन एकाच हेतुने काम करणे गरजेचे आहे नवीन सहकार धोरणाबरोबर त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. केंद्र सरकारने सहकार खात्यासाठी स्वतंत्र मंत्रालय तयार केल्याने सहकार क्षेत्राला बळ मिळाले आहे. सहकार चळवळ ही शासन प्रणीत आहे, हे या नवीन सहकार धोरणात अधोरेखित करण्यात आले आहे. सहकाराला सामान्य माणसाची समृद्धी अपेक्षित आहे असे ते म्हणाले.

ठाणे जनता सहकारी बँक अध्यक्ष शरद गांगल, वैकुंठ मेहता संस्थेच्या संचालिका डॉ. हेमा यादव यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला विविध सहकारी संस्थांचे अध्यक्ष, संचालक, पदाधिकारी आणि अधिकारी उपस्थित होते.

---

पान क्र. ६२ वरून

## मनी म्यूल अकौंट

**खालीलप्रमाणे दुष्परिणाम होऊ शकतात :**

१) फौजदारी गुन्हा (क्रिमीनल चार्जेस) - भारतीय दंडसंहितेनुसार मनी लॉन्ड्रींग हा पीएमएलए अॅक्ट २००२ नुसार हा एक गंभीर गुन्हा असून यानुसार कळत अथवा न कळत मनी म्यूल झालेल्या व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल होऊन तुरुंगवास तसे दंडही होऊ शकतो.

२) बँक खाते मनी म्यूल असल्याचे निदर्शनास आल्यावर ताबडतोब सबंधित तसे अन्य बँक खाती गोठविली जातात. यामुळे आपली आर्थिक अडचण होऊ शकते. प्रसंगी रक्कम जप्तही केली जाऊ शकते.

३) सबंधित व्यक्तीची सामाजिक प्रतिष्ठा डागाळली जाऊन नवीन कर्ज मिळणे व नोकरी मिळणे कठीण होते. गुन्हेगाराशी संबंध असल्याचे उघड झाल्याने मित्र, नातेवाईक व शेजारी दुरावतात.

मनी म्यूल खाते उघडले जाणार नाही, यासाठी बँकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याची सूचना रिझर्व्ह बँकेने नुकतीच सर्व बँकांना केली आहे. यासाठी केवायसी बाबतची पूर्तता काटेकोरपणे करण्याबाबत सुचविले आहे. शिवाय एका ठराविक कालावधीनंतर खात्याची पुन्हा केवायसी करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.

नुकतेच रिझर्व्ह बँकेच्या आरबीआयएच (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया इनोव्हेशन हब) या उपकंपनीने एआय/एमएल म्यूल हंटर मॉडिल विकसित केले असून याचा उपयोग मनी म्यूल फ्रॉड वेळीच निदर्शनास येतील जेणेकरुन अशा प्रकारचे फ्रॉड वेळीच रोखले जातील. हे एआय/एमएल म्यूल हंटर मॉडिल सध्या मोठ्या सरकारी बँकात वापरले जात असून लवकरच तर अन बँकातही लवकरच वापरण्यात येईल.

थोडक्यात असे म्हणता येईल की मनी म्यूल म्हणजे पैसे वाहून नेणारे खेचरच होय, की ज्याचे बँक खाते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसे ट्रान्सफर (वाहून नेण्याचे) काम करीत असते. यात मनी म्यूलला (खेचराला) हे माहित नसते की आपण एक बेकायदेशीर काम करीत आहोत. बहुतेक सर्व मोठ्या आर्थिक गैरव्यवहारात मनी म्यूलचा सहभाग असल्याचे दिसून आले आहे. यामुळे अशी मनी म्यूल खाती उघडली जाणार नाहीत याची दक्षता घेणे तसेच असलेली खाती वेळीच शोधून बंद करणे.

या कामास बँकांनी प्राथमिकता देणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने बँक खात्याशी निगडीत असलेली जोखीम खाते उघडतानाच निश्चित करून त्यानुसार जास्त जोखीम असणाऱ्या खात्याची केवायसी पूर्तता २ वर्षांनी, मध्यम जोखीम असलेल्या खात्याची केवायसी ८ वर्षांनी व सामान्य (कमी) असलेल्या खात्यांची केवायसी १० वर्षांनी करणे गेजेचे असते. केवायसी बाबतचे हे निकष रिझर्व्ह बँकेने ठरविले असून त्याचे बँकांनी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. तसेच आपणसुद्धा कळत नकळत मनी म्यूल होणार नाही याची दक्षता घेणे अत्यंत आवश्यक आहे. कारण जर आपले बँक खाते मनी म्यूल असल्याचे निष्पन्न झाले तर कायदेशीर कारवाईत अज्ञान हा आपला बचाव होऊ शकत नाही. अशा कार्यवाहीमुळे आर्थिक नुकसान तर होईलच पण त्याचबरोबर आपली सामाजिक प्रतिष्ठा धुळीस मिळेल.


**- सुधाकर कुलकर्णी**

**सर्टिफाईड फायनान्शिअल प्लॅनर-सीएफपी, पुणे**

**मो.नं. - ९४२३० ०२०१४**


****

# एन के जी एस बी सहकारी बँकेला विशेष पुरस्कार प्रदान



**मुंबई-** येथील एन के जी एस बी सहकारी बँकेला यंदाचा दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशनचा विशेष पुरस्कार एका समारंभात प्रदान करण्यात आला आहे. ५००१ कोटी आणि त्यापेक्षा अधिक व्यवसाय असणाऱ्या बँकांच्या गटात एन के जी एस बी सहकारी बँक दुसऱ्या क्रमांकाची ठरली आहे.

बँक संचालक शशांक गुळगुळे, वसंत कुलकर्णी, उप व्यवस्थापकीय संचालिका सीए प्रणाली धराधर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी आमदार प्रवीण दरेकर सारस्वत सहकारी बँक संचालक किशोर रांगणेकर उपस्थित होते.

## हिरालाल गुले यांची महसूल पतसंस्थेच्या अध्यक्षपदी निवड

**नंदुरबार –** धुळे व नंदुरबार महसूल कर्मचारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी हिरालाल गुले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सर्व संचालक मंडळ व कर्मचारी यांनी सत्कार केला. सहकारी संस्थांचे उपनिबंधक अधिकारी राजेंद्र विरकर यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक घेण्यात आली.

सभापती पदासाठी हिरालाल रामचंद्र घुले यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे विरकर यांनी जाहीर केले. महसूल कर्मचारी पतसंस्थेचे संचालक महारु पाटील, संजय शिंदे, श्रीकांत देसले, उत्तम वाघ, लोटन धनगर, रवींद्र कानडे, सच्चीदानंद बळवी, संतोष जोशी, सुभाष बाविस्कर, बसंती पाडवी, माया बिऱ्हाडे तसेच पतसंस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

## बुलढाणा अर्बन बँकेच्या वतीने सदस्यांना ११ टक्के लाभांश जाहीर

**पुणे –** बुलढाणा अर्बन बँकेच्या वतीने नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षासाठी सदस्यांना ११ टक्के लाभांश जाहीर केला आहे. बँकेच्या महाराष्ट्रासह आठ राज्यात शाखा कार्यरत आहेत. एकूण २२ हजार ४०० कोटी रुपयांचा व्यवसायाचा टप्पा पूर्ण केला आहे. अशी माहिती अध्यक्ष राधेशाम चांडक यांनी सांगितली.

आगामी काळात अन्नसुरक्षेच्या दृष्टीने गोदाम साखळीला अधिक प्राधान्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष देशपांडे यांनी आभार मानले.







# गृहरचना संस्था
# शंका समाधान
## अपार्टमेंट कायदा - १९७०



### अपार्टमेंट संघाचे उपविधी...

**नियम क्र. ४ संघाचा मूळ उद्देश क्र. १ ते क्र. ३ मधील लेखात...**

**उद्देश क्र. ४ –** संस्थेच्या आवारातील एखादी सामाईक जागा भाडेकरार ठेवून त्यातून उत्पन्न कमावणे व मिळवलेले संघाच्या खात्यात साठवून त्याचा फायदा संघाच्या इमारतीच्या देखभालीसाठी करणे किंवा संघाच्या राखीव निधीमध्ये (रिझर्व्ह फंड) जमा करणे.

**उद्देश क्र. ५ –** अपार्टमेंट कायदा १९७०च्या कलम १६(२) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संघाची व्यवस्थापन समिती गठीत करणे. त्यांच्या वेळोवेळी निवडणुका घेणे. कर्मचारी वर्ग किंवा व्यवस्थापक नेमणे, मासिक देखभाल शुल्क / वर्गणी ठरवणे. उप-विधीमध्ये दुरुस्ती किंवा बदल करणे, संघाचे पदाधिकारी निवडणे, या प्रकारची सर्व कामे करणे.

अपार्टमेंट संघावर कोणत्याही खात्याचे नियंत्रण नसल्याने प्रत्येक संघाने कायद्याप्रमाणे व उप-विधीप्रमाणे काम करणे अभिप्रेत आहे. तसे केल्यास कायदेशीर अडचणी येणार नाहीत.

**उद्देश क्र. ६ –** अपार्टमेंट धारकांच्या फायद्यासाठी अपार्टमेंट संघातर्फे शैक्षणिक मदत, वैद्यकीय मदत, सामाजिक उपक्रम, मनोरंजकाचे कार्यक्रम इ. कार्यक्रम आयोजित करणे, किंवा या प्रकारच्या संस्थांच्या मदतीने कार्यक्रम करणे व त्याचा लाभ सर्व अपार्टमेंट सभासदांना मिळवून देणे.



**ॲड. जयंत कुलकर्णी**
९४२२० ०७५१०

**उद्देश क्र. ७ –** सर्वसाधारण सभेच्या संमतीने संस्थेने नेमलेल्या कर्मचाऱ्यांसाठी भविष्यनिर्वाह निधी, ग्रॅज्युईटी (सेवा-उपदान) किंवा इतर निधीसंबंधी नियम तयार करणे व संबंधित सक्षम अधिकाऱ्यांना तसे कळवून त्याबाबत रितसर मान्यता घेणे.

**उद्देश क्र. ८ –** संस्थेच्या / संघाच्या कर्मचाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने व संघाच्या उन्नतीसाठी आवश्यकता भासल्यास इतर नियम तयार करणे व तशी दुरुस्ती संघाच्या उप-विधीमध्ये करणे. (नोंदणीनंतरच लागू करणे.)

**उद्देश क्र. ९ –** अपार्टमेंट संघाचे सर्व कामकाज संघाच्या मूळ उद्देशानुसारच चालेल. त्यात बदल करावयाचा असेल तर तसा बदल सर्व अपार्टमेंटधारक सभासदांच्या संमतीने करून त्याप्रमाणे उप-विधीमध्ये बदल करून ते रितसर सह-निबंधक कार्यालयात (सब-रजिस्ट्रार) नोंदवल्यानंतरच त्याची अंमलबजावणी करता येईल. अन्यथा जे मूळ उद्देशामध्ये आहे, त्याप्रमाणेच कामकाज करावे.

संघाचा कारभार मूळ उद्देशानुसारच चालवणे अभिप्रेत असून आवश्यकतेनुसार त्यात बदल / दुरुस्ती करणे संघाच्या सभासदांच्या हातात आहे. कोणतेही शासकीय कार्यालय संघावर नियंत्रण ठेवत असल्याने सभासदांनी जास्त काळजीपूर्वक कामकाज करावे.

**नियम क्र. ५ संघाचे सभासदत्त्व –**

१) घोषणा पत्रामध्ये उल्लेखिलेल्या प्रत्येक अपार्टमेंटच्या क्षेत्रफळानुसार (एरिया) खरेदी केलेलेया प्रत्येक अपार्टमेंट धारकाला संघाचे सभासद होता येते. त्याचप्रमाणे प्रत्येक अपार्टमेंट धारकाने विकासकाबरोबर आपल्या सदनिकेचा अविभक्त हिस्सा (अनडिव्हायडेड शेअर) दर्शविणारा करार म्हणजेच डीड ऑफ अपार्टमेंट कायदा १९७० नुसार बंधनकारक आहे. त्यानंतर अशा अपार्टमेंट धारकाने किमान रु. १००/- चा एक (१) भाग (शेअर) व रु. १/- प्रवेश फी संघाच्या खात्यात जमा करून भाग दाखल घेवून आपले सभासदत्त्व नक्की करावे. त्याचवेळी संघाला डीड ऑफ अपार्टमेंट प्रत देवून उप-विधीची १ प्रत देखील घेवून आपल्याकडे ठेवावी.

२) प्रत्येक अपार्टमेंट धारक अपार्टमेंट डीड (करार)नुसार आपली सदनिका अन्य कोणत्याही व्यक्तीस विकू शकतो किंवा दान (गिफ्ट) करू शकतो किंवा इच्छापत्रानुसार तो अन्य कोणाच्या नावे देखील वर्ग करू शकतो. फक्त नवीन खरेदीदाराला संघास रु. १/- प्रवेश फी व रु. १ /- भागहस्तांतरण फी भरावी लागते. त्यानंतरच भागदाखला नवीन सभासदाच्या नावे वर्ग होवू शकेल.

३) एखाद्या अपार्टमेंट धारकाचे निधन झाल्यास त्याच्या सदनिकेचे (गाळ्याचे) भाग त्याच्या कायदेशीर वारसाच्या नावाने वर्ग होतील व तशी नोंद संघाच्या सभासद नोंदवहीमध्ये घेण्यात येईल. (हिन्दु वारसा कायद्याप्रमाणे)

जर मयत अपार्टमेंट धारकाने आपली सदनिका इच्छापत्राद्वारे अन्य व्यक्तीच्या नावे केली असेल तर त्यानुसार सभासदत्त्व वर्ग होईल. त्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पार पाडणे आवश्यक आहे. उदा. प्रोबेट लेटर ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन, वारस प्रमाणपत्र हे अज्ञान व्यक्तीच्या नावे सभासदत्त्व वर्ग करावयाचे झाल्यास अज्ञान पालककर्त्याची नोंद घेणे आवश्यक आहे.

**नियम क्र. ६ – सह-अपार्टमेंट धारक (जॉईंट होल्डर)**

ज्यावेळी एखादी अपार्टमेंट (सदनिका) एकापेक्षा जास्त व्यक्तींनी संयुक्तपणे खरेदी केलेली असते. त्यावेळी सर्व संयुक्त खरेदीदार हे संयुक्तपणे संघाचे सभासद होतील. परंतु त्यापैकी ज्याचे नाव भाग दाखल्यावर प्रथम आहे त्यालाच मतदानाचा अधिकार असेल.

**नियम क्र, – ७ किमान एक शेअर (भाग)**

प्रत्येक अपार्टमेंट खरेदीदाराने मिळून किमान १ भाग शेअर घेणे कायद्याने बंधनकारक आहे.

**नियम क्र. ८ – सभासदाची अपात्रता (डिसक्वालीफिकेशन)**

एखाद्या अपार्टमेंटधारक सभासदाने संघाचे देणे (वर्गणी, देखभाल इ.) ६० दिवसांपेक्षा जास्त दिवस थकवलेले असल्यास त्याला संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत भाग घेता येणार नाही किंवा त्याला निवडणुकीस उभे राहता येणार नाही किंवा मतदान देखील करता येणार नाही. क्रमशः

**ॲड. जयंत कुलकर्णी**
Email - advjgk@yahoo.co.in

*****

# दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ

**THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL**

Regd.No.YML/BNK/114

मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 - **Phone :** 07232 - 244241, 243703, 237442
**E-mail :** ho_adm@yavatmalurbanbank.com - **Website :** www.yavatmalurbanbank.com

**ISO 9001:2015& ISO 27001:2013 CERTIFIED BANK**

## बँकेचे सभासद,ठेवीदार, ग्राहक व हितचिंतक यांना

## शुभ दिपावली



**कर्जाचे अत्यंत माफक व्याज दर 8.25%* पासुन सुरू**

* नियम व अटी लागू

**आम्ही जपतो वारसा विश्वासाचा**

| **डॉ. नितीन खर्चे** अध्यक्ष | **अजिंदरसिंह चावला** उपाध्यक्ष | **श्रीधर कोहरे** मुख्य कार्यकारी अधिकारी

**संचालक** - श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री.आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री.प्रशांत अरुण माधमशेट्टीवार, श्री.संजय चिंतामणराव डेहणकर, श्री.प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड.श्री.प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री.गोवर्धन दयाराम राठोड, श्री.परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ.श्री.महेश दामोधर सारोळकर, श्री.वसंता रामजी सुपारे, श्री.संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ.शिला राजेश्वर निवल, श्री.प्रविण पांडुरंग खांदवे (तज्ञ संचालक), श्री.पियुष कैलासचंद्र खेतान (तज्ञ संचालक)

# देवगिरी नागरी सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगर

## बँकेच्या उपलब्ध सेवा


मोबाईल बँकिंग


ई-कॉमर्स


पीओएस सुविधा


आरटीजीएस / एनईएफटीद्वारे फंड ट्रान्सफर सुविधा


रुपे डेबिट कार्ड


एस.एम.एस. अलर्ट


ई-स्टेटमेंट सुविधा


लॉकर सुविधा


सीटीएस
(चेक ट्रंकेशन सिस्टीम)


पर्सनलाईज्ड चेकबुक सुविधा


कंपन्यांचे वेतन सुविधा


विविध कर्ज योजना

आजच गूगल प्ले स्टोअरवरुन आमचे ॲप डाउनलोड करा

My Account | ATM Locator | Fund Transfer | Contact Us

Scan QR Code To Download Our App

Google Play



# स्वामी स्वरुपानंद पतसंस्था

**मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य**

रजि. नं. आर.टी.जी./आर.टी.जी./आर.एस.आर./सी.आर७०५/९०-९१ सन १९९१

प्रेसिडेन्सी बिझिनेस हाऊस, २रा मजला, एस.टी.स्टँडसमोर, रत्नागिरी फोन नं. (०२३५२)२२१२६३

फॅक्स नं. (०२३५२)२२५२३१ मो.नं. - ९४०३५ ०६३६३

Website: wwwswaroopanandpatsanstha.com Email : sswaroopanand@gmail.com

शाखा : पावस, जाकादेवी, कुवारबाव, खेडशी, चिपळूण, पाली, नाटे, नाचणे, मारुती मंदिर, मालगुंड, लांजा, राजापूर, पुणे (कोथरुड), कोकणनगर, देवगड, देवरुख



ॲड. दीपक म.पटवर्धन
अध्यक्ष

श्री. माधव ग. गोगटे
उपाध्यक्ष

*** दिनांक ३०/०९/२०२४ अखेर संस्थेची आर्थिक स्थिती ***

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण शाखा | १७ | खेळते भांडवल | ३८९ कोटी ६० लाख |
| ठेवी | ३२५ कोटी ५६ लाख | वसुली | ९९.३२% |
| कर्जे | २२६ कोटी ७२ लाख | नफा (३१/०३/२०२४) | ७ कोटी ०३ लाख |
| गुंतवणूक | १४६ कोटी ४६ लाख | सीआरएआर | २८.००% |
| स्वनिधी | ४७ कोटी ८७ लाख | ऑडिट वर्ग | 'अ' |

* संस्थेचे सर्व व्यवहार सीबीएस सिस्टीममध्ये उपलब्ध.
* आरटीजीएस / एनईएफटी सेवा उपलब्ध.
* गृह बांधणी/खरेदी कर्ज, सोनेतारण कर्ज, वाहन खरेदी कर्ज
* सुलभ व जलद प्रक्रिया, छुपे खर्च नाहीत. * स्थिर व्याजदर

## साधना सहकारी बँकेस पुरस्कार प्रदान

**पुणे –** येथील साधना सहकारी बँकेस शून्य टक्के एनपीए पुरस्कार पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशकडून नुकताच प्रदान करण्यात आला. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि सहकार आयुक्त दीपक तावरे आणि निवडणूक प्राधिकरण आयुक्त अनिल कवडे यावेळी उपस्थित होते.

बँकेच्या वतीने अध्यक्ष जानकू कदम, उपाध्यक्ष प्रताप बोरकर आणि संचालक यांनी पुरस्कार स्वीकारला. बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र असून एकूण व्यवसाय ११०० आहे. तसेच २७ शाखा कार्यरत आहेत. बँकेस नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात ८.२१ कोटी इतका नफा झाला आहे.

## राजाराम बापू सहकारी बँकेला बँक असोसिएशनचा पुरस्कार प्रदान

**पुणे –** येथील राजारामबापू सहकारी बँकेला नुकताच पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक असोसिएशकडून शून्य टक्के एन पी ए पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.

बँकेचा एकूण व्यवसाय ४००० कोटींच्या पुढे झाला आहे. बँकेच्या सध्या ४८ शाखा कार्यरत आहेत. नव्याने दोन शाखांना परवानगी मिळाली आहे, असे बँक अध्यक्ष प्रा. शामराव पाटील उपाध्यक्ष विजयराव यादव आणि संचालक यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

## सहकार खात्याला तीन नवे अपर निबंधक

**पुणे –** सहकार खात्यामध्ये नव्याने पदोन्नतीच्या निर्णयामुळे तीन अपर निबंधक खात्याला मिळणार आहेत. यामध्ये राजेश सुरवसे, केदारी जाधव, दीपक शिंदे यांचा समावेश आहे. या निर्णयावर राज्य शासनाकडून शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. याबाबतचे आदेश नुकतेच काढण्यात आले आहेत.

## जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्था अध्यक्षपदी चंद्रशेखर देशपांडे

**कराड –** येथील जनकल्याण नागरी सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी चंद्रशेखर देशपांडे आणि उपाध्यक्षपदी मिलिंद पेंढारकर यांची एकमताने निवड करण्यात आली. संस्थेचा एकूण व्यवसाय ९१३ कोटी रुपयांचा झाला असून नजीकच्या काळात एक हजार कोटींचा टप्पा पूर्ण करण्यात येणार आहे.

## श्री लक्ष्मी कृपा अर्बन को-ऑप. बँक कोथरूड शाखेचा २८वा वर्धापनदिन साजरा

**पुणे –** येथील श्री लक्ष्मी कृपा अर्बन को-ऑप. बँकेच्या कोथरूड शाखेचा २८वा वर्धापनदिन नुकताच उत्साहात साजरा करण्यात आला. आरबीआय संचालक सतिश मराठे पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन अध्यक्ष सुभाष मोहिते, सहकारी संस्था उपनिबंधक मिलिंद टंकसाळे आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बँकेच्या नवईन युपीआय सुविधेचे मराठे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. बँक अध्यक्ष नंदकुमार गायकवाड यांनी स्वागत केले संचालक दत्तात्रय पासलकर यांनी आभार मानले. वर्धापनदिनाच्या निमित्ताने बँकेच्या खातेदार, ग्राहकांनी आणि नागरिकांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.


२०२४
७५ अमृत महोत्सव
25 K

कर व व्यापारी विषयक कायद्यातील
क्लिष्ट विषयांची सहज सोप्या भाषेत
माहितीसह आर्थिक गुंतवणूक,
आरोग्याविषयी माहिती देणारे
व्यापारी बांधवांचे हक्काचे एकच व्यासपीठ

स्थापना १९५०
# व्यापारी मित्र

मासिकातील एखाद्या माहितीने आपला लाखो रुपयांचा फायदा होऊ शकतो.

संस्थापक संपादक : स्व. श्री. जी. डी. शर्मा

मासिकाची वर्गणी
खालील प्रकारे भरु शकता.

| | वर्ष ३ | वर्ष २ | वर्ष १ |
|---|---|---|---|
| साध्या पोस्टाने | १९०० | १३०० | ७०० |
| रजिस्टर पोस्टाने | २६०० | १७८० | ९४० |

'परशुराम कुटी', १०६/९, एरंडवणा, पुणे – ४११००४
फोन (०२०) २५४३ १०९४ (W) : 94218 80290
E-mail : sampadak@vyaparimitra.com



# दि अण्णासाहेब सावंत
## को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक महाड लि.

श्रेयस कॉम्प्लेक्स, महाड, जि. रायगड

आमच्या अत्याधुनिक बँकिंग सेवा

- रायगड जिल्ह्यातील सर्वात मोठी नागरी सहकारी बँक
- 24 शाखा व 5 ए.टी.एम.द्वारे विनम्र अर्थसेवा
- LOCKER SMS सेवा
- QR CODE सेवा
- मोबाईल बँकिंग सेवा
- UPI सेवा
- वैशिष्ट्यपुर्ण ग्राहक सेवा " We Connect" 8483900708

श्री.यशवंत चि.ओजाळे
मॅनेजिंग डायरेक्टर

श्रीमती शोभा सुधाकर सावंत
चेअरपर्सन

ॲड.मानसी आशीर्वाद मराठे
व्हाईस चेअरपर्सन

सर्व संचालक, पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी वृंद

mahadbank@gmail.com www.asbankmahad.com

सहकारातील विश्वासार्ह नांव

ISO 9001 : 2015 मानांकनप्राप्त

सहकार सुगंध मासिकात माहिती देणे, वर्गणी भरणे तसेच जाहिरातींसाठी जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा ही विनंती – संपादक

**श्री. संतोष गावंडे : रिजनल हेड (विदर्भ) 9420116337**

| पश्चिम महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| रहाटणी, पुणे | श्री. डी. एस. कुलकर्णी | 9420655316 |
| पिंपरी चिंचवड | श्री. शिरीष लिपारे | 9762830555 |
| सातारा | श्री. विनायक भिसे | 9923396312 |
| सांगली | सौ. श्वेता कुलकर्णी | 8830837005 |
| इचलकरंजी | श्री. प्रशांत कुलकर्णी | 9421172965 |
| सोलापूर शहर | सौ. दिपाली कुलकर्णी | 9049785111 |
| सोलापूर जिल्हा | श्री. चंद्रकांत धोंडे | 9881139150 |
| संगमनेर | श्री. विजय भिडे | 9975516360 |
| बेलापूर, जि. नगर | श्री. अरविंद शहाणे | 9922707677 |
| **कोकण विभाग** | | |
| मुंबई-अंधेरी | श्री. रामकृष्ण आवारे | 9619318544 |
| मुंबई-विक्रोळी | श्री. प्रभाकर कांबळे | 9594293734 |
| मुंबई-जोगेश्वरी | श्री. गणेश खिलारे | 9322161526 |
| मुंबई-दहिसर | श्री. हितेश वाघेला | 8828384482 |
| मुंबई-बोरिवली | श्री. केशव खाडे | 9969825835 |
| डोंबिवली | श्री. संदीप गव्हाणे | 7738449033 |
| पालघर | श्री. सदानंद पावगी | 8888880680 |
| वसई | श्री. संतोष शिंदे | 8652415015 |
| मुरुड, जंजिरा | श्री. मेघराज जाधव | 9561710445<br>9421164777 |
| मुंबई-सायन | श्री. भरत चिंचोले | 7021862169 |
| पनवेल | श्री. संजय पावसकर | 8928323997 |

| उत्तर महाराष्ट्र विभाग | | |
|---|---|---|
| जळगाव | श्री. विश्वास कुलकर्णी | 9922653022 |
| चाळीसगाव, जळगाव | अॅड. विकास देवकर | 7588440640 |
| धुळे | श्री. बी. एम. कुलकर्णी | 9420602441 |
| पिंपळनेर, धुळे | श्री. सुर्यकांत जगताप | 9552570515 |
| नंदूरबार | श्री. महादू हिरणवाळे | 9823842991<br>8208147121 |
| नाशिक | श्री. राजीव चंद्रात्रे | 9403261226 |
| **मराठवाडा विभाग** | | |
| छत्रपती संभाजीनगर | श्री. अभय बावस्कर | 9422202569 |
| पैठण | श्री. देवेश इनामदार | 9404981212 |
| लातूर | श्री. शरद दिवे | 8275020460 |
| परभणी | श्री. संतोष पाथरीकर | 9763012439 |
| परभणी | श्री. मंगेश पाठक | 8149355759 |
| जालना | अॅड. दशरथ इंगळे | 9422723784 |
| **विदर्भ विभाग** | | |
| नागपूर | श्री. महेश राव | 9545741474 |
| यवतमाळ | श्री. संतोष गावंडे | 9420116337 |
| भंडारा | श्री. मुकुंदा पांढरीपांडे | 9420514872 |

**सहकारी संस्थांना अत्यंत उपयुक्त खालील पुस्तके सहकार सुगंध कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध आहेत.**

| क्र. | पुस्तकाचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | सहकार कायदा व वसुलीची प्रक्रिया | २००/- |
| २ | सहकार बँकांचे कर्ज व्यवस्थापन | ३५०/- |
| ३ | नागरी सहकारी बँकेचे प्रशिक्षण | १२५/- |
| ४ | डिजीटल तंत्रज्ञानाचे धोके व सावध, सुरक्षित वापर | १५०/- |

वरील पुस्तकांसाठी रक्कम तसेच सहकार सुगंधची वर्गणी भरण्यासाठी सहकार सुगंधच्या वरील जिल्हा प्रतिनिधींशी संपर्क साधावा किंवा खालील बँक खात्यात रक्कम जमा करण्यासाठी खालील क्यूआर कोड वापरावा.

सहकार सुगंधची वर्गणी १ मे २०२२ पासून–
वार्षिक रु. ४००/– त्रैवार्षिक रु. १०००/–

**UPI ID**
SahakarSugandha@DNSbank

A/c Name : Sahakar Sugandha
Bank Name : Dombivali Nagari Sahakari Bank Ltd.
(Sihagad Road, Pune Branch)
Current a/c No. : 078011100000065
IFS Code - DNSB0000078

**UPI ID**
SahakarSugandha@SBI

A/c Name : Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name : State Bank of India
(Hingne Khurd, Pune Branch)
Current a/c No. : 36931889346
IFS Code - SBIN0007159

कृपया वर्गणी जमा केल्यानंतर आपला नाव व पत्ता पुढील ई मेलवर कळवा. sahakar.sugandha@gmail.com

**महाराष्ट्रात जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहेत. संपर्क : ८८०५९८१६७३**

# Secure Your Valuables with Godrej's BIS-Certified Safes

From the very beginning, we've been taught to value authenticity. Just as only a skilled jeweler can distinguish between real gold and counterfeit, the same principle applies to the safekeeping of your valuables. It raises a crucial question: why trust your precious assets to just any random iron box? In doing so, you're essentially inviting trouble.

The simplest and most effective solution? Choose a BIS-certified safe. But before we delve into why this certification matters, let's explore what it truly signifies and why Godrej's safes, backed by BIS certification, are the gold standard in security.

The Ministry of Commerce and Industry requires all high-security safes to be BIS-certified with an ISI mark, ensuring safety and quality. Godrej leads by offering Class E BIS-certified safes tailored for businesses, helping them upgrade their security and build trust.

In simpler terms, if a manufacturer sells a safe without BIS certification, it's akin to selling you a box with no real security value. It's not just a matter of locking your valuables away; it's about ensuring they protect your craft and hard work equally.

Godrej is proud to lead the industry with its Class E BIS-certified safes, specifically designed to meet the highest standards of protection. These safes aren't just for show—they're tailored for businesses and individuals who value both security and trust. By investing in a Godrej BIS-certified safe, you're not only upgrading your security system but also reinforcing the trust your clients, employees, or family place in you.

When you choose a Godrej safe, you're trusting a century old promise to safeguard your precious belongings.

If you have a BIS-certified safe, your valuables are truly safe.

**- Lakshman Gupta**


## सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्या; कराड
## (शासन मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था)

मान्यताप्राप्त शिखर प्रशिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आमच्या प्रशिक्षण संस्थेचे नाव अधिसूचित केले आहे. अधिसूचित संस्थेकडून सहकारी संस्थांनी प्रशिक्षण घेणे अनिवार्य आहे. नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, गृहनिर्माण संस्था इ. सर्व संस्थाकरिता संचालक, पदाधिकारी, कर्मचारी व सभासदांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

***नागरी सहकारी बँकांसाठी***

आमची संस्था बँकेच्या गरजेप्रमाणे दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन बँकेच्या ठिकाणी जाऊन करते. अन्य प्रशिक्षण कार्यक्रमांबरोबरच नवीन भरती, स्टाफसाठी प्रारंभिक प्रशिक्षण कार्यक्रम, पदोन्नतीपूर्व प्रशिक्षण तसेच **पदोन्नती परीक्षांचेही वाजवी दरात आयोजन करते.** तरी याचा लाभ सहकारी बँकांनी घ्यावा. वरील सेवांसाठी कृपया संपर्क साधावा.

**श्री. माधवेंद्र कोरडे** - (फक्त मेसेजसाठी) **९८५०५७१४०५**
**श्री. श्रीकांत पटवर्धन** (प्रदेश कार्यालय प्रमुख) **९२२५८२५३९९**

सहकार भारती पुणे कार्यालय – ऑफिस क्र. १०५, सांकला आर्केड, गांधी खादी भांडारच्यावर, कर्वे रोड, एरंडवणा, पुणे– ४११ ००४ ई–मेल : sahakarbharati1416@gmail.com

24 CARAT SECURITY FOR YOUR VALUABLES

Godrej

# UNMATCHED SECURITY
## UNCOMPROMISED STRENGTH



• Defender Aurum Pro Safe • Anti Intrusion Fogging Device
• Strong Room Door • Defender Prime Safe • Gold Testing Machine

SCAN TO KNOW MORE

For more information contact:

**Sibashis Paul** 9854026321

सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

# चैतन्य अर्बन

## क्रेडिट को-ऑप. सोसायटी लि. यवतमाळ र.नं.३८९

'श्री विठ्ठल' महेश भवन जवळ, दादासाहेब फाळके चौक, संकट मोचन रोड, यवतमाळ, मो.: ९९२१०८८८४३

शाखा : माईंदे चौक - ९५१८३९६६४१ * पिंपळगाव रोड - ९६२३७९८७४० * संभाजीनगर - ९५२७११९१०८

**आजही आम्ही मुदती ठेवींवर द.सा.द.शे. १०.५०% व्याज देतो!**

वसा विश्वासाचा वारसा नैतिकतेचा द्या।

मुदत ठेव (FD), मासिक उत्पन्न योजना (MIS), आवर्त ठेव योजना (RD), दैनिक बचत (Daily Saving)



अध्यक्ष
**यशवंत (बापू) पाटील**
मो. : ९३७२६९६४६९,

**मुदत ठेवीचे आकर्षक व्याजदर**

१८१ दिवस ते ३६४ दिवस ८%
३६५ दिवस ते २ वर्षाचे आत ९.५%

**विशेष आकर्षण**

२ वर्ष व त्यापुढे १०.००%
आणि ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी सर्व योजनेवर अर्धा टक्का जास्त व्याजदर

**चैतन्य**
*म्हणजे आर्थिक विश्वातील दिपस्तंभ!*
*आपल्या समवेत, आपल्याकरिता सदैव*



**धनवर्धिनी ठेव योजना**

८४ महिन्यात
दाम दुप्पट मासिक योजना

**मासिक प्राप्ती योजना MIS**

फक्त १ लाख आमच्याकडे १ वर्षासाठी गुंतवा दरमहा ८०० रु. व्याज मिळवा.
फक्त १ लाख आमच्याकडे २ वर्षासाठी गुंतवा दरमहा ८५० रु. व्याज मिळवा.
ज्येष्ठ नागरिक व महिलांसाठी १ वर्ष ८५० व २ वर्ष ९०० रु. व्याज मिळवा.

# विदर्भ महिला क्रेडिट को-ऑप. सोसायटी लि. वरोरा

नों.क्र.- CHD/WRA/RSR/CR/624/2015

मिश्रा भवन पहिला माळा, नेहरु चौक, वरोरा, जि. चंद्रपूर



## दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

| कर्ज खात्याचे व्याज दर साल दर शेकडा | व्याजाचे दर % |
|---|---|
| NSC/LIC तारण कर्ज | १२.५% |
| व्यक्तीगत / कंज्यूमर / व्यावसायिक कर्ज | १५% |
| स्थावर तारणी कर्ज | १४% |
| सोने तारण कर्ज (मुदत १२ महिने, सोने मुल्यांकनाचे ६०%) | १०% |
| वेअर हाऊस पावती ताबेगहाण कर्ज किंमतीच्या ६०% | १४% |
| वाहन तारण कर्ज नवीन वाहनाकरीता (ठरलेल्या मर्यादित) वाहन किंमतीच्या ३०% वाहन मालकाकडून मुदत ठेव स्वरुपात वाहन कर्ज संस्थेकडून | १३% |

| बचत खात्याचे व्याज दर साल दर शेकडा | व्याजाचे दर % |
|---|---|
| बचत खाते | ४% |
| आर.डी (१२ महिने) | ६.५% |
| (३६ महिने) | ८% |
| (६० महिने) | ८.५% |
| दैनिक आर.डी. (६ महिने / १२ महिने) (जमा रकमेवर ८०% कर्जाची सोय) | ४% |
| मुदत ठेवीचे दर | |
| १) ६ महिन्याकरीता | ७% |
| २) ६ महिने १ दिवस ते १२ महिने | ८ % |
| ३) १२ महिने १ दिवस ते २५ महिने | ९% |
| ४) २५ महिने १ दिवस ते ६० महिने (जेष्ठ नागरिकांकरीता सदर व्याजदरापेक्षा ०.५% जादा व्याज) | ९% |
| सुवर्ण खरेदी योजना कुबेर लक्ष्मी योजना (दाम दुप्पट) १० वर्षे - १२० महिने करीता | ९% |

* टिप - प्रत्येक कर्ज खातेदारांना विमा संरक्षणाचा लाभ.

### * संचालक मंडळ *

| अ.क्र. | पदाधिकाऱ्यांचे नांव | पदाधिकार |
|---|---|---|
| १. | सौ. निर्मला मोरेश्वर गेघाटे | अध्यक्षा |
| २. | सौ. प्रभा अशोक वर्मा | उपाध्यक्षा |
| ३. | सौ. पुष्पा विजय गोटे | संचालक |
| ४. | सौ. वैशाली दिलीप गिद्देवार | संचालक |
| ५. | सौ. मंगला बाबाराव आगलावे | संचालक |
| ६. | सौ. अपर्णा अशोक धात्रक | संचालक |
| ७. | सौ. सुनंदा अविनाश नेवास्कर | संचालक |

| अ.क्र. | पदाधिकाऱ्यांचे नांव | पदाधिकार |
|---|---|---|
| ८. | सौ. ललीता बलदेव सलामे | संचालक |
| ९. | सौ. लता प्रभाकर अडबाले | संचालक |
| १०. | सौ. प्राजक्ता मनोज कोहळे | संचालक |
| ११. | सौ. आरती गुणवंतराव भोयर | संचालक |
| १२. | श्री. विजय बळीराम गोटे | सहकार तज्ञ संचालक |
| १३. | श्री. राजेश पांडुरंग कावलकर | सहकार तज्ञ संचालक |
| १४. | कु. संगिता गुलाबराव नक्षिणे (मु.का.अ.) | कार्यलक्षी संचालक |

स्थापना :१९८८ महाराष्ट्रातील एक अग्रगण्य संस्था
सर्वोत्तम पुरस्कार प्राप्त संस्था
"३७ वर्षांची विश्वसनिय परंपरा असलेली संस्था"

# ज्योती सहकारी पतसंस्था मर्या. कोपरगांव

ज्योती सर्कल, मेन रोड, कोपरगांव, जि. अ.नगर, फोन नं. (०२४२३) २२१०५५

शाखा : कोपरगांव, शिर्डी, सुरेगांव, कोल्हार, राहुरी, श्रीरामपूर ,येवला, अहमदनगर,पुणे

पुणेकरांच्या सेवेसाठी पुण्यात शाखा सुविधा

पत्ता - अमित समृध्दी बिल्डींग ३ मजला, अभ्युदय बँकेच्यावर, बालगंधर्व चौक, जंगली महाराज रोड, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४,संपर्क- ०२०-२९९८५५३५, शाखाधिकारी नरके मॅडम मो.९९२१७३२६२५

## आर्थिक स्थिती

- ठेवी - ३४० कोटी
- कर्जे - २२५ कोटी
- गुंतवणूक - १३८ कोटी
- स्वनिधी - २५ कोटी
- एकुण व्यवसाय - ५६५ कोटी
- कायम मालमत्ता - २.२१ कोटी
- नफा - २ कोटी ६६ लाख
- ऑडिट वर्ग - सतत'अ'
- विनम्र व तत्पर सेवा



ॲड.श्री.रविकाका बोरावके
चेअरमन

## आकर्षक व्याजदर

| | |
|---|---|
| ४६ दिवस ते १०० दिवस | ६.००% |
| १०१ दिवस ते २०० दिवस | ७.००% |
| २०१ दिवस ते ३६४ दिवस | ८.००% |
| १२ महिने पुर्ण (सरळव्याज) | ९.००% |
| १३ महिने ते १५ महिने (सरळव्याज) | ९.५०% |
| १६ महिने व त्यापुढील (सरळव्याज) | १०.००% |
| दर महा व्याज १३ महिने ते १५ महिने (मासिक ठेव) | ९.५०% |
| दर महा व्याज १६ महिने ते २४ महिने (मासिक ठेव) | ९.५०% |
| दर महा व्याज २५ महिने व त्यापुढील कालावधीसाठी (मासिक ठेव) | १०.००% |
| सेंव्हिग्ज खाते | ४.००% |
| रिकरिंग ठेव खाते १२ महिने ते २४ महिने | ९.००% |
| रिकरिंग ठेव खाते २५ महिने ते ६० महिने | ९.५०% |

जेष्ठ नागरीक(वय वर्ष ६० पुढील), सैनिक किंवा माजी सैनिक, अपंग व्यक्ती यांना अनुक्रमे १ ते ५ या प्रकारातील ठेवींवर अर्धा टक्का जादा व्याजदार लागु राहिल.(सोबत आवश्यक कागदपत्रे ठेवणे.)

AN ISO 9001-2008 Certified

# यवतमाळ जि.प.कर्मचारी सहकारी पतसंस्था

**मर्या.यवतमाळ,र.नं.१०९**

मुख्यालय - स्वस्तिक चौक, गोधणी रोड, यवतमाळ

सातत्याने ऑडीट वर्ग 'अ'

www.yzpecs.org

**संस्थेच्या सर्व सभासदांना व ठेवीदारांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!**

शाखा : वणी, पुसद, दारव्हा, आर्णी, पांढरकवडा

**महाराष्ट्रातील नंबर १ ची पतसंस्था**

**अधिक व्याजदरापेक्षा सुरक्षितता महत्वाची**

**विश्वास + सुरक्षितता = जि.प. पतसंस्था**

| संस्थेची सापंत्तीक स्थिती | |
|---|---|
| कर्ज | २६६.४६ कोटी |
| गुंतवणूक | १४६.४३ कोटी |
| स्थावर व जंगम मालमत्ता | ६.८० कोटी |
| बँकेतील शिल्लक | ४.४५ कोटी |
| सभासद भागभांडवल | २९.२६ कोटी |
| ठेवी | ३२६.३६ कोटी |
| राखीव निधी | २९.११ कोटी |
| सभासद कल्याण निधी | ५.०२ कोटी |

| ठेवीवरील आकर्षक व्याज दर | |
|---|---|
| ३० ते ९० दिवस | ५.००% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | ६.००% |
| १८१ दिवस ते २७३ दिवस | ७.००% |
| २७४ दिवस ते ३६५ दिवस | ७.५०% |
| ३६६ दिवस ते २ वर्ष | ८.५०% |
| २ वर्ष ते ३ वर्ष | ९.००% |
| ३ वर्ष ते ४ वर्ष | ९.५०% |
| ४ वर्षावरील कालावधी करीता | १०.००% |
| सहकारी संस्थेकरीता | ८.५०% |
| आवर्ती ठेव (१ ते २ वर्षाकरीता) | ७.५०% |
| मासिक व्याजप्राप्ती १ लाखाला ६५० रुपये | |
| दाम दुप्पट १०२ महिने | |



महेश लक्ष्मणराव सोनेकर
अध्यक्ष

**संस्थेमध्ये वैयक्तिक लॉकर सुविधा, त्वरा करा मोजकेच लॉकर शिल्लक..!**



| लॉकर प्रकार | लॉकरची लांबी व रुंदी | लॉकर संख्या | वार्षिक भाडे |
|---|---|---|---|
| A | 5X7X20 | 216 | 500 |
| H | 12.50X17.50X20 | 2 | 800 |
| C | 5X14X20 | 18 | 1000 |
| B | 6X8.50X20 | 92 | 1200 |
| D | 7.50X10.50X20 | 112 | 1400 |
| F | 11X17X20 | 9 | 1500 |
| E | 6X17X20 | 4 | 1700 |
| H-1 | 12.50X17.50X20 | 4 | 2000 |
| G | 7.50X21.50X20 | 8 | 2500 |
| K | 16.20X21.50X20 | 8 | 3200 |

लॉकर डिपॉझीट १००००/- रुपये राहील, यावर बचत खात्याप्रमाणे व्याज दिले जाईल.

य.जि.प. कर्मचारी पतसंस्थेची सदैव साथ...
आपल्या प्रगतीस मदतीचा हात...

**लॉकर सभासद, ठेविदार व इतर सर्व लोकांना घेण्याची मुभा**



उपाध्यक्ष



सचिव



आपल्या सहकार्याबद्दल सर्व सभासद व ठेवीदारांना..
धन्यवाद

| | | |
|---|---|---|
| सुभाष धवसे<br>शाखा प्रमुख, आर्णी | शरद घारोड<br>शाखा प्रमुख, दारव्हा | अशोक चटप<br>शाखा प्रमुख, वणी |
| प्रदिप मोहटे<br>शाखा प्रमुख, पुसद | सौ. विजया राऊत<br>शाखा प्रमुख, पांढरकवडा | स्वप्नील फुलमाळी<br>सांस्कृतिक भवन प्रमुख |

**संचालक :** मुकेश भोयर (माजी सचिव), पोपेश्वर भोयर, विनोदकुमार कदम, तुलशीदास आत्राम, गजानन पोयाम, विलास टोंगे, नदिम पटेल, अभिजित ठाकरे, सचिन ठाकरे, तेजस तिवारी, सुनिता गुघाणे (बुटले), मारोती राजगडकर (व्यवस्थापक)

Since 1986

# समता पतसंस्था




**समता** मध्ये बचत खाते सुरु करा आणि मिळवा

**8 %पर्यंत व्याजदर***

व त्याचबरोबर

- आर.टी.जी.एस.,एन.ई.एफ. टी. , मोबाइल बँकिंग व QR कोड अशा अनेक सुविधा विनामूल्य मिळवा...




एक अभेद्य सुरक्षा कवच

**समता** लिक्विडीटी बेस प्रोटेक्शन स्किम

९९.८१ % ठेवीदारांच्या ठेवी पूर्णपणे सुरक्षित

ठेव ठेवा **समतात** आणि रहा बिनधास्त

✆ 7722010222

follow us on www.samatapat.com

## सहकार भारतीचे मुखपत्र सहकार सुगंध निर्मित

# नागरी सहकारी 2025
# बँक / पतसंस्था दैनंदिनी

**नागरी सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेच्या सर्व परिपत्रकांचा**
**मराठीत संक्षिप्त गोषवारा तसेच QR कोडच्या**
**मदतीने RBI ची सर्व मूळ परिपत्रके**
**उपलब्ध असणारी एकमेव दैनंदिनी व**
**नागरी सहकारी पतसंस्थेच्या दैनंदिनीमध्ये गेल्या**
**तीन वर्षातील सर्व महत्वाच्या परिपत्रकांचा समावेश**
**देशभरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्थांच्या**
**संख्येनुसार आर्थिक स्थितीच्या उपयुक्त माहितीसह...**




## नागरी सहकारी बँक दैनंदिनी २०२५

**किंमत रु. 500/-**

**अधिक प्रतींसाठी**
**विशेष सवलत**

आजच नोंदणी करा!

**किंमत रु. 400/-**

**अधिक प्रतींसाठी**
**विशेष सवलत**

आजच नोंदणी करा!

## नागरी सहकारी पतसंस्था दैनंदिनी २०२५




**सहकार भारतीचे मुखपत्र 'सहकार सुगंध'**
कार्यालय : ऑफिस नं. 15, विष्णुप्रिया अपार्टमेंट,
गणेशमळा, सिंहगड रोड, पुणे - 411 030
मो. : 8805981673 ईमेल : sahakar.sugandha@gmail.com

## सहकार चळवळीतील महनीय व्यक्तींचा जीवनप्रवास
## महाराष्ट्रातील १७५ कार्यकर्तृत्वांचा सचित्र आलेख




**सहकार भारती प्रकाशित**
**सहकार सुगंध निर्मित...**

# सहकार महर्षी




**सहकार चळवळीतील प्रत्येकाने आवर्जून वाचावा असा ग्रंथ**

**सहकार महर्षी ग्रंथ – प्रतींनुसार विशेष किंमत (कुरिअर मोफत)**

| | | |
|---|---|---|
| १ ते ५ ग्रंथ घेतल्यास | – | रु. १५००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ६ ते १० ग्रंथ घेतल्यास | – | रु. १३५०/– प्रमाणे प्रती ग्रंथ |
| ११ व त्यापेक्षा अधिक घेतल्यास | – | रु. १२००/– प्रमाणे प्रती ग्रंथ |

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्थेचा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्राप्त
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी शिफारस केलेला ग्रंथ

A/c Name :
Sahakar Printing & Publications Pvt. Ltd.
Bank Name :
State Bank of India
Branch :
Hingne Khurd, Pune Branch
Current a/c No. : 36931889346
IFS Code : SBIN0007159

UPI ID SahakarSugandha@SBI
सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून ऑनलाईन पेमेंट करावे व तसे कार्यालयाला कळवावे.

**बुके नको 'बुक' देऊ या! आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला 'सहकार महर्षी' ग्रंथ देऊ या!**


टीजेएस्बी सहकारी बँक लिमिटेड.
मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक
Bharose ka Bank Bhavishya ka Bank
सोनेरी क्षणांनी सजलेली, चैतन्याची दिवाळी
सोनेतारण कर्ज
गृहकर्ज
शैक्षणिक कर्ज
ॲसेट बॅक्ड क्रेडीट
ऑटो फायनान्स कर्ज
एसएमई कर्ज
औधोगिक सौर योजना
टीजेएस्बी संदेश
संयुक्ता अकाउंट
फॉरेक्स सर्विसेस
टीजेएस्बी सोसायटी ॲप
डिजिटल (क्यु.आर. कोड, युपीआई लाईट, नेट बँकिंग, डेबिट कार्ड), मोबाईल बँकिंग, बीबीपीएस
*अटी लागू
www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 266 3466 | 1800 223 466

Registered - SAHAKAR SUGANDHA - RNI NO. MAHMUL/2005/16099 (DECL NO. SDM/HAVELI/PUNE/SR/20/2017)
Postal Reg. No. : PCW/161/2023-2025 Licence to Post without Pre-payment of Postage no. WPP-29
Oct.-Nov. 2024 Joint Issue (Publication Date - 24/10/2024) Posting on 24/10/2024 at PSO, Pune GPO - 411 001




प्रेषक :

सहकार सुगंध कार्यालय

ऑफिस नं. १५, विष्णू प्रिया अपार्टमेंट,

५ वा मजला, ईशान रेस्टॉरंटच्यावर, गणेशमळा,

सिंहगड रोड, पुणे - ४११०३०.

मो. : ८८०५९८१६७३

प्रति,